
# अर्धमागधी-प्रदीप

## इयत्ता दहावी





# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्‌दल दयाबुद्‌धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

# अर्धमागधी-प्रदीप

## (अद्धमागही-पईव)

इयत्ता दहावी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
पुणे - ४११ ००४

© महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००४.
किंवा © प्रकाशक
यांनी सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

या पुस्तकाच्या कोणत्याही भागाचे मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००४ यांच्या लेखी परवानगीशिवाय मुद्रण किंवा पुनर्मुद्रण करण्यास मनाई आहे. तसेच सी. डी., दृकश्राव्य फिती, छायांकित प्रती किंवा अशा प्रकारच्या माहिती साठवून ठेवणाऱ्या कोणत्याही विजेवर चालणाऱ्या अथवा यांत्रिक संदेशवहन पद्धतीचा वापर करता येणार नाही.

प्रस्तुत पुस्तक महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणमंडळाच्या धोरणानुसार संस्कृत-अर्धमागधी-पालि अभ्यास मंडळाच्या मार्गदर्शनाखाली संपादक मंडळाने तयार केले.

**प्रथमावृत्ती : २०१३**
**पुनर्मुद्रण : २०२२**

**अभ्यास मंडळ सदस्य :**
डॉ. सौ. जोत्स्ना उपेंद्र खरे (निमंत्रक)
डॉ. नलिनी प्रभाकर जोशी
प्रा. सौ. अरुणा अरविंद पाटील
प्रा. माधव गणेशजी मेश्राम
प्रा. अशोक पैठणे
प्रा. रूपा अभय व्यास
डॉ. सुभाष आकारामजी आठवले
श्री. दत्तात्रय नागोराव देशपांडे
डॉ. लहानु गोपीचंद मेश्राम
श्रीमती मृणालिनी कुलकर्णी

**संपादक मंडळ सदस्य :**
डॉ. राजश्री राजन मोहाडीकर
डॉ. कमलकुमार जैन
डॉ. कौमुदी सुनील बलदोटा
डॉ. अनीता सुधीर बोथरा
डॉ. विमल अनिल बाफना
सौ. उज्ज्वला प्रदीप मगदूम
सौ. सुनंदा अशोक चौगुले

**समन्वयक :**
डॉ. नलिनी प्रभाकर जोशी

**प्रकाशक :**
**श्री. कृष्णकुमार पाटील**
सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे - ४११ ००४.

**निर्मिती व वितरण :**
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे-४११००४

**निर्मिती :**
श्री. विवेक गोसावी, नियंत्रक
श्री. सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
श्री. राजेंद्र ग. पांडलोसकर, सहाय्यक निर्मिती अधिकारी

**मुखपृष्ठ सजावट :** घनश्याम देशमुख

**कागद :**
७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**फोटोटाईप सेटिंग :**
सोनल ऐन्टरप्राइजेस, मुंबई

**मुद्रक :**

**मुद्रणादेश :**

# भारताचे संविधान

प्रास्ताविक

**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

# पटिञ्ञा

भारहो मम देसो अत्थि। सव्वे भारह–वासिणो मम बंधवा संति।

मज्झ मम देसम्मि पेम्मं अत्थि। मज्झ देसंसि विज्जमाणाणं समिध्दाणं विविहयाए विभूसियाणं च परंपराणं मे अहिमाणो अत्थि। तेसिं परंपराणं रक्खगो होउं समत्थो होज्ज अहं निच्चं पयत्तं करिस्सामि।

अहं मज्झ पालगाणं गुरुयणाणं जेट्ठगाणं च सम्माणं करिस्सामि, पच्चेगेण सध्दिं सुयणत्तणेण य आयरिस्सामि।

मम देसे, मम देस–बंधवाणं च मह निट्ठा–रक्खणस्स अहं पइण्णं करेमि। तेसिं कल्लाणे समिध्दीए य मज्झ सोक्खं समाविट्ठं होइ।

## प्रस्तावना

महाराष्ट्र शासनाने मान्य केलेल्या नवीन अभ्यासक्रमानुसार इ. १० वीच्या वर्गासाठी 'अर्धमागधी' विषयाकरिता 'अर्धमागधी-प्रदीप' हे पाठ्यपुस्तक तयार करण्यात आले आहे.

अभ्यासक्रमाची पुनर्रचना करताना, साहित्यिक मूल्यांबरोबरच शैक्षणिक उद्दिष्टे आणि पाठ्यपुस्तक-निर्मिती-महामंडळाने निर्धारित केलेले 'गाभा-घटक' त्यात सहजपणे आणि यथार्थपणे प्रतिबिंबित होतील, याची काळजी घेतली आहे. रूढीनुसार या विषयाला 'अर्धमागधी' म्हटले जात असले तरी, ज्यांमधील साहित्य उपलब्ध आहे अशा सर्व प्राकृत भाषांचा या पाठ्यपुस्तकात प्रातिनिधिक रूपाने समावेश केला आहे. अर्धमागधी, जैन महाराष्ट्री, महाराष्ट्री, शिलालेखी प्राकृत, शौरसेनी आणि अपभ्रंश या सर्व भाषांमधील गद्य-पद्य पाठ, भरपूर शब्दार्थ आणि टीपांसह सोपे करून दिले आहेत.

नैतिक मूल्यांची महत्ता सांगणारे पाठ तर यात आहेतच, परंतु सर्व पाठांमधून साकल्याने भारतीय संस्कृतीचा उदात्त प्राचीन वारसा प्रतिबिंबित झाला आहे. सम्राट अशोकाच्या शिलालेखातून सर्वधर्मसंप्रदायांच्या समानतेचा बोध होतो. कलहमुक्त आणि एकजूट असणाऱ्या गावाची कथा आवर्जून समाविष्ट केली आहे. गांधीवादाची मूलतत्त्वे समजावून देणारा पाठ प्राकृतात नव्याने रचला आहे. राष्ट्रीय अस्मितेची जोपासना करण्यास तो सहाय्यभूत ठरेल. 'रावणाचे व्रतग्रहण' या पद्यपाठातून रावणाच्या व्यक्तिमत्वावर वेगळाच प्रकाश पडतो. 'अहिंसा' आणि 'सुवयणाइं' हे पाठ सहृदयतेचे आणि सहिष्णुतेचे महत्त्व अधोरेखित करतात.

प्रत्येक पाठाच्या शेवटी दिलेल्या स्वाध्यायात शक्यतो तोचतोचपणा टाळून विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. इयत्ता दहावीला अर्धमागधी घेतलेले विद्यार्थी प्राय: संस्कृतची पार्श्वभूमी नसलेले आहेत - हे ध्यानी घेऊन शब्दार्थ देताना, किचकट संस्कृत रूपे टाळली आहेत.

संपादक मंडळ, समीक्षक, अभ्यासमंडळाचे सदस्य व अन्य संबंधित अधिकारी यांनी परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार केले आहे. त्याबद्दल त्यांना शिक्षणमंडळाच्या वतीने धन्यवाद.

पाठ्यपुस्तकनिर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांनी पुस्तकाची सुबक छपाई केली त्याबद्दल त्यांनाही धन्यवाद !

(श्री. सर्जेराव जाधव)
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे-४११ ००४

पुणे
दिनांक : ०१/०२/२०१३

## मुख्य संक्षेपांचा खुलासा
## (अकारानुक्रमे)

| | |
|---|---|
| अ. | अव्यय |
| क.भू.धा.वि. | कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित विशेषण |
| क.वि.धा.वि. | कर्मणि विध्यर्थक धातुसाधित विशेषण |
| कर्त. | कर्तरि |
| कर्म. | कर्मणि |
| क्रि. | क्रियापद |
| क्रि.वि. | क्रियाविशेषण |
| नपुं. | नपुंसकलिंग; नपुंसकलिंगी |
| पुं. | पुंलिंग; पुंलिंगी |
| पू.का.धा.अ. | पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय |
| प्रयो. | प्रयोजक |
| व.का.धा.वि. | वर्तमान कालवाचक धातुसाधित विशेषण |
| वि. | विशेषण |
| सं. | संबोधन |
| सर्व. | सर्वनाम |
| स्त्री. | स्त्रीलिंग; स्त्रीलिंगी |

# अणुक्कमणिया


| पाढक्कमो | पाढणामं | पत्तकमो |
| --- | --- | --- |
| | **गज्जविभागो** | |
| १. | को धम्मिओ ? | १ |
| २. | लाहंतराए णिद्धणस्स कहा | ३ |
| ३. | संहई कज्जसाहिया | ५ |
| ४. | तिल-णिमित्तेण महातक्करो | ८ |
| ५. | भिण्णधम्मियाणं पाणिग्गहणं | ११ |
| ६. | भगवंतस्स महावीरस्स विण्णाणं | १४ |
| ७. | 'गांधीवाद'स्स मूलतत्ताइं | १६ |
| ८. | असोगराइणो बारहमो पत्थरलेहो | १८ |
| ९. | अय्यउत्तो परकेरओ संवुत्तो | २१ |
| | **पज्जविभागो** | |
| १. | सुवयणाइं (पाठांतर) | २४ |
| २. | गाहासत्तसईए सत्त-गाहाओ (पाठांतर) | २८ |
| ३. | अणत्थजुओ अत्थो | ३१ |
| ४. | पारिणामिया बुद्धी | ३४ |
| ५. | अहिंसा-सरूवं | ३८ |
| ६. | रावणस्स वयगहणं | ४१ |
| | **थूलवायणं** | |
| १. | तेयलिपुत्त-पोट्टिला-कहा | ४४ |
| २. | पुत्ताणं परिक्खा | ४७ |
| | **परिसिट्ठाइं** | |
| १. | व्याकरण विवेचन | ५० |
| २. | अनुवादासाठी पाठ्येतर गद्य-पद्य उतारे | ५७ |
| ३. | प्रश्नपत्रिका आराखडा | ५९ |


## विशेष सूचना

संयुक्त अभ्यासक्रमासाठी (५० गुणांसाठी) गद्यविभागातील पहिले सहा पाठ निर्धारित केले आहेत. पद्य विभागातील पहिले चार पाठ निर्धारित आहेत. संयुक्त अभ्यासक्रमासाठी पद्य विभागातील पहिला पाठ, पाठांतरासाठी आहे. व्याकरण विवेचन व परिशिष्टे दोन्ही अभ्यासक्रमात शिकवावीत.

संपूर्ण अभ्यासक्रमासाठी गद्य, पद्य, स्थूलवाचन व परिशिष्टे हे सर्व विभाग शिकवावेत. पाठांतरासाठी पद्य विभागातील पहिला व दुसरा पाठ निर्धारित केला आहे.

# गज्ज-विभागो

## १ पढमो पाढो

# को धम्मिओ ?

सर्वधर्मसमभावाच्या आधुनिक जमान्यात 'खऱ्या धर्माचे' आणि 'खऱ्या धार्मिकतेचे' निकष तपासून पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रस्तुत पाठात - एक श्रीमंत श्रेष्ठी, आपल्या तीन पुत्रांना एक-एक उत्कृष्ट काम करून दाखविण्यासाठी, काही द्रव्य देतात. तिघेही आपापल्या क्षमतेनुसार चांगली कामे करतात. 'तिसऱ्या मुलाने केलेले काम श्रेष्ठींना का अधिक पसंत पडते?' त्याची हकीगत प्रस्तुत कथेत नमूद केली आहे.

प्राकृतच्या अभ्यासाला चालना देणाऱ्या - श्री विजयकस्तूरसूरींच्या 'पाइअ-विन्नाण-कहा'च्या दुसऱ्या भागातील ही साठावी कथा आहे.



एगम्मि नयरे एगो सिरिमंतो सेट्ठी परिवसइ । तस्स तिण्णि पुत्ता संति । एगया वुड्ढत्तणम्मि तेण नियदव्वस्स तिण्हंभागं काऊण पुत्ताणं दिण्णं । तओ वि तस्स पासम्मि एगं महामुल्लं रयणं अत्थि तेण, 'अप्पणे पुत्ताणं को धम्मिओ?' त्ति जाणणट्ठं तेण पुत्ताणं कहियं- 'जो सोहणं कज्जं कुणेज्जा, तस्स एयं रयणं दाहिस्सं ।'

एवं सोच्चा जेट्ठो पुत्तो अडसट्ठिं तित्थजत्ताओ किच्चा, तत्थ नियधणं वइऊण घरम्मि समागओ । पिउस्स वुत्तं-'मए एयं सोहणं कज्जं कयं।' बीओ मज्झिमो पुत्तो गेहम्मि वसिऊण दीण-दुहिय-अणाहाणं भोयणं दाउं पउत्तो, तेण वि कहियं 'मए एवं सोहणं कज्जं कयं' त्ति।

कणिट्ठपुत्तो, चिंतेइ 'सोहणं कज्जं किं करेमि?' ति गवेसंतो एगया नयराओ बाहिरं गओ । तइआ तत्थ सरोवरम्मि एगं मणुसं पडिऊण बुड्डंतं पासित्ता सिग्घयरं तत्थ गओ । सो जलम्मि पडिऊण तस्स उद्धरणट्ठं पयासं कुणेइ, 'अयं को अत्थि' त्ति वियारिऊण तं पुरिसं सम्मं पासेइ । तओ तेण णायं- 'इमो मम सत्तू वट्टइ ।' एवं णच्चा वि बुड्डंतं तं रक्खेउं मम कत्तव्वं ति विचिंतेइ । कट्ठेण तं जलाओ बाहिरं निक्कासेइ आसासेइ य । सो वि सत्तू जीवियदाणाओ तस्स मित्तत्तणं संपत्तो । गेहम्मि आगंतूण पिउस्स पुरओ वुत्तं- 'अज्ज मए एयारिसं सोहणं कज्जं समायरियं, जं सत्तू वि बुड्ढंतं जलाओ उद्धरिओ ।'

पिउणा वि तं सोच्चा सो बहुं अणुमोइओ । महामुल्लरयणं तस्स दाऊण कहियं - मच्चुमुह-पडिआण 'अवराहिजीवस्स वि जो करुणाभावो, रक्खणं करेइ च तं चिअ सोहणं कज्जं ।'

कणिट्ठपुत्तेण रयणविक्कएण जं दव्वं पत्तं, तस्स भागत्तयं काऊणं दुण्हं भाऊणं एगेगो भागो दिण्णो । पिआ वि तस्स तारिस -पउत्तिं दट्ठूण अईव संतुट्ठो ।

## शब्दार्थ व टीपा

**धम्मिओ** (पुं.) - धार्मिक.
**तिण्णि** (संख्यावाचक विशेषण) - तीन.
**भागतिगं** - तीन भाग.
**महामुल्लं** (समास) - महंतं मुल्लं जस्स तं। (बहुव्रीहि) महान आहे मूल्य ज्याचे असे ते (रत्न).
**जाणणट्ठं** - जाणण्यासाठी.
**कुणेज्जा** (क्रि.) - 'कुण', विध्यर्थ, तृतीय पुरुष एकवचन, करेल.
**दाहिस्सं** (क्रि.) - 'दा', भविष्यकाळ, प्रथम पुरुष एकवचन, देईन.
**अडसट्ठिं** (संख्यावाचक विशेषण) अड्डसष्ट (६८).
**वइऊण** - व्यय करून.
**दाउं पउत्तो** - देण्यास प्रवृत्त झाला, देऊ लागला.
**सोहण** (वि.) - शोभन, चांगले, उत्तम.
**बुड्डंत** - बुडणारा.
**पासित्ता** (क्रि.) - 'पास', पू. का. धा. अ.
**सिग्घयरं** (क्रि. वि.) - शीघ्रतेने, सत्वर.
**उद्धरणट्ठं** - बाहेर काढण्यासाठी.
**पयास** (पुं.) - प्रयास, प्रयत्न.
**बाहिरं निक्कासेइ** - बाहेर काढले.
**आसासेइ** - आश्वस्त केले.
**मित्तत्तण** - मित्रत्व, मित्रता.
**अणुमोइओ** (पुं.) - अनुमोदन केले, अभिनंदन केले.
**दुण्हं भाऊणं** - दोन्ही भावांना.
**तारिस- पउत्तिं** - तशा प्रकारची प्रवृत्ती.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) सेट्ठिणा वुड्ढत्तणम्मि पुत्ताणं किं दिण्णं ?
(२) जेट्ठो पुत्तो किं काऊण घरम्मि समागओ ?
(३) बीओ पुत्तो दीण-दुहिय-अणाहाणं किं देइ ?
(४) सेट्ठिणा महामुल्लरयणं कस्स दिन्नं ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) श्रेष्ठींनी पुत्रांची धार्मिकता जाणण्यासाठी काय सांगितले ?
(२) श्रेष्ठींच्या मोठ्या व मधल्या मुलांनी, पित्याने दिलेल्या पैशातून, कोणती कामे केली ?
(३) कनिष्ठ पुत्राने कोणते काम केले ? पित्याने कोणत्या शब्दात त्याची प्रशंसा केली ?
(४) मौल्यवान रत्न प्राप्त झाल्यानंतर कनिष्ठ पुत्राने काय केले ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) रूपे ओळखा.**
नियदव्वस्स, कुणेज्जा, दाहिस्सं, वइऊण, बुड्डंतं, सरोवरम्मि, तित्थजत्ताओ, पिउस्स

**ब) पुढील शब्दांना, तद्‌भव प्राकृत शब्द लिहा.**
श्रीमन्त, वृद्धत्व, निजद्रव्य, महामूल्य, तीर्थयात्रा, उद्धरणार्थ, जीवितदान, समाचरित, रक्षण, रत्नविक्रय.

## विशेष अभ्यास

**प्रस्तुत पाठातील काही सर्वनामांचा संग्रह येथे दिला आहे. शिक्षकांच्या मदतीने त्या रूपांचा अभ्यास करा.**

तस्स, तेण, को, जो, एयं, मए, किं, अयं, इमो, सो, तं, जं

❑ ❑ ❑

# बीओ पाढो

# २ लाहंतराए निद्धणस्स कहा

विसाव्या शतकात, प्राकृत विद्येच्या प्रसारासाठी ज्या मुनिवर्यांनी आपले साहित्यिक योगदान दिले–अशा अभ्यासकांमध्ये आचार्य विजयकस्तूरसूरींचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागते. 'पाइअ-विन्नाण-कहा' (भाग १, २) या कथाग्रंथांमधून त्यांनी अभिजात प्राकृतात असलेल्या अनेक जैन कथा, सुलभ जैन महाराष्ट्रीत आणल्या. 'पाइअ-विन्नाण-कहा'-भाग १ मधून येथे घेतलेली ही कथा 'लाभान्तराय-कर्मा'चे स्वरूप विशद करते.

ज्याला आपण व्यवहारात 'दुर्दैव', 'दुर्भाग्य'- असे म्हणतो, तो जैन संकल्पनेप्रमाणे मोहनीय आणि अंतराय कर्मांचाच परिपाक असतो. अगदी समोर ठेवलेले मौल्यवान रत्न एका दुर्दैवी निर्धनाला कसे प्राप्त होत नाही– याविषयीची ही मनोरंजक कथा !



कम्मि गामे एगो निद्धणो निब्भग्गो पुरिसो आसी । सो कट्ठेण जीवणं निव्वहेइ । एगया सो वणम्मि गओ, तत्थ एगो विज्जाहरो विज्जाहरी अ विमाणेण गच्छंति । तेहिं दंपईहिं सो निद्धणो दिट्ठो । विज्जाहरी तं नियभत्तारं कहेइ – 'हे पिय ! एसो निद्धणो अम्हाणं दिट्ठिपहम्मि समागओ तया एसो अवस्सं सुहं पावियव्वो।' विज्जाहरो कहेइ – 'एसो निद्धणा निब्भग्गो अत्थि । दिण्णधणो वि असुहकम्मोदएण सो निद्धणो चिअ होज्जा ।'

विज्जाहरी कहेइ – 'पिय ! तुमं किवणो आसि, तेण एवं कहेसि।' विज्जाहरो कहेइ– 'हं सच्चं वएमि । हे पिए ! तुम्ह वीसासो न होज्जा, तया एयस्स परिक्खं कुणेमो । जम्मि पहे एसो गच्छइ, तयग्गओ किंचि वि दूरे पहम्मि कोडिमुल्लं एगं कुंडलं ठविस्सामि । जइ सो तं गिण्हेज्जा तया तस्स इमं कुंडलं ।' एवं कहिऊण तेण विज्जाहरेण तस्स निद्धणस्स नाइदूरे नच्चासण्णे तं कुंडलं मग्गे ठवियं ।

गच्छंतस्स तस्स तं कुंडलं जया समीवमागयं, तया सो लाहंतराय-कम्मस्स उदएण एवं चिंतेइ – 'अंधो कहं चलेज्जा ?' एवं चिंतित्ता सो अंधस्स इव नेत्ते निमीलिऊण, मग्गे ताव चलिओ, जाव तं कुंडलं पच्छा ठियं । तेण सम्मुहत्थं पि कुंडलं कम्मवसेण न पावियं । तं च कुंडलं विज्जाहरेण गहियं । एवं भाग्गहीणा पुरिसो सम्मुहत्थं पि दव्वं न पासइ ।

## शब्दार्थ व टीपा

**लाहंतराए निद्धणस्स कहा** - लाभांतरायाविषयी निर्धन व्यक्तीची कथा.
**निब्भग्गो** (वि.) (पुं.) - दुर्भागी, दुर्दैवी.
**कट्ठेण** (क्रि. वि.) - कष्टाने, कसेबसे.
**दंपई** (पुं.) - दंपती, पति-पत्नी.
**नियभत्तारं** - स्वत:च्या पतीला.
**दिण्णधणो** (समास) - दिण्णं धणं जस्स सो । (बहुव्रीहि) दिले आहे धन ज्याला असा तो.
**असुहकम्मोदओ** (समास) - असुहस्स कम्मस्स उदओ । (षष्ठी तत्पुरुष) अशुभ कर्माचा उदय.
**किवण** (वि.) (पुं.) - कृपण, कंजूष.
**वएमि** (क्रि.) - 'वय', वर्तमानकाळ, प्रथम पुरुष एकवचन, बोलत आहे.
**विसासो** (पुं.) - विश्वास.
**तयग्गओ** - त्याच्या पुढे.
**नाइदूरे नच्चासण्णे** - फार दूर नाही आणि फार जवळही नाही.
**समीवमागयं** (संधि) - समीवं+आगयं । जवळ आले.
**नेत्ते निमीलिऊण** - डोळे मिटून.
**सम्मुहत्थं** (वि.) (नपुं.) - समोर असलेले.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) विज्जाहरो निद्धणस्स पुरओ किं ठवेइ ?
(२) जया कुंडलं समीवं आगयं तया निद्धणो किं चिंतेइ ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) निर्धनाला बघून विद्याधरीने विद्याधराला काय सांगितले ? विद्याधराने त्यावर कोणते उत्तर दिले ?
(२) समोर ठेवलेले रत्न, दुर्भागी निर्धनाने कसे घालविले ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) कंसातील क्रियापदांची योग्य रूपे घालून वाक्य पूर्ण करा.**

(१) सो कट्ठेण जीवणं (निव्वह) ।
(२) अहं सच्चं (वय) ।
(३) एवं (कह) तेण विज्जाहरेण तं कुंडलं मग्गे ठवियं ।
(४) तं च कुंडलं विज्जाहरेण (गह) ।
(५) भग्गहीणा पुरिसा सम्मुहत्थं पि दव्वं न (पास) ।

**ब) पुढील प्राकृत शब्दांना समानार्थी प्राकृत शब्द द्या.**

अरण्ण, दरिद्द, भग्गहीण, बोल्ल, नेत्तहीण

## विशेष अभ्यास

शिक्षकांच्या मदतीने अंतरायकर्माच्या पाच प्रकारांचे स्वरूप सोदाहरण समजून घ्या.

❑ ❑ ❑


तइओ पाढो

# ३ संहई कज्जसाहिया

एकतेचे, एकजुटीचे महत्त्व कोणत्याही काळात अनन्यसाधारण आहे. कुटुंब असो, गाव असो की राष्ट्र, एकजूट असेल तरच प्रगतीची आशा असते. 'संहतिः कार्यसाधिका' या संस्कृत वचनाचा हाच भावार्थ आहे.

मूलशुद्धिप्रकरण (११ वे शतक) या ग्रंथाच्या टीकेत देवचन्द्रसूरींनी 'नागदत्त' नावाच्या कुटुंबवत्सल गृहस्थाची कथा दिली आहे. स्वतःच्या गावातील भांडण-कलहांना कंटाळून नागदत्त बाहेर पडून, 'तंटा-मुक्त' गाव कसे शोधतो - त्याचा वृत्तांत या पाठात दिलेला आहे !

गावाची एकजूट दाखविण्यासाठी येथे एका असत्याचा आधार घेतला आहे खरा, पण ते काही कथेचे तात्पर्य नव्हे ! ते तर केवळ निमित्त आहे. त्यातून समाजाच्या, एकजूटीचा लाभ होतो ते या पाठात पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.



अत्थि इहेव जंबूदीवे दीवे भारहे वासे लाडदेसे धन्नपूरयं नाम गामं । तत्थ कोडुंबिया न समुदाय-धम्मेण वट्टंति । ताण य मज्झे णागदत्तो णाम कोडुंबिओ । तेण य ते सिक्खाविया जहा - 'न जुज्जइ तुम्हाणं विसंहई काउं', यत उक्तं नीतिशास्त्रे -

संहतिः श्रेयसी पुंसां स्वपक्षे तु विशेषतः ।<br>
तुषैरपि परित्यक्ता न प्ररोहन्ति तण्डुलाः ।।

न य विसंहयाणं रायकुले वि गयाणं पओयणं सिज्झइ ता मा विपडिवत्तिं कुणह । न पडिवन्नं च तेहिं तव्वयणं । विसंहयं च नाऊण सत्तूहिं उवद्दविउं आढत्तो सो गामो ।

तस्सिं च दट्ठूण सो णागदत्तो निरुवद्दव-निवास-निरूवणत्थं सगडियाए आरोहिऊण गओ रंधेज्जयं नाम गामं। णागदत्तो जाव तत्थ पहुत्तो ताव पेच्छइ वडरुक्खस्स हेट्ठा णिविट्ठे सव्वे गामजणा । तेण चिंतियं-'अहो ! सोहणं जायं जं एगत्थ चेव मिलिया सव्वे गामपुरिसा ।'

गामपुरिसाणं पुरओ णागदत्तेण मुक्का सगडी । काऊण य उचियपडिवत्तिं उवविट्ठो तप्पुरओ । तेण विण्णत्तं – 'अहमेत्थ तुम्ह गामे वसिउं इच्छामि, जइ तुब्भे गुणे पयच्छह ।' तेहिं वि गुणे दाऊण भणिओ – 'सिग्घं आगच्छाहि ।' तओ उट्ठेऊण जाव बइल्ला बंधेइ ताण ण पेच्छइ सगडीए एगं चक्कं ।

भणिया य तेण गामिल्ला जहा– 'अवहडं मम सगडीओ केणावि एगं चक्कं, ता कहं गच्छामि ?' तओ तेहिं एगवक्कयाए भणियं जहा– 'एगचक्केण चेव आगया एसा सगडी ।' तेण भणियं – 'कहं एगचक्केण गड्डी समागच्छइ ?' तेहिं भणियं– 'अम्हेहिं चक्केण विणा हि सगडी आगच्छमाणा दिट्ठा । ता भंतिओ तुमं । जइ अम्हाणं ण पत्तियसि, ता पुच्छ एयाणि मग्ग–तड–ठियाणि डिंभरूवाणि ।'

मग्गतडं गंतूण तेण पुच्छियाणि बालगाणि । तेहिं वि तं चेव सिट्ठं । तेण चिंतियं – 'कहं इत्तिया मिच्छावाइणो भविस्संति ? ता अहं चेव भंतिओ भविस्सामि ।'

णागदत्तेण बइल्ला सगडीए जोत्तिया । आरुहिऊण खेडिया बइल्ला । तओ तेहिं गामिल्लएहिं सद्देऊण भणिओ जहा – "भद्द ! बालो वि एवं वियाणइ ण एगचक्केण गड्डी वहइ । किंतु तुह पिट्ठओ अम्ह मज्झाओ एगेण चक्कं अवहरियं दिट्ठं च सव्वं एयं अम्हेहिं, परं अम्हाणं एस गामधम्मो जं एगेण सुंदरमसुंदरं वा कयं तं सव्वेहिं सबाल–वुड्ढेहिं तहेव पडिपूरेयव्वं । जइ एएण गामधम्मेण सपुत्त–दारो णिव्वहसि तो आगच्छाहि, ण अण्णहा ।"

गामिल्लगाणं संहयं गामधम्मं जाणिऊण णागदत्तेण हरिसियचित्तेण पडिवण्णं आगमणं । तेहिं भणियं – 'जइ एवं, तो भण किं ते साहेज्जं करेमो ?' तेण भणियं – 'अइपसण्णो अहं, किंतु अप्पेह चक्कं जेण गंतूण आगच्छामि ।' अप्पियं तेहिं चक्कं । गओ सो नियगेहं । काऊण य सह पुत्त–कलत्तेहिं एगवक्कयं आगंतूण वसिओ रंधेज्जय गामे ।

---

## शब्दार्थ व टीपा

**लाडदेसे** – 'लाड' नावाच्या प्रदेशात.
**धन्नपूरयं** – 'धान्यपूरक' नावाचे गाव.
**तत्थ कोडुंबिया न समुदाय-धम्मेण वट्टंति-(अर्थ) :** तेथील गृहस्थ समुदायधर्माने म्हणजे एकजुटीने रहात नसत.
**णागदत्तो** (पुं.) – नागदत्त.
**विसंहई** – संहतीने म्हणजे एकजुटीने न राहणे.
**संस्कृत श्लोकाचा अर्थ :** आपल्या पक्षाचे हित साधायचे असेल तर माणसांनी खास करून एकजुटीने राहणे श्रेयस्कर असते. तांदुळाच्या वरील तूस (कवच) त्यांना सोडून गेले तर तांदूळ उगवण्यायोग्य रहात नाहीत.
**पओयणं** (नपुं.) – प्रयोजन, कार्य.
**सिज्झइ** – साधते.
**ता मा विपडिवत्तिं कुणह –** (अर्थ) : तर मग एकमेकांशी फुटीरपणे वागू नका.
**उवद्दविउं आढत्तो** – (शत्रूंनी) उपद्रव देण्यास आरंभ केला.
**निरुवद्दव-निवास-निरूवणत्थं** – निरुपद्रव निवासाच्या शोधासाठी.
**सगडिया** (स्त्री.) – शकटिका, छोटी बैलगाडी, छकडा.
**रंधेज्जय** – 'रंधेज्जय' गावाचे नाव.
**पहुत्तो** (देशी) – पोहोचला.
**उचिय-पडिवत्तिं काऊण** – भेटल्यानंतरचे सर्व उपचार करून.
**जइ तुब्भे गुणे पयच्छह** – जर तुम्ही (बैल बांधण्यास) दोरी देत असाल तर.
**गामिल्ला** – ग्रामीण, ग्रामीण लोक, गावकरी.
**अवहडं** (वि.) (नपुं.) – अपहृत केले, पळविले.
**एगवक्कयाए** (क्रि. वि.) – एकवाक्यतेने.
**गड्डी** (देशी) – गाडी.
**ता भंतिओ तुमं** – तर तुलाच भ्रम झाला आहे.
**पत्तिय** (क्रि.) – विश्वास ठेवणे.
**मग्ग-तड-ठिय** (क. भू. धा. वि.) – मार्गतटस्थित, रस्त्याच्या कडेला असलेली.
**डिंभरूवाणि** – मुलेबाळे, पोरेसोरे.
**इत्तिया** – इतके लोक.
**मिच्छावाइणो** – मिथ्यावादी, खोटे बोलणारे.
**बइल्ल** (देशी) – बैल.
**जोत्तिया** (क. भू. धा. वि.) – जुंपले, जोतले.

**खेडिया बइल्ला** – बैलांना हाकारून पुढे नेले.
**ण एगचक्केण गड्डी वहइ** –एका चाकाने गाडी चालत नाही.
**अवहरियं** (क. भू. धा. वि.) – अपहृत केले, पळविले.
**गामधम्मो** (पुं.) – ग्रामधर्म, सगळ्या गावाचा एक नियम.
**सुंदरमसुंदरं** (संधि) – सुंदरं+असुंदरं । चांगले अथवा वाईट.
**पडिपूरेयव्व** (विध्यर्थक विशेषण) – प्रतिपूर्ण करावे, मान्यता द्यावी.
**सपुत्त-दारो** – पत्नी व मुलांसहित.
**पडिवण्ण** (क. भू. धा. वि.) – मान्य केले, स्वीकारले.
**साहेज्ज** (नपुं.) – साहाय्य, मदत.
**अप्पेह** (क्रि.) – 'अप्प', आज्ञार्थ, द्वितीय पुरुष बहुवचन, अर्पण करा, द्या.
**काऊण एगवक्कयं** – एकवाक्यता करून.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) कम्मि दीवे भारहो अत्थि ?
(२) विसंहयं गामं णाऊण सत्तूहिं किं कयं ?
(३) णागदत्तेण सगडी कत्थ मुक्का ?
(४) गामिल्लाणं एगवक्कयं दट्ठूण णागदत्तेण किं चिंतियं ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) स्वत:चे गाव सोडून, नागदत्त दुसऱ्या गावाच्या शोधासाठी का निघाला ?
(२) नागदत्ताने इंधेज्जय गावी येण्याचा निर्णय का घेतला ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) रूपे ओळखा.**

वट्टंति, काउं, आढत्तो, विण्णत्तं, गंतूण, णिव्वहसि, तेहिं, पयच्छह, आगच्छमाणा, एगेण

**ब) जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| (१) देशी शब्द | (अ) आढत्तो, भणियं |
| (२) क. भू. धा. वि. ची रूपे | (आ) इह, सुंदर |
| (३) विध्यर्थक विशेषण | (इ) आरोहिऊण, गंतूण |
| (४) तद्‌भव शब्द | (ई) हेट्ठा, बइल्लो |
| (५) पू. का. धा. अव्यये | (उ) वडरुक्ख, गामधम्म |
| (६) तत्सम शब्द | (ऊ) पडिपूरेयव्वं, कायव्वं |

### विशेष अभ्यास

या कथेचे नाट्य-रूपांतर करा.

चउत्थो पाढो

# ४ तिल-निमित्तेण महातक्करो

इसवी-सनाचे ११-१२ वे शतक प्राकृत (जैन महाराष्ट्री) भाषेतील कथाग्रंथांचा सुवर्णकाळ मानला जातो. वर्धमानसूरींनी अकराव्या शतकात लिहिलेला 'मणोरमा-कहा' हा ग्रंथ अनेक लहान-मोठ्या बोधप्रद कथांचा जणू खजिनाच आहे.

बालकावर संस्कार करण्यात आईच्या हातून जर कुचराई झाली तर त्याचे परिणाम मोठेपणी किती घातक होऊ शकतात - हे स्पष्ट करणारी ही कथा आहे.

तिळाच्या क्षुल्लक चोरीपासून आरंभ करून महातस्कर बनलेल्या युवकाच्या कथेतून संस्काराचे महत्त्व स्पष्ट केलेले आहे. म्हणून बालवयात झालेले चांगले संस्कार जीवनाला आकार देतात. हे प्रत्येक आईवडीलांनी लक्षात ठेवून मुलांच्यावर चांगले संस्कार करावेत असे या कथेतून स्पष्ट केले आहे.

---

एगम्मि पट्टणे एगा गतवइया इत्थी वसइ बालवच्छा । परघरेसु पाणियं वहमाणीए मग्गाणुलग्गो गच्छइ से पुत्तो ।

अन्नम्मि दिणे नईए मज्जिऊण जलालित्तदेहो चेव जणणीए मग्गमोइण्णो सो सुओ, जण-समूह-पणोल्लिओ तिलरासीए उवरिं निवडिओ । तिलालित्त-सरीरो रोवंतो, चेव उट्ठिऊण लग्गो जणणीए पिट्ठओ । गओ नियघरं । पक्खोडिऊण सरीरगं गहिया माऊए तिला । जाया तिलमुट्ठी गुलेण काऊण कक्करियं दिण्णं दारगस्स । सो हरिसिओ नच्चिउं लग्गो । तहेव पइदिणं काउमारद्धो सो दारगो । 'बालो' त्ति काऊण ण कोवि किं पि भणेइ । माया वि ण णिवारेइ । कमेण वड्ढंतो पत्तो जोव्वणं । अब्भासवसओ महातक्करो जाओ । मुसेइ ईसर-घराणि अलक्खिओ चेव । लद्धेण दविणेण विलसइ ।

अन्नम्मि दिणे धणावहार-णिमित्तं पविट्ठो एगाए गणियाए मंदिरे । तं निब्भर-पसुत्तं जाणिऊण ताए आभरणाइं गहिउं लग्गो । सा पडिबुद्धा सयण-परियणं सद्दाविउं लग्गा । निट्ठुरमणेण तेण सा गणिया वावाइया । तुरियं तरल-तार-लोयणो वासभवणाओ नीहरंतो दिट्ठो गणिया-मायाए । 'तेणो तेणो' त्ति पोक्कारियं तीए । समागया आरक्खिय-पुरिसा । पलायमाणो गहिओ तेहिं । इत्थंतरे तेहिं दिट्ठा वावाइया गणिया । दढं संजमिऊण नीओ सो नरवइसमीवे ।

राइणा भणियं - 'गाढं पहारेऊण कयंतस्स अतिहिं करेह ।' जं सामी समाइसइ' त्ति भणिऊण निग्गओ दंडवासिओ । मसि-विलित्त-गत्तो, कंधरा-आरोविय- फुट्टघडमालो, वज्जंत-डिंडिमो, डिंभ-कय-कोलाहलो, वुड्ढ-गद्दभ-आरोविओ नीओ हट्टावलीए ।

कमेण पत्तो नियघरस्स अंगणे । अवमाणं असहिऊण उच्चसरेण कहिउं लग्गो- ''जणणि! वइरिणी ! किं ण तए पढमं व कुकम्मं कुणंतो वारिओ ?'' एवमाइ विविहं विलवंतो समारोविओ सूलाए । अट्ट-रुद्द-झाणेहिं मरिऊण समुप्पणो नरए ।

जइ जणणीए बालवए एव निवारिओ होंतो ता जोव्वणे एवंपयारेण ण मारिओ होंतो ।

---

## शब्दार्थ व टीपा

**पट्टण** (नपुं.) - पत्तन, नगर.

**गतवइया** (स्त्री.) - गत-पतिका, विधवा स्त्री.

**बालवच्छा** (समास) - बालो वच्छो जीए सा । (बहुव्रीहि) लहान आहे मुलगा जिचा अशी ती.

**वहमाणीए** (क्रि.) - 'वह', व. का. धा. वि., स्त्रीलिंगी सप्तमी एकवचन, वहन करणारी, वाहणारी.

**मज्जिऊण** - स्नान करून.

**जलालित्तदेहो** (समास) - जलेण आलित्तो देहो जस्स सो । (बहुव्रीहि) पाण्याने ज्याचा देह भिजला आहे असा तो.

**मग्गमोइण्णो** (संधि)- मग्गं + ओइण्णो । (आईच्या) मागोमाग जाऊ लागलेला.

**पणोल्लिओ** (देशी) - चेंगरलेला.

**पक्खोडिऊण** – पाखडून, झटकून

**जाया तिलमुट्ठी गुलेण काऊण कक्करियय‌ं**

**दिण्णं दारगस्स** – (अर्थ) : जमा झालेल्या मूठभर तिळाची गूळ घालून कुरकुरीत चिक्की करून मुलाला दिली.

**काउमारद्धो** (संधि) – काउं+आरद्धो । करण्यास प्रारंभ केला, करू लागला.

**अब्भासवसओ** – तीळ चोरण्याचा रोजचा सराव झाल्यामुळे.

**महातक्करो** (पु.) – महातस्कर.

**मुसेइ** – क्रि. 'मुस', वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन, चोरी करत असे.

**अलक्खिओ** – कोणाच्याही नकळत.

**धणावहारो** (समास) – धणस्स अवहारो । (षष्ठी तत्पुरुष) धनाचा अपहार.

**निब्भरपसुत्तं** (समास) – निब्भरं पसुत्तं । (कर्मधारय) गाढ झोपलेल्या त्याला.

**वावाइया** (वि.) (स्त्री.) – व्यापादित केली, ठार मारली.

**तरल-ताल लोयणो** (वि.) (पुं.) – आशंकेमुळे ज्याची नजर भिरभिरत आहे असा.

**नीहरंतो** – बाहेर पडत असताना.

**गणिया-माया** – गणिकामाता, अक्का, बाई.

**तेण** (पुं.) – स्तेन, चोर.

**पोक्कारियं** – पुकारले, आरडाओरडा केला.

**आरक्खिय-पुरिसा** – रखवालदार, पहारेकरी.

**दढं संजमिऊण** – दृढपणे संयमित करून, घट्ट बांधून.

**गाढं पहारेऊण कयंतस्स अतिहिं करेह** – (अर्थ) : खूप प्रहार करून कृतांताचे अतिथी करा, बेदम चोप देऊन यमाच्या पाहुणचाराला पाठवा.

**दंडवासिओ** (पुं.) – दण्डपाशिक, शिक्षा करणारा अधिकारी.

**मसि-विलित्त-गत्तो** – सर्वांगाला काळे फासलेला.

**कंधरा-आरोविय-फुट्टघडमालो** – गळ्यात फुटक्या मडक्यांच्या माळा घातलेल्या.

**वज्जंत डिंडिमो** – ज्याच्या पुढे नगारे वाजवले जात आहेत असा.

**डिंभ-कय-कोलाहलो** – ज्याच्या आजूबाजूला मुलेबाळे दंगामस्ती करत आहे असा.

**हट्टावली** – दुकानांची रांग, बाजार.

**विलवंतो** (क्रि.) – 'विलव', व. का. धा. वि., पुंलिंगी प्रथमा एकवचन, विलाप करणारा.

**सूलाए समारोविओ** – सुळावर चढविले.

**अट्ट-रुद्द-झाण** – आर्त-रौद्र-ध्यान; दु:खी आणि हिंसक विचार करण्याची अवस्था म्हणजे आर्त-रौद्र-ध्यान होय.

**चार ध्याने :** जैन परंपरेत ध्यानाचे चार प्रकार सांगितले आहेत – ती म्हणजे आर्तध्यान, रौद्रध्यान, धर्मध्यान, शुक्लध्यान. दु:ख व क्लेशांचे चिंतन करणे म्हणजे आर्तध्यान. हिंसक विचारात मग्न राहणे म्हणजे रौद्रध्यान. धार्मिक विचारात राहणे म्हणजे धर्मध्यान. शुद्ध आत्म्याचे चिंतन करणे म्हणजे शुक्लध्यान. यांपैकी पहिली दोन अशुभ-ध्याने आहेत. नंतरची दोन शुभ-ध्याने आहेत.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) तिलचोरियाए दारगो कमेण को जाओ ?

(२) आरक्खिय-पुरिसेहिं चोरो कस्स समीवे नीओ ?

(३) अवमाणिओ चोरो जणणिं उच्चसरेण किं कहेइ ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) पहिल्या दिवशी बालकाला चिक्की कशा प्रकारे मिळाली ?

(२) विधवेचा मुलगा कशामुळे महातस्कर झाला ?

(३) गणिकेच्या घरी महातस्कराने कोणते कृत्य केले ? त्याचा परिणाम काय झाला ?

(३) 'तिलनिमित्तेण महातक्करो' या कथेचे तात्पर्य सांगा.

## प्र. ३ : व्याकरण

**अ) कंसातील क्रियापदांची योग्य रूपे घालून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) (पक्खोड) सरीरगं गहिया माऊए तिला ।

(२) लद्धेण दविणेण (विलस) दारगो ।

(३) तेहिं दिट्ठा (वावाय) गणिया ।

(४) अट्ट-रुद्द-झाणेहिं (मर) समुप्पन्नो नरए ।

**ब) संधी सोडवा.**

मग्गमोइण्णो, जलालित्तदेहो, काउमारद्धो

### विशेष अभ्यास

**या पाठातील व का. धा. वि. च्या रूपांचा संग्रह दिला आहे. त्यांचा अर्थ लिहून, संपूर्ण व्याकरण स्पष्ट करा.**

वहमाणी, रोवंतो, वड्ढंतो, नीहरंतो, विलवंतो, वज्जंतं

❑ ❑ ❑

५

पंचमो पाढो

# भिण्णधम्मियाणं पाणिग्गहणं

वर्तमानकाळात शिक्षणाच्या प्रभावाने आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांचा पुरस्कार केला जात असला तरीही ते या पाठात स्पष्ट केले आहे. ११ व्या शतकातल्या 'मूलशुद्धिप्रकरण' या ग्रंथात देवचन्द्रसूरींनी भिन्न धर्मातल्या वधूवरांचा विवाह शब्दबद्ध केला आहे. ते या पाठात स्पष्ट केले आहे. आपल्या परंपराप्राप्त जिनधर्मावर दृढ श्रध्दा असलेली पत्नी, आपले विचार पतीला तर्कशुद्धपणे पटवून देते. विविध धर्मसंप्रदायांचे सामाजिक अभिसरण जुन्या काळातही कसे होत होते - यावर प्रकाश टाकणारी ही कथा आहे !

---

अत्थि इहेव जंबुद्दीवे दीवे भारहे वासे वच्छाजणवयालंकारभूया कोसंबी णाम णगरी । तत्थ य महाधणवई धणदत्तो णाम सेट्ठी । तस्स य रूवाइगुणगणालंकिया जीवाऽजीवाइ-पयत्थ-वित्थर-वियक्खणा जिणसाहुपयपंकयमहुयरी अत्थि देवई णाम कण्णगा । सा य घरोवरि कंदुगलीलाए ललमाणी दिट्ठा पाडलीउत्त-पुरागय-भिक्खुभत्त-सिरिदत्तसेट्ठिसुएण देवाणंदेणं । तं च दट्ठूण विसमसर-सरपसर-निवाय-विहुरिज्जमाण-माणसेणं चिंतियमणेणं-'अहो ! रूवाइसओ, अहो ! कलाकोसल्लपगरिसो, ता वरावेमि एयं' ति । पेसिया णियपहाणपुरिसा तीए वरणत्थं । 'अण्णधम्मिओ' त्ति काऊण ण दिण्णा पिउणा । तओ तीए लोभेण संजाओ कवडसावगो । णिरंतर-सिद्धंत-आयन्नणाईहि य परिणओ सम्मं धम्मो, जाओ मेरु व्व णिप्पकंपो । तं च तारिसं दट्ठूण दिण्णा पिउणा से कण्णगा । समुव्वूढा य महाविभवेणं । गओ तं घेत्तूण सणगरं । ' भिण्णधम्माणि मायापियाणि' त्ति कयं जुयहरयं । तओ य-

जिणपूयण-वंदण-ण्हवण-जत्त-बलिकरणमाइणिरयस्स ।<br>
सज्झाय-ज्झाणपरायणस्स जइसेवणजुयस्स ।।१।।<br>
पत्तम्मि विविहदाणं देंतस्स कुतित्थिए चयंतस्स ।<br>
जा जाइ कोइ कालो जणणी-जणगाइ ता तस्स ।।२।।<br>
भणियाइं भिक्खुएहिं-'किं सो तुम्हाण संतिओ पुत्तो ।<br>
अच्चंतं भत्तो वि हु णाऽऽगच्छइ अम्ह पासम्मि ?' ।।३।।

तो तेहिं कहिओ सव्वो सवित्थरो से वुत्तंतो । भिक्खुएहिं भणियं - 'जइ एवं ता आणेह कह वि एगवारं, तओ पच्छा भलेस्सामि।' जणणि-जणएहि य भणिओ जहा - 'अम्हऽवरोहेण वि अज्ज णिच्छएणं गंतव्वं।' गुरुणिग्गहछिंडियं च चित्ते भाविऊण गओ सो । वंदिया भिक्खुणो विज्जाभिमंतियं च दिण्णं से तेहिं फलं । पुव्वब्भासेण य भक्खियमणेण । परावत्तियभावो य समागओ गेहं ।

भणियाणि माणुसाणि जहा - 'लहुं मम गिहे भिक्खूण भोयणं सज्जेह ।' तओ हट्ठ-तुट्ठाणि ताणि तहा काउमाढत्ताणि । देवई य भत्तुणो चलचित्तत्तणमसद्दहंती गया गुरुसमीवे । कहिओ वुत्तंतो । तेहि वि समप्पिओ पडिजोगो । दिण्णो तीए तस्स । जाओ सहावत्थो । तओ पुच्छियं तेण 'किमेयं ?' ति । माणुसेहिं भणियं - 'तए भिक्खूण भोयणं सज्जावियं' ति । तेण भणियं - 'णाहं जिणजइणो मोत्तूण अन्नेसिं धम्मट्ठा पयच्छामि ।' कहिओ य देवईए सव्वो वि परमत्थो । तओ 'गुरुणिग्गहेण मणागं छलिओ मि' त्ति भणंतेण 'फासुएसणिज्जं' ति काऊण पडिलाहिया मुणिणो ।

## शब्दार्थ व टीपा

**वच्छाजणवयालंकारभूया** (वि.) (स्त्री.) – वत्स नावाच्या जनपदाला (प्रदेशाला) अलंकारभूत असलेली (कौशांबी नगरी).

**जीवाऽजीवाइपयत्थ वियक्खणा** – जैन तत्त्वज्ञानात वर्णिलेल्या जीव-अजीव इ. पदार्थांच्या वर्णनात (ज्ञानात) (विचक्षण असलेली देवकी), सप्त पदार्थांची नावे – जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष.

**जिणसाहुपयपंकयमहुयरी** (वि.) (स्त्री.) – जिन आणि साधू यांच्या पदकमलांकडे आकृष्ट होणारी जणू मधुकरी (भ्रमरी).

**कंदुगलीला** (स्त्री.) – कन्दुकलीला, चेंडूचा खेळ.

**ललमाणी** – क्रि. 'लल', व का. धा. वि., स्त्रीलिंगी प्रथमा एकवचन, खेळणारी.

**पाडलीउत्त** – पाटलीपुत्र नावाचे नगर, आधुनिक बिहारमधील 'पाटणा'.

**विसमसर** (पुं.) – विषमशर, कामदेव, मदन.

**निवाय** (पुं.) – निपात, पडणे, कोसळणे.

**विहुरिज्जमाण-माणस** (वि.)– ज्याचे मन विह्वल झाले आहे असा.

**रूवाइसओ** (संधि) – रूव+अइसओ । रूपातिशय, उत्कृष्ट सौंदर्य.

**वरावेमि** (क्रि.) – 'वर', प्रयोजक, वर्तमानकाळ, प्रथम पुरुष एकवचन, विवाह करावयास लावेन.

**वरणत्थं** (क्रि. वि.) – वरण करण्यासाठी, विवाह करण्यासाठी.

**अण्णधम्मिओ** (वि.) (पुं.) – परधर्मीय.

**कवडसावगो** (समास) – कवडो सावगो । (कर्मधारय) कपट श्रावक, खोटा-खोटा श्रावक.

**सिद्धंतायन्नणाईहि** (संधि) – सिद्धंत+आयन्नण+आईहि । सिद्धांताचे श्रवण इत्यादींनी.

**परिणओ** – समजला, आकलन झाला.

**समुव्वूढा** – विवाह करून दिला.

**'भिन्नधम्माणि मायापियाणि' त्ति कयं जुयहरयं** – 'हिचे मातापिता वेगळ्या धर्माचे आहेत', असे म्हणून वेगळे घर करून दिले.

**जणणी-जणगाइ ता तस्स भणियाइं भिक्खुएहिं** – (देवानंदाच्या) मातापित्यांना त्यांच्या पुरोहितांनी म्हटले.

**भलेस्सामि** – पाहून घेईन, बघून घेईन.

**गुरुणिग्गहछिंडियं** – गुरूंनी (पुरोहितांनी) आग्रहपूर्वक छेडल्यामुळे.

**पुव्वब्भासेण** (क्रि. वि.) – पूर्व अभ्यासाने, जुन्या सवयीमुळे.

**भक्खियमणेण** (संधी) – भक्खियं+अणेण । त्याने खाल्ले.

**परावत्तियभावो** – वृत्ती पालटलेला, स्वभाव बदललेला (असा तो देवानंद).

**काउमाढत्ताणि** (संधि) – काउं+आढत्ताणि । (सांगितल्याप्रमाणे) करू लागले.

**भत्तुणो** – पतीचे.

**असद्दहंती** (वि.) (स्त्री.) – श्रध्दा नसलेली.

**पडिजोगो** – विशिष्ट मंत्र, तोडगा.

**जाओ सहावत्थो** – पुन्हा मूळ स्वभावात परत आला.

**णाहं पयच्छामि** – मी (भोजनदान) देणार नाही.

**मणागं छलिओ** – थोडासा विचलित झाला.

**फासुएसणिज्जं** – जैन साधूंना चालणारे प्रासुक आणि एषणीय असे अन्न.

**पडिलाहिया मुणिणो** – मुनींना भिक्षादान दिले.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) देवईए वरणत्थं देवानंदेण किं कयं ?

(२) देवानंदस्स मायापिउणा किंकारणेण तेसिं भिन्नघरयं कयं ?

(३) काए जुत्तीए देवानंदो सहावत्थो जाओ ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) कोणत्या प्रसंगी देवानंद देवकीच्या प्रेमात पडला ? पित्याने त्यांच्या विवाहास का नकार दिला ?

(२) देवकीच्या पित्याने अखेरीस देवानंद व देवकीचा विवाह का करून दिला.

(३) देवानंद व देवकीच्या धार्मिक आचरणाचे थोडक्यात वर्णन करा.

(४) ब्राह्मण भिक्षूंसाठी भोजन तयार करण्याची आज्ञा देवानंदने का दिली ? देवकीने त्याचे मन कसे वळविले ?

**प्र ३ : व्याकरण**

**अ) संधी सोडवा.**

चिंतियमणेणं, काउमाढत्ताणि, अम्हऽवरोहेण, पुव्वब्भासेण

**ब) रूपे ओळखा.**

मुणिणो, छलिओ, पुच्छियं, सज्जेह, भाविऊण

**विशेष अभ्यास**

जैन तत्त्वज्ञानातील सात पदार्थांची आणि नऊ तत्त्वांची नावे व त्यांचे अर्थ शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.

❑ ❑ ❑

छट्ठो पाढो

# ६ भगवंतस्स महावीरस्स विण्णाणं

'वैज्ञानिक दृष्टिकोणा'तून विचार करणे - हे आजच्या विज्ञानयुगाचे वैशिष्ट्य मानले जाते. परंतु अर्धमागधी साहित्यात, विज्ञानाधिष्ठित विचारांच्या तेजस्वी शलाका चमकताना दिसतात.

'आचारांग' या अर्धमागधी ग्रंथातील, 'वनस्पती व मनुष्य-यातील तुलना' - त्यात निहित असलेल्या वैज्ञानिक सत्यामुळे, अतिशय ज्ञानवर्धक झालेली दिसते. प्रस्तुत पाठात या तुलनेसंबंधीचा उतारा उद्धृत केला आहे.

भगवान महावीरांचे विज्ञानमय विचार आपल्याला निश्चितपणे विचार करायला लावतील.

---

अद्धमागही भासाए निबद्धा एगारह-अंगगंथा 'महावीरवाणी' नामेण सुपसिद्धा। नीई-धम्म-अज्झत्थपहाणा इमे गंथा भगवं महावीरस्स विण्णाणदिट्ठीए वि पगासगा संति।

अम्हाणं अहोभग्गेण, अद्धमागही-भासा-निबद्धे 'आयारंग' नामए गंथे वणस्सइजीवाणं माणुस्सेण तुलणा-पदं उवलब्भइ। आयारंगस्स 'सत्थ-परिण्णा' अज्झयणे कहियं -

"इमंपि जाइधम्मयं, एयंपि जाइधम्मयं।
इमंपि वुड्ढिधम्मयं, एयंपि वुड्ढिधम्मयं।
इमंपि चित्तमंतयं, एयंपि चित्तमंतयं।
इमंपि छिन्नं मिलाति, एयंपि छिन्नं मिलाति।
इमंपि आहारगं, एयंपि आहारगं।
इमंपि अणिच्चयं, एयंपि अणिच्चयं।
इमंपि असासयं, एयंपि असासयं।
इमंपि चयावचइयं, एयंपि चयावचइयं।
इमंपि विपरिणामधम्मयं, एयंपि विपरिणामधम्मयं।"

अणंतरं भ. महावीरेण वणस्सईणं रक्खणट्ठं, अम्हाणं आवाहणं कयं। 'रुक्खा रक्खियव्वा, रुक्खा संवड्ढियव्वा' इमो संदेसो भ. महावीरेण अड्ढइज्ज-सहस्स-वरिस-पुव्वमेव दिण्णो। णवरं वणस्सईसु किंतु पुढवी-जल-वाऊ-अग्गीमाईसु सव्वेसु एगिंदिएसु विवेगपुव्वय-ववहारस्स विण्णत्ती कया।

तीए विण्णत्तीए जइ अम्हे बहुमाणं करेमो ता आगमिस्स-काले सुहिणा होमो, ण अण्णहा।

आहुणिए काले एगूणवीसइमे सयए वणस्सइ-विसयगं संसोहणं 'सर जगदीशचन्द्र बसु' महाभागेण कयं ति वयं जाणामो। पओगसालासु नाणाविह-पओगेहिं बसु-महाभागेण इमं तच्चं संठावियं, जहा - 'मणुस्साणं इव वणस्सईणं वि विविहाओ भावभावणाओ संति।'

---

## शब्दार्थ व टीपा

**अज्झत्थपहाण** (वि.) – अध्यात्मप्रधान.
**विण्णाणदिट्ठीए** – मूळ नाम 'विण्णाणदिट्ठि', स्त्रीलिंगी सप्तमी एकवचन.
**पगासग** (वि.) – प्रकाशक, प्रकाश टाकणारा.
**एगूणवीसइमे सयए** – एकोणिसाव्या शतकात.
**इमं तच्चं संठावियं** – या तथ्याची (सत्याची) स्थापना केली.
**सत्थ-परिण्णा-अज्झयण** – शस्त्रपरिज्ञा अध्ययन,
**इमंपि जाइधम्मयं, एयंपि जाइधम्मयं** – यांचा (मनुष्यांचा) 'जन्मणे' हा धर्म आहे आणि यांचाही (वनस्पतींचाही) 'जन्मणे' हा धर्म आहे.
**वुड्ढिधम्मयं** – 'वाढणे' हा ज्यांचा धर्म आहे असे (मनुष्य व वनस्पती)
**चित्तमंतयं** – 'सजीव असणे' हा ज्यांचा धर्म आहे असे.
**छिन्नं मिलाति** – तोडल्याने म्लान होतात.
**आहारगं** – 'आहार करणे' हा ज्यांचा धर्म आहे.
**चयावचइयं** – 'चयापचय' हा ज्यांचा धर्म आहे
**विपरिणामधम्मयं** – परिणमशील असणे अर्थात् वेगवेगळ्या अवस्थांमधून जाणे, हा ज्यांचा धर्म आहे.
**अड्ढतइज्ज-सहस्स-वरिस-पुव्वं** – अडीच हजार वर्षापूर्वी.
**आगमिस्स काले** – आगामी काळात, भविष्यकाळात.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइय-भासाए उत्तराणि लिहह ।**

(१) एगूणवीसइमे सयए वणस्सइविसयगं संसोहणं केण कयं ?
(२) बसु-महाभागेण वणस्सईणं विसए किं सच्चं संठावियं ?
(३) भगवं महावीरेण रुक्खाणं विसए को संदेसो दिण्णो ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भगवान महावीरांनी वनस्पती आणि माणसांची केलेली तुलना, आपल्या शब्दात लिहा.
(२) भगवान महावीरांच्या कोणत्या संदेशाचे पालन करणे, मानवी भविष्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे ?

**प्र. ३ : संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(१) मणुस्साणं इव वणस्सईणं वि विविहाओ भावभावणाओ संति।

**प्र ४ : व्याकरण**

**(अ) पुढील समासांचा विग्रह करून नावे लिहा.**

महावीरो, महावीरवाणी, जाइधम्मयं, चित्तमंतयं, भावभावणाओ

**(ब) कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द निवडून वाक्ये पूर्ण लिहा.**

(१) (महावीरो / महावीरेण) पण्णाए धम्मस्स परिक्खा कया ।
(२) महावीराणं उवएसस्स अम्हे बहुमाणं (करेमि / करेमो) ।
(३) भगवईसुत्तस्स पढमस्स पगरणस्स छट्ठे (उद्देसं / उद्देसे) वाउज ल विसए एगो दिट्ठंतो विज्जइ ।
(४) सव्वे जीवा जीविउं (इच्छंति / इच्छइ) ।
(५) भद्दाए खेमकुसलं (पुच्छिउं / पुच्छिऊण) राया आगओ ।

❑ ❑ ❑

७

सत्तमो पाढो

# ‘गांधीवाद’स्स मूलतत्ताइं

भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासात राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे स्थान अनन्यसाधारण आहे. गुजरातमधील पोरबंदर येथील एका सुसंस्कृत, प्रतिष्ठित वैश्य कुटुंबात त्यांचा जन्म झाला (२ ऑक्टोबर १८६९). सत्य आणि अहिंसेचे संस्कार त्यांच्यावर बालपणीच झाले. पुढे वाचन, चिंतन, लेखन आणि प्रयोगशीलता यांच्या सहाय्याने त्यांनी सत्य-अहिंसा ही मूलतत्त्वे सामाजिक-राजकीय क्षेत्रात उपयोजित केली.

समता, श्रमप्रतिष्ठा, स्वावलंबन, स्वदेशी, स्वराज्य आणि सत्याग्रह यांचा त्यांनी वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात प्रयोग केला आणि त्यावर आधारित असे विपुल लेखनही केले. आपल्या विचारांचा, संपूर्ण जगातील विचारवंतांवर ठसा उमटवू शकलेल्या, काही ख्यातिप्राप्त व्यक्तींमध्ये महात्मा गांधीजींची गणना होते. त्यांच्या जीवन-तत्त्वज्ञानाचा भारतात आणि भारताबाहेरही खूप अभ्यास झाला. त्याचे फलित म्हणून ‘गांधीवादा’ची मांडणी करण्यात आली. मराठी विश्वकोशातील नोंदीच्या आधारे आपण, या पाठात, गांधीवादाची मूलतत्त्वे, यथाशक्ती समजून घेण्याचा प्रयत्न करू.

---



अम्हाणं भारहदेसे पाईणकालाओ आरब्भ विविहा वियारपरंपरा पाउब्भूया । ‘अत्थिय-नत्थिय’ नामेण तासु नव-परंपरा ‘दंसण’ रूपेण थिरहूया । मज्झजुगे, आहुणियकाले वि पण्णाणमंतेहिं कालाणुरूवेहिं वियारधाराहिं समकालीणाणं जीवणववहारो सामिद्धिं नीओ । तासु सव्वासु आहुणिय-वियार-धारासु ‘गांधीवादो’ अग्ग-गणणीओ पहाव-संपण्णो य दीसइ ।

गांधीवादो सव्वट्ठेण अज्झत्थपहाणो अज्झत्थाहारो विज्जइ । किंबहुणा ‘गांधीवादो’ सयमेव अज्झत्थवाओ । केइ कहेंति, ‘गांधीवादो’ जीवण-जावणस्स विसिट्ठा पद्धई अत्थि, न कोइ सतंतो वाओ, तहवि तस्स महत्तणं न उवेक्खणीयं । सव्वेसु जयपसिद्धेसु विस्सविज्जालएसु वियारवंतेहिं गांधीवादो बहुमण्णिओ, अज्झयणपणालिं च आणीओ ।

जइवि गांधीमहाभागा हिंदुधम्म-परिपालणतप्परा तहवि सव्वाणं धम्माणं तत्तरूवेण एकरूवया तेहिं पडिवाइया । तेहिं विविह-वक्खाण-लेहण-पोत्थएसु कहियं-

सव्वे धम्मिया गंथा मणुस्सणिम्मिया । अओ माणवाणं गुण-दोसा मज्जायाओ च सेतु पडिबिंबिया । अहिंसा-सच्च-अचोरिय-बंभचेर-अपरिग्गहा सव्वेसु नीइनियमेसु पहाणा । ईसरो सयंसिद्धो, सयंपगासगो, इंदिय-बुद्धीणं अईओ । तक्क-अणुमाणाइ पमाणाणि ईसरस्स अत्थित्ते अणुवजुत्ताणि । तवेण, वेरग्गेण च जस्स मणं विसुद्धं होइ, तहिं ईसरो पयडीभवइ । नानक-कबीर-तुलसीदास-चैतन्यप्रभु-रामदास-तुकारामाइ संतपवरेहिं ईसराणुभूई पच्चक्खीकया । ईसरो सव्वजीवाणं अंतरप्पा । अहंभावस्स संपुण्ण-विलएण जा चेयणा सरीरे अवसिट्ठा हवइ सा ईसरसरूवा । समग्गा विस्सरयणा ईसरस्स लीला ।

ईसरो सच्चसरूवो, सच्चमेव ईसरो । ईसरो जयस्स उप्पत्ति-ठिइ-लयाणं कत्ता, जयस्स नियंता । ईसरस्स पइ भत्ति-पेम्मभावो धारियव्वो हवइ । सच्चस्स अणुसंधाणं नणु ईसरभत्तीए एव अण्णं रूवं । एयं तत्तं मणंसि काऊण गांधीमहाभागेण ‘सच्चस्स पओगा’ नामेण अत्तणो चरित्तं लिहियं ।

अहिंसा मणुस्सवंसस्स जीवणधम्मो । मणुयाणं सह-अत्थित्तं अहिंसाए पइट्ठियं । आसत्ति-मोह-रहिएण जीवणेण, अहिंसातत्तस्स पालणेण मणुयाणं माणस-भावाणं उण्णयणं होइ । जीवदयापहाणेण माणवेण सामिसो आहारो सव्वया वज्जणीओ । बंभचेरस्स पालणं अहिंसासिद्धंतस्स एव अण्णयरं रूवं । स-दार-संतोसवयस्स पालणं संजमस्स अब्भसणट्ठं

आवस्सयं । संपुण्ण बंभचेर-पालणं सण्णासधम्मस्स हिययं ।

गांधीमहाभागस्स 'सच्चग्गाहो' एवं 'सव्वोंदयवादो' - सच्चअहिंसातत्ताणं सामाइयखेत्ते रायनीइखेत्ते कोसल्लपुव्वयं उवयोजणं अत्थि । तेसिं अत्थविसयगेसु समया-बंधुया तहा य 'टट्ठीसिप' संबंधिणो वियारा अखिलविस्से सुपसिद्धा, अत्थचिंतगेहिं पसंसिया ।

सच्चं खलु 'गांधीवाद'स्स मूलतत्ताइं भारहदेसस्स उण्णइं साहेउं समत्थाइं, समकालमेव अत्तणिब्भर-अज्झत्थ-सिद्धंतस्स अणुऊलाइं संति ।

---

## शब्दार्थ व टीपा

**मूलतत्ताइं** (नपुं.) - मूलतत्त्वे.
**पाइणकालाओ आरब्भ** - प्राचीन काळापासून आरंभ करून.
**पाउब्भूया** - प्रादुर्भूत झाल्या.
**अत्थिय-नत्थिय** - आस्तिक-नास्तिक.
**नव** - नऊ.
**थिरहूया** - स्थिर झाल्या.
**मज्झजुगे** - मध्ययुगात.
**आहुणियकाले** - आधुनिक काळात.
**अज्झत्थ** - अध्यात्म.
**आहार** - आधार.
**अईओ** - अतीत, पलीकडचा.
**सच्चस्स पओगा** - 'सत्याचे प्रयोग', म. गांधीजींचे आत्मचरित्र.
**सामिसो आहारो** - सामिष आहार, मांसाहार.
**सामाइयखेत्ते** - सामाजिक क्षेत्रात.
**रायनीइखेत्ते** - राजनीतीच्या क्षेत्रात.
**कोसल्लपुव्वयं** (क्रि. वि.) - कौशल्यपूर्वक.
**उवजुंजण** - उपयोजन, उपयोग.
**अखिलविस्से** - अखिल विश्वात.
**अत्थचिंतग** - अर्थचिंतक, अर्थशास्त्रज्ञ.
**उण्णइं साहेउं** - उन्नती साधण्यासाठी.
**अत्तणिब्भर** - आत्मनिर्भर, स्वावलंबी.
**अणुऊलाइं** - अनुकूल.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**
(१) गांधीवादस्स अज्झत्थसमं को संबंधो ?
(२) सव्वेसु नीइनियमेसु के पहाणा संति?
(३) ईसरस्स सच्चेण सह को संबंधो ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**
(१) महात्मा गांधीजींचे अहिंसेसंबंधीचे विचार पाठाच्या आधारे स्पष्ट करा.
(२) गांधीवादाची पार्श्वभूमी कोणत्या ईश्वरविषयक विचारांनी तयार झाली ?

**प्र. ३ : व्याकरण**
**अ) रूपे ओळखा.**
नीओ, दीसइ, कहेंति, धारियव्वो, सिद्धंतस्स
**ब) संधी सोडवा.**
अज्झत्थाहारो, तुकारामाइ, ईसराणुभूई

### विशेष अभ्यास

(i) पुण्यात येरवडा येथे असलेल्या आगाखान पॅलेसला भेट द्या.
(ii) महात्मा गांधीजींचे जीवनविषयक तत्त्वज्ञान समजून घ्या.

❑ ❑ ❑

अट्ठमो पाढो

# ८ असोगराइणो बारहमो पत्थरलेहो

भारताच्या प्राचीन इतिहासात मौर्य सम्राट अशोकाचे स्थान (इ. स. पू. तिसरे शतक) अद्वितीय असे आहे. अशोकाच्या शिलालेखांपासून भारतीय इतिहासाचे सुवर्णयुग सुरू झाले. भारताच्या चारही टोकांस त्याचे लेख (शिलालेख) सापडल्यामुळे त्याच्या राज्याचा विस्तार संपूर्ण भारतभर होता. एकूण सहा ठिकाणी हे शिलालेख असून, त्या प्रत्येकात सामान्यत: चौदा राजाज्ञा कोरलेल्या आहेत. त्यापैकी गिरनारच्या शिलालेखातील बारावा शिलालेख प्रस्तुत पाठासाठी निवडला आहे. सध्याच्या काठेवाडमधील जुनागढपासून पूर्वेस दीड कि. मी. अंतरावर गिरनार पर्वताजवळ एक मोठी शिळा आहे. त्यावर सम्राट अशोकाच्या चौदा राजाज्ञा ब्राह्मी लिपीत कोरलेल्या आहेत. यातील भाषा प्राकृत असून ती पाली भाषेच्या जवळची आहे.

शिक्षक आणि विद्यार्थी दोघांच्या सोयीसाठी या पाठातील बाराव्या शिलालेखाचा मराठीत अर्थ दिला असून, विवेचक टीपाही पाठाच्या अखेरीस दिल्या आहेत त्यातून राजाचे व समाजाचे धार्मिक संबंध कसे असले पाहिजेत ते स्पष्ट होते.

---

१. देवानं पिये पियदसि राजा सवपासंडानि च पवजितानि च घरस्तानि च पूजयति दानेन च विवाधाय च पूजाय पूजयति ने (१)

२. न तु तथा दानं व पूजा व देवानं पियो मंञते यथा किती सारवढी अस सवपासंडानं (२) सारवढी तु बहुविधा (३)

३. तस तु इदं मूलं य वचगुती किंती आत्पपासंडपूजा व परपासंडगरहा व नो भवे अप्रकरणम्हि लहुका व अस

४. तम्हि तम्हि प्रकरणे (४) पूजेतया तु एव परपासंडा तेन तन प्रकरणेन । एवं करु आत्मपासंडं च वढयति परपासंड च उपकरोति (५)

५. तदंञथा करोतो आत्पपासंड च छणति परपासंडस च पि अपकरोति (६) यो हि कोचि आत्पपासंडं च पूजयति परपासंडं व गरहति

६. सवं आत्पपासंडभतिया किंति आत्पपासंडं दीपयेम इति सो च पुन तथा करातो आत्मपासंडं बाढतरं उपहनाति (७) त समवायो एव साधु

७. किंति अञमंञस धंमं स्रुणारु च सुसुंसेर च (८) एवं हि देवानंपियस इछा किंति सवपासंडा बहुस्रुता च असुकलाणागमा च असु (९)

८. ये च तत्र तत प्रसंना तेहि वतव्यं (१०) देवानंपियो नो तथा दानं व पूजां व मंञते यथा किंति सारवढी अस सर्वपासडानं (११) बहका च एताय

९. अथा व्यापता धंममहामाता च इथीझखमहामाता च वचभूमीका च अञे च निकाया (१२) अयं च एतस फल य आत्पपासंडवढी च होति धंमस च दीपना (१३)

---

## शब्दार्थ व टीपा

**सवपासंड** – सर्वपार्षद, सर्व धर्मसंप्रदाय.
**पवजितानि** – प्रव्रजित, संन्यासी.
**घरस्तानि** – गृहस्थ, गृहस्थाश्रमी, संसारी लोक.

**विवाधाय** – विविध प्रकारचे.
**मंञते** – मानतो, महत्त्व देतो.
**सारवढी/सारवडी** – सारवृद्धी, भरभराट.

**वचिगुती** - बोलण्यातील संयम.
**आत्पपासंडपूजा** - आत्मपार्षदपूजा, स्वधर्मपूजा.
**परपासंडगरहा** - परधर्माची निंदा.
**अप्रकरणम्हि** - अप्रासंगिक, प्रसंग नसताना.
**लहुका** - लघुका, संयमित.
**प्रकरणे** - प्रसंगांमध्ये.
**वढयति** - वर्धयति, वृद्धी करतो.
**तदंञथा** - ह्याच्या विरुद्ध.
**छणति** - हानी करतो.
**गरहति** - निंदा करतो.
**आत्पपासंडभतिया** - स्वधर्मावरील भक्तीने.
**दीपयेम** - 'उज्ज्वल करू' या इच्छेने.
**बाढतरं** - अधिक, जास्त.
**उपहनाति** - हानी करतो.
**अञमंञस** - अन्यमन्य, एकमेकांची, परस्पर.
**स्रुणारु** - ऐकावेत.
**सुसुंसेर** - आचरणात आणावेत.
**बहुस्रुता** - बहुश्रुत.
**कलाणगामा** - कल्याणकारी.
**असु** - असावेत.
**प्रसंना** - प्रसन्न, भक्तियुक्त.
**वतव्यं** - व्यक्त करावे, मागावे.
**धंममहामाता** - धर्म-महामात्र, धार्मिक अधिकारी.
**इथी-झख-महामाता** - स्त्री-अध्यक्ष-महामात्र, महामात्र म्हणून नेमलेली महिला.
**वचभूमिका** - व्रजभूमीका.
(धर्ममहामात्र, स्त्री-अध्यक्ष-महामात्र आणि व्रजभूमीक- ही तीन अधिकारपदे अशोकाने उत्तम राज्यशासनासाठी निर्माण केली होती. त्यांच्या माध्यमातून राज्यशासन चालत असे.)

## गिरनारच्या बाराव्या लेखाचा सुलभ मराठी अनुवाद :

**(मूळ उताऱ्यात (१), (२) - असे आकडे जेथे दिले आहेत, तेथे अर्थाच्या दृष्टीने वाक्य पूर्ण होते. त्याप्रमाणे अनुवाद दिला आहे.)**

(१) देवांचा लाडका प्रियदर्शी राजा सर्व धर्मसंप्रदाय, संन्यासी आणि गृहस्थाश्रमी लोकांचा दान देऊन आणि विविध प्रकारचे सन्मान देऊन, मानमरातब राखतो.
(२) देवांचा लाडका राजा, दान आणि सन्मान यापेक्षा सर्व संप्रदायांच्या तत्त्वप्रणालींच्या अर्थपूर्ण वृद्धीला जास्त महत्त्व देतो.
(३) ही सारवृद्धी निरनिराळ्या अंगांनी होते.
(४) वाचेचा संयम हे त्याचे मूळ आहे. स्वधर्मस्तुती आणि परधर्मनिंदा अप्रासंगिक असू नयेत आणि त्याही
(५) त्या त्या वेळी संयमित असाव्यात.
(६) प्रत्येक वेळी दुसऱ्या संप्रदायांचा यथायोग्य सन्मान केला पाहिजे.
(७) अशा तऱ्हेने वागणूक करणारा मनुष्य आपल्या धर्माची वृद्धी करतो आणि दुसऱ्या धर्मांना उपकृत करतो.
(८) याच्या विपरीत वागणारा आपल्या संप्रदायाचे नुकसान करतो आणि दुसऱ्या संप्रदायांवर अन्याय करतो.
(९) आपला संप्रदाय उज्ज्वल करण्याच्या इच्छेने आणि त्यावरील भक्तीने जो स्वधर्मस्तुती आणि परधर्मनिंदा करतो, तो स्वधर्माचीच जास्त हानी करतो.
(१०) म्हणून समन्वय योग्य आहे.
(११) म्हणून परस्परांची धर्मतत्त्वे ऐकावीत व त्यांचे पालन करावे. सर्व धर्मसंप्रदाय बहुश्रुत आणि कल्याणकारी सिद्धांतांचे असावेत अशीच देवांच्या लाडक्या राजाची इच्छा आहे. ज्याची आपल्या संप्रदायावर भक्ती आहे त्याने असे सांगावे.
(१२) देवांचा लाडका राजा सर्वसंप्रदायांच्या तत्त्ववृद्धीला, दान आणि पूजा यांपेक्षा जास्त महत्त्व देतो.
(१३) या कारणास्तव धर्ममहामात्र, स्त्री-अध्यक्ष-महामात्र आणि व्रजभूमीक असे निरनिराळे अधिकारी नेमलेले आहेत.

**विशेष टीप :**

सम्राट अशोकाने राज्याभिषेकानंतर बारा वर्षांनी प्रजेच्या सुखासाठी आणि हितासाठी धर्माज्ञा कोरविल्या. प्रस्तरांवर कोरून ठेवल्याने त्या अजरामर झाल्या. प्रस्तुत लेखात सम्राट अशोकाच्या सर्वधर्मसमभावाची झलक स्पष्टपणे दिसते. व्यक्तिस्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य आणि सहिष्णुतेचा तो पुरस्कर्ता होता. 'स्त्री-अध्यक्ष-महामात्रां'ची नेमणूक सम्राट अशोकाच्या स्त्री-पुरुष-समानतेच्या दृष्टिकोणाचे द्योतक मानावयास हवी.

## स्वाध्याय

**प्र. १ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) प्रियदर्शी राजा धार्मिक संप्रदायांचा सन्मान कसा करत होता ?

(२) धर्माची सारवृद्धी कशा प्रकारे होते ?

(३) संप्रदायाची हानी कशामुळे होते ?

(४) संप्रदायांच्या सारवृद्धीसाठी प्रियदर्शी राजाने कोणता अधिकारीवर्ग नियुक्त केला होता ?

**प्र. २ :** या पाठाचा सारांश सुमारे २० ओळीत लिहा.

## विशेष अभ्यास

शिक्षकांच्या मदतीने 'सम्राट अशोक' - या विषयावर सचित्र प्रकल्प तयार करा.

❑ ❑ ❑

नवमो पाढो

# ९ अरिउत्तो परकेरओ संवुत्तो

अभिजात संस्कृत प्राकृत नाटककारांमध्ये अग्रपूजेचा मान 'भास' नाटककाराकडे जातो. ते भगवान महावीर आणि भगवान गौतमबुद्धांच्यानंतर आणि 'कविकुलगुरु कालीदासा'च्या अगोदर होऊन गेले असावेत. भासाच्या पाच एकांकिका साहित्यिक दृष्टीने अप्रतिम आहेत. त्याखेरीज त्याने प्रतिमा, अभिषेक, पञ्चरात्र आदि अनेक नाटकेही लिहिली. त्यापैकी 'प्रतिज्ञायौगन्धरायणम्' आणि स्वप्नवासवदत्तम्' ही नाटके कथानकाच्या दृष्टीने पाठोपाठ लिहिलेली आहेत. त्यातही 'स्वप्नवासवदत्तम्' हे सहा अंकांचे नाटक, त्याची सर्वश्रेष्ठ नाट्यकृती मानली जाते.

प्रस्तुत पाठातील नाट्य-उतारा 'स्वप्नवासवदत्तम्' नाटकातील तिसरा अंक आहे. हा अंक त्यामानाने छोटा असल्याने संपूर्ण घेतला आहे.

उज्जयिनीचा राजा उदयन, प्रद्योतराजाच्या कन्येचे-वासवदत्तेचे अपहरण करून उज्जयिनीस आणतो. अर्थात् वीणावादनाच्या निमित्ताने ते दोघे एकमेकांच्या प्रेमात पडलेले असतातच. विवाहानंतर वासवदत्तेच्या प्रेमात आकंठ बुडालेला राजा, राज्यकारभाराकडे दुर्लक्ष करू लागतो. परिणामी त्याचा प्रदेश शत्रुराजा जिंकून घेतो. उदयनाचा मंत्री 'यौगन्धरायण' मोठ्या कौशल्याने एक युक्ती योजतो. मगधराजाची पुत्री 'पद्मावती'-हिचा विवाह उदयनाशी घडून आल्यास, पराक्रमी मगधराजाच्या मदतीने राज्यही परत मिळणार असते आणि वासवदत्तेच्या प्रेमातूनही उदयन बाहेर येणार असतो.

यौगन्धरायणास माहीत असते की वासवदत्तेला दूर केल्याशिवाय हे कदापीही शक्य नाही. उदयन शिकारीला गेल्यावर तो वासवदत्तेला घेऊन बाहेर पडतो. तिला सर्व योजना समजावतो. 'ते दोघे अग्नीत भस्मसात झाले', अशी वदंता पसरवितो. उदयन शोकाकुल होतो. त्याचवेळी यौगन्धरायण वासवदत्तेसह मगधदेशास जातो. मगधराजाशी उदयन – पद्मावतीच्या विवाहाची बोलणी करतो. वासवदत्तेविषयीचे सर्व लोकापवाद टाळण्यासाठी, एका चारित्र्यसंपन्न तापसीच्या मदतीने, वासवदत्तेला पद्मावती राजकन्येकडेच 'ठेव' (न्यास) म्हणून ठेवतो. ती राजकन्येच्या अंत:पुरात राहू लागते.

वासवदत्तेच्या तेथील वास्तव्यातच उदयन-पद्मावतीची विवाहघटिका जवळ येते. विवाहमाला गुंफण्याची कामगिरी वासवदत्तेवर येते. त्यावेळी, सर्व काही योजना माहीत असूनही, वासवदत्तेच्या मनात भावनांचे कल्लोळ उमटतात. त्याचे चित्रीकरण प्रस्तुत उताऱ्यात केले आहे. 'अय्यउत्तो परकेरओ संवुत्तो'-या शीर्षकाचा अर्थ आहे – 'आर्यपुत्र (माझे पती) (आता) परके झाले.'

प्रस्तुत उताऱ्यातील संभाषण 'शौरसेनी' प्राकृत भाषेत आहे. या उताऱ्यातील सर्व रंगसूचना संस्कृत भाषेत आहेत.

---

(तत: प्रविशति विचिन्तयन्ती वासवदत्ता ।)

**वासवदत्ता** – विवाहामोदसंकुले अंतेउरचउस्साले परित्तजिअ पदुमावदिं इह आअदम्हि पमदवणं । जाव दाणिं भाअधेअणिव्वुत्तं दुक्खं विणोदेमि । (परिक्रम्य) अहो अच्चाहिदं ! अय्यउत्तो वि णाम परकेरओ संवुत्तो । जा उवविसामि । (उपविश्य) अय्यउत्तं पेक्खामि त्ति एदिणा मणोरहेण जीवामि मंदभाआ ।

(तत: प्रविशति पुष्पाणि गृहीत्वा चेटी)

**चेटी** – कहिं णु खु गदा अय्या आवंतिआ ? (परिक्रम्य अवलोक्य) अम्मो ! इयं चिंतासुण्णहिअआ अमंडिद-भद्दवेसं धारअंदी अंबरुक्खसिलापट्टए उवविट्ठा । जाव उवसप्पामि (उपसृत्य) अय्ये आवंतिए ! को कालो तुमं अण्णेसमि ।

**वासवदत्ता** – किं णिमित्तं ?

**चेटी** – अम्हाणं भट्टिणी भणादि महाकुलप्पसूदा सिणिद्धा णिउणा त्ति इमं दाव कोदुअमालिअं गुम्हदु अय्या।

**वासवदत्ता** – अह कस्स किल गुम्हिदव्वं ?

**चेटी** – अम्हाअं भट्टिदारिआए ।

**वासवदत्ता** (आत्मगतम्) – एदं पि मए कत्तव्वं आसी । अहो अकरुणा खु इस्सरा ।

चेटी – अय्ये ! मा दाणिं अण्णं चिंतिअ ! एसो जामादुओ मणिभूमिए ण्हाअदि । सिग्घं दाव गुम्हदु अय्या । (आर्ये ! मा इदानीं अन्यत् चिन्तयित्वा । एष जामाता मणिभूम्यां स्नायति । शीघ्रं तावद गुम्फत्वार्या।)

वासवदत्ता (आत्मगतम्) – न सक्कुणोमि अण्णं चिंतेदुं । (प्रकाशम्) हला ! किं दिट्ठो जामादुओ ?

चेटी – आम्, दिट्ठो भट्टिदारिआए सिणेहेण अम्हाअं कोदूहलेण अ ।

वासवदत्ता – कीदिसो जामादुओ? (कीदृशो जामाता?)

चेटी – अय्ये ! भणामि दाव, ण ईरिसो दिट्ठपुरुवो । सक्कं भणिदुं सक्खं कामदेवो त्ति । (शक्यं भणितुं साक्षात् कामदेव इति ।)

वासवदत्ता – होदु एत्तअं ।

चेटी – किण्णिमित्तं वारेसि ?

वासवदत्ता – अजुत्तं परपुरुससंकित्तणं सोदुं ।

चेटी – तेण हि गुम्हदु अय्या सिग्घं ।

वासवदत्ता – इअं गुम्हामि । आणहि दाव ।

चेटी – गेण्हदु अय्या ।

वासवदत्ता – (एकां ओषधिं वर्जयित्वा विलोक्य) इमं दाव ओसहिं किं णामा?

चेटी – अविहवाकरणं णाम।

वासवदत्ता (आत्मगतम्) – इदं बहुसो गुम्हिदव्वं मम अ पदुमावदीए अ। (प्रकाशम्) इमं दाव ओसहिं किं णामा?

चेटी – सवत्तिमद्दणं णामा ।

वासवदत्ता – इदं ण गुम्हिदव्वं ।

चेटी – कीस ?

वासवदत्ता – उवरदा तस्स भज्जा, तं निप्पओअणं त्ति ।

(प्रविश्य अपरा)

चेटी – तुवरदु तुवरदु अय्या । एसो जामादुओ अब्भंतरचदुस्सालं पवेसीअदि ।

वासवदत्ता – अइ ! वदामि, गेण्ह एदं ।

चेटी – सोहणं अय्ये ! गच्छामि दाव अहं ।

वासवदत्ता – गदा एसा । अहो ! अय्यउत्तो वि णाम परकेरओ संवुत्तो । अविदा सय्याए मम दुक्खं विणोदेमि जदि णिद्दं लभामि ।

## शब्दार्थ व टीपा

**विवाहामोदसंकुले** (संधि) – विवाह+आमोदसंकुले । विवाहाच्या हर्षाने युक्त.
**चउस्साले** – चौकात, प्रांगणात.
**पदुमावदी** – 'पद्मावती', मगध राजकन्येचे नाव.
**पमदवणं** – प्रमदवन, उद्यान, बगीचा.
**भाअधेअणिव्वुत्तं दुक्खं** – नशिबाने प्राप्त झालेले दु:ख.
**विणोदेमि** – हलके करीन, दूर करीन.
**परिक्रम्य** – ही रंगसूचना आहे. वळून, आजूबाजूला नजर टाकून.
**अच्चाहिदं** – 'अरेरे !' असे दु:खोद्‌गार.
**चेटी** – अंत:पुरातील दासी.
**अय्या** – आर्या.
**आवंतिआ** – 'आवंतिका', वासवदत्तेचे अज्ञातवासातील नाव.
**अमंडिद–भद्दवेसं–धारअंदी** – अलंकार धारण न केलेली आणि साधा वेष धारण केलेली.
**अंबरुक्खसिलापट्टए** – आम्रवृक्षाखालील शिलातलावर, पारावर.
**अण्णेसामि** (क्रि.) – 'अण्णेस', वर्तमानकाळ, प्रथम पुरुष एकवचन, शोध घेते.
**भट्टिणी** – स्वामिनी.
**सिणिद्धा** – स्निग्ध, मायाळू.
**कोदुअमालिआ** – कौतुकमालिका, शुभसूचक वरमाला.
**गुम्ह** (क्रि.) – गुंफणे.
**भट्टिदारिआ** – भर्तृदारिका, स्वामीची कन्या, बाईसाहेब.
**जामादुओ मणिभूमिए ण्हाअदि** – जावई रत्नखचित स्नानगृहात स्नान करीत आहे.
**दिट्ठपुरुवो** – दृष्टपूर्व, पूर्वी कधी न पाहिलेला.
**सक्खं** (अ.) – साक्षात्, प्रत्यक्ष.
**किण्णिमित्तं वारेसि ?** – का म्हणून निवारण करीत आहेत, अडवीत आहेस ?
**ओसहि** (स्त्री.) – ओषधि, विशेष गुणांनी युक्त अशी वनस्पती.
**अविहवाकरण** – अविधवाकरण अर्थात् सौभाग्य प्रदान करणारी वनस्पती.
**सवत्तिमद्दण** – सपत्नीमर्दन अर्थात् सवतीचा नाश करणारी वनस्पती.
**उवरदा** (क्रि.) – 'उव+रम', क. भू. धा. वि., स्त्रीलिंगी प्रथमा एकवचन, मरण पावली.
**भज्जा** – भार्या, पत्नी.
**तुवरदु तुवरदु** – त्वरा करा, घाई करा.
**अविदा** – हाय ! अरेरे !
**सय्याए मम दुक्खं विणोदेमि** – जरा अंथरूणावर पडून दु:ख हलके करण्याचा प्रयत्न करते.

## स्वाध्याय

**प्र. १ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) संस्कृत नाटककारांमध्ये भासाचे स्थान कोणते आहे ?
(२) भासांच्या कोणत्याही तीन नाटकांची नावे लिहा.
(३) वासवदत्तेची मानसिक स्थिती कोणत्या प्रसंगामुळे बिघडलेली आहे ?

**प्र. २ : व्याकरण**

**पुढील शब्दांना उताऱ्यात आलेले प्राकृत प्रतिशब्द लिहा.**
आमोद, पद्मावती, आर्यपुत्र, वेष, कौतुकमालिका, जामातृक, दर्शनीय, निष्प्रयोजन, चतु:शाल, शोभन, शय्या, निद्रा.

## विशेष अभ्यास

**पुढील पाच वाक्यांचा प्राकृतात अनुवाद करा.**

(१) भास कवीने 'स्वप्नवासवदत्त' हे नाटक लिहिले.
(२) 'वासवदत्ता' ही प्रद्योत राजाची मुलगी होती.
(३) मंत्र्याने वासवदत्तेला 'आवन्तिका' असे नाव दिले.
(४) उदयन राजा मगधाच्या राजाचा जावई झाला.
(५) उदयनाच्या दुसऱ्या विवाहाने वासवदत्ता दु:खी झाली.

❑ ❑ ❑

# पज्ज–विभागो

पढमो पाढो

१

## सुवयणाइं

सुवचने, सुभाषिते किंवा सूक्ती हे भारतीय संस्कृतीतील जन्मलेल्या सर्व भाषांची खास देणगी आहे. अर्धमागधी भाषेतील ग्रंथांमध्ये, अशी सुवचने विपुल प्रमाणात आढळतात. वस्तुत: हे ग्रंथ धार्मिक आणि उपदेशात्मक आहेत. तरीही आपले वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवन जगण्यास त्यातील शाश्वत नीतिमूल्ये दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरतात.

या पाठातील काही अर्धमागधी सुवचने (गाथा) सूत्रकृतांग, उत्तराध्ययन, दशवैकालिक–अशा मूलग्रंथांतून घेतली आहेत. इतर काही सुवचने मूलग्रंथांवर आधारित अशा टीका (भाष्य) वजा ग्रंथातून घेतलेली आहेत. यातील सुवचनातून उद्योजकतेची प्रेरणा मिळते. आदर्श शिक्षकाचे जीवनध्येय दीपकाच्या दृष्टांतातून स्पष्ट होते. आहार आणि आरोग्याच्या जाणिवा जागृत होतात. येथे दिलेल्या गाथांपैकी दोन गाथांमधून व्यसनमुक्तीचा संदेश दिला आहे. विनम्रतेचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी दिलेल्या मेघ, वृक्ष आणि पिकांच्या दृष्टांतातून नीतिबोध प्राप्त होतो.

**आत्मप्रशंसा – परनिंदा :**

सयं सयं पसंसंता, गरहंता परं वयं ।
जे उ तत्थ विउस्संति, संसारं ते विउस्सिया ।।१।।

**कूर्मदृष्टांत :**

जहा कुम्मे सअंगाइं, सए देहे समाहरे ।
एवं पावाइं मेहावी, संजमेण समाहरे ।।२।।

**जागृती :**

जागरह नरा ! णिच्चं, जागरमाणस्स वड्ढते बुद्धी ।
सो सुवति ण सो धन्नो, जो जग्गति सो सया धन्नो ।।३।।

**आदर्श शिक्षक :**

जह दीवा दीवसयं, पइप्पए सो य दिप्पए दीवो ।
दीवसमा आयरिया, दिप्पंति परं च दीवेंति ।।४।।

**आरोग्य :**

हियाहारा मियाहारा, अप्पाहारा य जे नरा ।
न ते विज्जा तिगिच्छंति, अप्पाणं ते तिगिच्छगा ।।५।।

**दुर्लक्ष :**

अणथोवं वणथोवं, अग्गीथोवं कसायथोवं च।
ण हु भे वीससियव्वं, थोवं पि हु ते बहुँ होइ ।।६।।

**मद्याचे दुष्परिणाम :**

मज्जेण णरो अवसो, कुणेइ कम्माणि णिंदणिज्जाइं ।
इहलोए परलोए, अणुहवइ अणंतयं दुक्खं ।।७।।

**विनय :**

साली भरेण, तोएण जलहरा, फलभरेण तरुसिहरा ।
विणएण य सप्पुरिसा, नमंति न हु कस्स वि भएण ।।८।।

**आहार :**

अत्थंगयम्मि आइच्चे, पुरत्था य अणुग्गए ।
आहारमाइयं सव्वं, मणसा वि न पत्थए ।।९।।

**व्यसनमुक्ती :**

इत्थी जूयं मज्जं मिगया वयणे तहा फरुसया य ।
दंडफरुसत्तमत्थस्स दूसणं सत्त वसणाइं ।।१०।।

---

## शब्दार्थ व टीपा

**गाथा (१) भावार्थ -**

आपापल्या मतांची (वचनांची) प्रशंसा करणारे आणि दुसऱ्यांच्या मतांची निंदा करणारे जे लोक आपले पांडित्य प्रगट करतात, ते संसारात परिभ्रमण करतात.

**पसंसंता, गरहंता** - 'पसंस' आणि 'गरह' या क्रियापदांची व. का. धा. वि. पुंलिंगी बहुवचने.

**विउस्संति** - गर्वाने फुगतात.

**संसारं ते विउस्सिया** - ते संसारात परिभ्रमण करतात.

**गाथा (२) भावार्थ -**

(संकटाची चाहूल लागताच) जसे कासव आपले सर्व अवयव संकुचित करून शरीराजवळ घेतो त्याप्रमाणे बुद्धिमान माणसाने संयमपूर्वक वर्तनाने पापांपासून आपला बचाव करावा.

**कुम्मे** - कूर्म, कासव.

**समाहरे** - संकुचित करतो.

**सए देहे** - स्वत:च्या देहात.

**मेहावी** (वि.) - मेधावी, बुद्धिमान.

**संजमेण** - 'संजम' मूळ नाम, तृतीया एकवचन, संयमाने.

**गाथा (३) भावार्थ -**

हे मानवांनो, नित्य जागृत व्हा. जागरूक असलेल्या मनुष्याची बुद्धी वाढते. जो आळशीपणाने झोपून राहतो तो धन्य नव्हे. सदैव सावध राहून पुरुषार्थ करणाराच धन्य होय.

**जागरह** (क्रि.) - 'जागर', आज्ञार्थ, द्वितीय पुरुष बहुवचन.

**सुवति-जग्गति** - 'सुव' आणि 'जग्ग' क्रियापदांचे वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन, झोपतो आणि जागतो.

**गाथा(४) भावार्थ -**

आचार्य (आदर्श शिक्षक) हे प्रदीपाप्रमाणे आहेत. प्रदीप जसा स्वत:ही प्रज्ज्वलित राहतो आणि इतर शेकडो दिव्यांना प्रज्ज्वलित करतो, तसे आचार्य स्वत:ही ज्ञानी असतात आणि अनेक शिष्यांना ज्ञान देतात.

**दिप्पंति** - प्रज्ज्वलित होतात.

**दीवेंति** - प्रज्ज्वलित करतात.

**गाथा (५) भावार्थ-**

जी माणसे हित, मित आणि अल्प आहार घेतात आणि ज्यांना वैद्यांकडून चिकित्सा करून घेण्याची वेळ येत नाही (अर्थात् जे आरोग्यसंपन्न असतात) ते जणू काही स्वत:चेच चिकित्सक (कल्याण करून घेणारे) होतात.

**विज्जा** - वैद्य.

**तिगिच्छंति** (क्रि.) - 'तिगिच्छ', वर्तमानकाळ, तृतीय पुरुष बहुवचन, चिकित्सा करतात.

**अप्पाणं** - स्वत:चे.

**गाथा (६) भावार्थ –**

ऋण (कर्ज), व्रण (जखम), अग्नी आणि कषाय (क्रोधादि विकार) हे या क्षणी थोडेच आहे म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. कारण 'थोड्याचे' 'पुष्कळ' कधी होते, ते कळतही नाही.

**थोवं** (अ.) – स्तोकं, थोडे.

**वण** – व्रण, जखम.

**अण** – ऋण, कर्ज.

**भे वीससियव्वं** – तुमच्याकडून विश्वास ठेवला जाऊ नये.

**गाथा (७) भावार्थ–**

मद्यपानाने माणसाचा स्वत:वरचा ताबा सुटतो. तो निंद्य कर्मे करतो. परिणामी त्याला इहलोकात आणि परलोकात अनंत दु:खे भोगावी लागतात.

**मज्जेण** – 'मज्ज' मूळ नाम, तृतीया एकवचन, मद्याने.

**अवसो** – विवश, बेताल.

**कुणेइ** (क्रि.) – 'कुण' (कर), वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन, करतो.

**इहलोए–परलोए** – 'इहलोय'–'परलोय' नामांची सप्तमी एकवचने, इहलोकात, परलोकात.

**गाथा (८) भावार्थ–**

धान्यांच्या साळींनी भरलेली कणसे, पाण्याने भरलेले मेघ, फळांच्या बहराने झाडांचे शेंडे आणि विनयाने सत्पुरुष आपोआपच नम्र होतात. कोणाच्या भीतीने नव्हे. (समृद्धी प्राप्त झाल्यावर, नम्र होण्याचा या सर्वांचा स्वभावच आहे.)

**गाथा (९) भावार्थ –**

सूर्य अस्ताला गेल्यावर तो पुन्हा जोपर्यंत उगवत नाही तोपर्यंत आहारपान इत्यादि सर्वांची मनाने सुद्धा इच्छा करू नये. (सूर्यास्तानंतरच्या भोजनाचा निषेध केला आहे.)

**अत्थंगयम्मि, आइच्चे, अणुग्गए** – ही सर्व सप्तमी एकवचनाची रूपे आहेत. ही 'सति सप्तमी'ची रचना असून, अर्थ असा की, 'आदित्य अस्ताला गेल्यावर आणि पुन्हा उगवण्यापूर्वी'.

**आहारमाइयं** (संधि) – आहारं+आइयं । आहार इत्यादि.

**मणसा** – 'मण' मूळ नाम, तृतीया एकवचन, मनाने.

**न पत्थ** – प्रार्थना अर्थात् इच्छा करू नये.

**गाथा (१०) भावार्थ –**

परस्त्रीगमन, द्यूत मद्यपान, मृगया (शिकार), कठोर वचने, कठोर शिक्षा देणे आणि अर्थनाश (चोरी) ही सात व्यसने आहेत. अर्थात् या सातही व्यसनांपासून कटाक्षाने दूर राहण्याचा संदेश येथे दिला आहे.

**वयणे फरुसया** – वचनातील, कठोरता.

**अत्थस्स दूसणं** – अर्थाचे दूषण, अर्थनाश, चोरी.

**दंडफरुसत्तमत्थस्स** (संधि) – दंड+फरुसत्तं+अत्थस्स । कठोर शिक्षा देणे.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) संजमस्स कए कस्स दिट्ठंतो दिण्णो ?

(२) आयरिया केहिं सरिसा होंति ?

(३) मज्जस्स के दुप्परिणामा हवंति ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) नित्य जागृत राहिल्याने कोणता लाभ होतो ?

(२) कोणत्या प्रकारचा आहार घेतल्याने वैद्यांकडून चिकित्सा करून घेण्याची वेळ येत नाही ?

(३) कोणकोणत्या गोष्टी थोड्या आहेत म्हणून दुर्लक्ष करू नये ?

(४) गाथेत नोंदविलेल्या सात व्यसनांची नावे द्या.

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) रूपे ओळखा.**

पसंसंता, सअंगाइं, दीवेंति, वीससियव्वं, अणुहवइ

**ब) पुढील प्राकृत शब्दांना पाठातील समानार्थी प्राकृत शब्द द्या.**

कच्छव, बुद्धिमंत, जलण, नीर, सुपुरिस

**क) पुढील शब्दांना तद्भव प्राकृत शब्द लिहा.**

संयम, धन्य, आचार्य, अल्पाहार, चिकित्सक, मद्य, दु:ख, शिखर, जलधर, अस्तंगत, मृगया, सप्त

**विशेष अभ्यास**

या पाठातील वर्तमानकाळी क्रियापदांचा संग्रह करा आणि त्यांचे अर्थ लिहा.

❑ ❑ ❑

बीओ पाढो

२

# गाहासत्तसईए सत्त-गाहाओ

'गाहासत्तसई' (गाथासप्तशती) हा एक मुक्तक काव्यांचा संग्रह आहे. इसवी सनाच्या प्रारंभिक शतकात हा ग्रंथ प्रथम 'गाहाकोस' या नावाने प्रसिद्ध होता. कविवत्सल हाल अथवा सातवाहन (शालिवाहन) हा या सातशे गाथांचा संग्रहकर्ता होता. या प्राकृत-प्रेमी राजाने त्याच्या विशाल राज्यातील सर्व कवी आणि कवयित्रींना आपापल्या द्विपदी (मुक्तके, गाथा) पाठविण्याचे आवाहन केले. प्रतिसाद उत्तम मिळाला. आलेल्या एक कोटी गाथांमधून त्याने 'सात शतके' तयार केली.

या गाथा मुख्यत: सामान्य नीतिबोध, सज्जन-दुर्जन वर्णन, निसर्गवर्णन, बीभत्स व हास्यरस यांवर आधारित आहेत.

प्रस्तुत पद्य उताऱ्यात प्रत्येक शतकातील एक-एक गाथा निवडली आहे. प्रत्येकीचे काही आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. प्रथम गाथेत संग्रहाची पार्श्वभूमी दिली आहे. दुसरी गाथा निसर्गवर्णनपर, तिसरी आणि पाचवी बोधपर, चौथी बौद्ध भिक्षुसंघाचा उल्लेख असलेली तर सहाव्या गाथेत शृंगार व हास्याचे मिश्रण आहे. दारिद्र्याचे वर्णन करणारी सातवी गाथा उपहासप्रधान आणि विचार करायला लावणारी आहे. 'गाथासप्तशती' हा ग्रंथ प्राकृत साहित्याचे भूषण आहे. या ग्रंथाची भाषा महाराष्ट्री प्राकृतमध्ये आहे.

---

सत्त सताइं कइवच्छलेण, कोडीअ मज्झआरम्मि ।
हालेण विरइआइं, सालंकाराणं गाहाणं ।।१।।

कमलाअरा ण मलिआ, हंसा उड्डाविआ ण अ पिउच्छा ।
केणावि गामतडाए, अब्भं उत्ताणअं छूढं ।।२।।

छज्जइ पहुस्स ललिअं, पिआइ माणो, खमा समत्थस्स ।
जाणंतस्स अ भणिअं, मोणं च अआणमाणस्स ।।३।।

कीरमुहसच्छहेहिं रेहइ वसुहा पलासकुसुमेहिं ।
बुद्धस्स चलणवंदणपडिएहिं व भिक्खुसंघेहिं ।।४।।

चावो सहावसरलं विच्छुहइ सरं गुणम्मि वि पडंतं ।
वंकस्स उज्जुअस्स अ संबंधो किं चिरं होई ? ।।५।।

एक्क च्चिअ रूअगुणं गामणिधूआ समुव्वहइ ।
अणिमिसणअणो सअलो, जीए देवीकओ गामो ।।६।।

जे जे गुणिणो, जे जे अ चाइणो, जे विअड्ढविण्णाणा ।
दारिद्द ! रे विअक्खण ! ताण तुमं साणुराओ सि ।।७।।

---

## शब्दार्थ व टीपा

**गाथा (१) भावार्थ –**

एक कोटी गाथांमधून अलंकारांनी सजलेल्या अशा सातशे गाथा निवडून कविवत्सल हालाने हा संग्रह केला.

**कइवच्छल** – कविवत्सल, कवी आणि काव्य यांच्याविषयी प्रेम असलेला, सातवाहनाचे विशेषण.

**हाल** – सातवाहन कुळातील पैठणचा राजा 'हाल' की जो 'सालाहण' म्हणूनही प्रसिद्ध होता. हे राजे प्राकृत-प्रेमी होते. त्याने कोणत्या प्रकारे सातशे गाथांचा संग्रह केला, याची नोंद या गाथेत केलेली दिसते.

**गाथा (२) भावार्थ –**

आत्याबाई, सरोवरातील कमळाचे ताटवे तुडवले गेलेले नाहीत. (शांतपणे बसलेले) हंसही कोणी उडवून लावलेले नाहीत. मला असे वाटते की या आपल्या गावच्या तळ्यात कोणीतरी (निळ्या) आभाळाचा तुकडाच जणू आणून उताणा टाकला आहे.

**कमलाअरा** – कमळांचे ताटवे.

**पिउच्छा** – पितृष्वसा, आत्या.

**उत्ताणअ** – उताणे.

**मलिअ** – मृदित, मर्दन केलेले.

**अब्भ** – अभ्र, आभाळ.

**छूढं** (देशी) – क्षिप्त, टाकलेले.

**गाथा (३) भावार्थ –**

प्रभूची, स्वामीची, रसिकाची क्रीडा, प्रियेचा रुसवा, समर्थाची क्षमा, जाणत्याचे बोलणे व अजाणत्याचे मौन, ह्याच गोष्टी केवळ शोभून दिसतात.

**छज्जइ** (देशी) (क्रि.) – ('छज्ज', वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन)

**समत्थस्स खमा छज्जइ** – बलवानाची क्षमा शोभून दिसते.

**जाणंतस्स** (क्रि.) – ('जाण', व का. धा. वि., पुंलिंगी षष्ठी एकवचन,) जाणकाराचे, ज्ञानी व्यक्तीचे.

**अआणमाणस्स** – अजाणत्या व्यक्तीचे, मूर्खाचे.

**गाथा (४) भावार्थ–**

पोपटाच्या चोचीप्रमाणे लालभडक अशा पलाशपुष्पांनी पृथ्वी शोभायमान झालेली आहे. बुद्धाच्या चरणांशी वंदन करण्यासाठी लोटांगण घालणाऱ्या भिक्षुसंघासारखे हे दृश्य दिसत आहे.

**कीरमुह** – पोपटाची चोच.

**सच्छह** – सदृश, समान.

**रेहइ** (देशी) (क्रि.) – ('रेह', वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन,) शोभून दिसते.

**पलासकुसुमेहिं** – ('पलासकुसुम' मूळ नाम, नपुंसकलिंगी, तृतीया अनेकवचन,) पळसाच्या फुलांनी.

**गाथा (५) भावार्थ –**

बाण स्वभावत: सरळ असतो (व धनुष्य वक्र असते.) धनुष्याच्या दोरीवर बाण चढविला की ते तत्काळ त्याला फेकून देते. सरळ व वक्र यांचा संबंध चिरकाल कसा टिकेल ?

**चाव** (पुं.) – चाप, धनुष्य.

**विच्छुहइ** (देशी) (क्रि.) – ('विच्छुह', वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन,) फेकून देते, दूर करते.

**सर** (पुं.) – शर, बाण.

**वंक** (वि.) – वक्र, वाकडा.

**सहावसरल** (वि.) – स्वभावाने सरळ.

**गुणम्मि** – दोरीला लावलेला (बाण).

**उज्जुअ** (वि.) – ऋजुक, सरळ.

**गाथा (६) भावार्थ –**

पाटलाची मुलगी इतकी सुंदर आहे की ती दृष्टिपथात येताच सारे लोक तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहतात. असे म्हणतात की, देवांच्या पापण्या लवत नाहीत म्हणजे त्या सुंदर मुलीने जणू सगळ्या गावकऱ्यांचे रूपांतर देवांमध्ये केले.

**गामणिधूआ** – ग्रामप्रमुखाची कन्या, पाटलाची पोर.

**समुव्वहइ** (क्रि.) – ('समुव्वह', वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन,) धारण करते.
**अणिमिस-णअणो** – अनिमिष नेत्रांचा (सगळा गाव). **देवीकओ** – देवपणास नेला.
**सअल** (वि.) – सकल, सगळा.

**गाथा (७) भावार्थ–**

हे दारिद्र्या, जे जे गुणी, त्यागी व शास्त्रनिपुण आहेत, त्या त्या सर्वांवर तुझे प्रेम असते; इतका तू गुणज्ञ व विचक्षण आहेस. (गुणी, त्यागी आणि ज्ञानी माणसे प्रायः दरिद्री असतात, असा भावार्थ.)

**गुणिणो, चाइणो** – (प्रथमेची बहुवचने,) गुणी आणि त्यागी.
**विअड्ड-विण्णाणा** – शास्त्रनिपुण लोक.
**साणुराअ** (वि.) – सानुराग, प्रेमात पडलेला.
**विअक्खण** (वि.) – विचक्षण, चतुर.
**सि** (क्रि.) – असि, आहेस.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) कियंताणं गाहाणं संगहो हालेण कओ ?
(२) ललिअं, माणो, खमा, मोणं च कस्स छज्जइ ?
(३) गामणिधूआए गामो कहंविहो कओ ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) गावातील शांत तळे बघून, कवीला कोणती उपमा सुचली ?
(२) पळसाच्या फुलांनी सजलेली जमीन पाहून कवीला कशाची आठवण झाली ?
(३) दारिद्र्याला कवीने कोणत्या अर्थाने 'विचक्षण' म्हटले आहे?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) रूपे ओळखा.**

हालेण, उड्डाविआ, जाणंतस्स, रेहइ, गुणम्मि, समुव्वहइ, गुणिणो

**ब) पुढील शब्दांना पाठाच्या आधारे प्राकृत प्रतिशब्द द्या.**

गाथा, आत्या, पोपट, पाटील, भिक्षुसंघ, क्षमा, बाण

### विशेष अभ्यास

**शिक्षकांच्या मदतीने पुढील गाथांचा अर्थ समजून घ्या.**

तं मित्तं कायव्वं जं किर वसणम्मि देसकालम्मि ।
आलिहिय-भित्ति-बाउल्लयं व न परम्मुहं ठाइ ।।
तं मित्तं कायव्वं जं मित्तं कालकंबलीसरिसं ।
उयएण धोयमाणं सहावरंगं न मेल्लेइ ।।

❑ ❑ ❑

३

तइओ पाढो

# अणत्थजुओ अत्थो

प्राकृत साहित्यात कथांचा खजिना असलेले अनेक ग्रंथ आहेत. त्यापैकी एक सुप्रसिद्ध ग्रंथ आहे 'कुमारपालप्रतिबोध' ! या ग्रंथात एकूण ५७ कथा आहेत. त्यातील बहुतांशी कथा जैन महाराष्ट्री या प्राकृत भाषेत आहेत. हा ग्रंथ आ. सोमप्रभसूरी यांनी बाराव्या शतकामध्ये लिहिलेला आहे. गुजरातचा राजा कुमारपाल याला श्रावकव्रतात स्थिर करण्यासाठी सांगितलेल्या या कथा आहेत.

'अनर्थयुक्त-अर्थ'-ही प्रस्तुत कथा 'अस्तेय' व्रताचे माहात्म्य सांगण्यासाठी लिहिलेली आहे. मनात पापी विचार ठेवून, चार मित्रांनी, कशी पापऋद्धी केली व तिच त्यांच्या सर्वनाशास कशी कारण ठरली - त्याविषयीची ही रंजक कथा आहे. म्हणून पापकार वाईट कृतीपासून सर्वांनी दूर राहावे असे या कवितेतून स्पष्ट केले आहे.

---

इह आसि वसंतपुरे परोप्परं नेह-निब्भरा मित्ता ।
खत्तिय-माहण-वणिय-सुवण्णयारा त्ति चत्तारि ।।१।।

ते अत्थ-विढवणत्थं चलिया देसंतरं निय-पुराओ ।
पत्ता परिब्भमंता भूमिपइट्ठम्मि नयरम्मि ।।२।।

रयणीइ तस्स बाहिं उज्जाणे तरु-तलम्मि पासुत्ता ।
पढम-पहरम्मि चिट्ठइ जग्गंतो खत्तिओ तत्थ ।।३।।

पेच्छइ तरु-साहाए पलंबमाणं सुवण्ण-पुरिसं सो ।
विम्हिय-मणेण भणियं अणेण, 'सो एस अत्थो' त्ति ।।४।।

कणय-पुरिसेण संलत्तं 'अत्थि अत्थो परं अणत्थजुओ' ।
तो खत्तिएण वुत्तं, 'जइ एवं ता अलं अम्ह ।।५।।

बीए जामे जग्गेइ माहणो, सो वि पिच्छइ तहेव ।
तइयम्मि वाणिओ तं दट्ठूण न लुब्भए तम्मि ।।६।।

जग्गइ चउत्थजामे सुवण्णयारो, सुवण्ण-पुरिसं तं ।
दट्ठूण विम्हिय-मणो भणइ, 'इमं एस अत्थो' त्ति ।।७।।

पुरिसेण जंपियं, 'एस अत्थि अत्थो परं अणत्थ-जुओ' ।
जंपइ सुवण्णयारो, 'न होइ अत्थो अणत्थ-जुओ' ।।८।।

पुरिसो जंपइ, 'तो किं पडामि ?' 'पडसु' त्ति जंपइ कलाओ ।
पडिओ सुवण्ण-पुरिसो, छिंदइ सो अंगुलिं तस्स ।।९।।

खड्डाए पक्खित्तो सुवण्णपुरिसो सुवण्णयारेण ।
गोसम्मि पत्थिया ते सुवण्णयारेण तो भणिया ।।१०।।

'किं देसंतर-भमणेण ? अत्थि एत्थ वि इमो कणय-पुरिसो ।
खड्डाए मए खित्तो, तं गिण्हह विभज्जिउं सव्वे' ।।११।।

तो सव्वे वि नियत्ता, अंगुलि-कणगेण भत्तमाणेउं ।
वणिओ सुवण्णयारो य दो वि पत्ता नयर मज्झे ।।१२।।

चिंतियमिमेहिं, 'हणिमो खत्तिय-माहण-सुए उवाएण ।
अम्हं चिय दोण्हं जेण होइ एसो कणग पुरिसो' ।।१३।।

भुत्तूण सयं मज्झे समागया गहिय-कुसुम-तंबोला ।
खत्तिय-माहण-जुग्गं विस-मिस्सं भोयणं घेत्तुं ।।१४।।

बाहिं ठिएहिं तं चेव चिंतियं, 'किं चिरं ठिया मज्झे ।
तुब्भे?' त्ति भणंतेहिं दुन्नि वि खग्गेण निग्गहिया ।।१५।।

विस-मिस्सं भत्तं भुंजिऊण दिय-खत्तिया वि वावन्ना ।
इय एसा पाविड्ढी पाविज्जइ पाव- पसरेण ।।१६।।

## शब्दार्थ व टीपा

**खत्तिय-माहण-वणिय-सुवण्णयारा** - क्षत्रिय, ब्राह्मण, वणिक् आणि सुवर्णकार (असे चार मित्र).

**अत्थ-विढवणत्थं** (क्रि. वि.) - अर्थप्राप्तीसाठी, पैसे मिळविण्यासाठी.

**पत्ता** (क्रि.) - ('पाव', क. भू. धा. वि., पुंलिंगी प्रथमा अनेकवचन,) प्राप्त झाले.

**भूमिपइट्ठ** - 'भूमिप्रतिष्ठ' नावाचे नगर.

**पासुत्ता** - प्रसुप्त झाले, झोपले.

**जग्गंतो** (क्रि.) - ('जग्ग', व का. धा. वि., पुंलिंगी प्रथमा एकवचन,) जागणारा.

**सुवण्णपुरिस** - 'सुवर्णपुरुष

**अत्थि अत्थो परं अणत्थजुओ**- 'मी अर्थरूप आहे परंतु अनर्थ घडविणारा आहे.'

**अलं** (अ.) - नको, पुरे.

**बीए जामे** - दुसऱ्या प्रहरी.

**दट्ठूण** (क्रि.) - ('पास', अनियमित पूर्वकालवाचक अव्यय,) पाहून.

**कलाओ** (पुं.) - कलाद, सुवर्णकार, सोनार.

**खड्डाए** (स्त्री.) - ('खड्डा' मूळ नाम, स्त्रीलिंगी सप्तमी एकवचन,) खड्ड्यात.

**गोसम्मि पत्थिया** - पहाटे प्रस्थित झाले.

**गोस** (देशी) - प्रभात, पहाट.

**विभज्जिउं** - (क्रि. 'वि+भज्ज', हेत्वर्थक अव्यय,) विभागून.

**अंगुलि-कणगेण** - सोन्याच्या पुतळीची

**भत्तमाणेउं** (संधि) - (भत्तं+आणेउं) भोजन आणून.

**चिंतियमिमेहिं** (संधि) - (चिंतियं+इमेहिं) त्यांनी विचार केला.

**जुग्ग** (वि.) - योग्य.

**विसमिस्सं** - विषमिश्रित.

**निग्गहिया** - (येथील संदर्भात) ठार मारले.

**दिय** - द्विज, ब्राह्मण.

**वावन्ना** - मरण पावले.

**इय एसा पाविड्ढी पाविज्जइ पावपसरेण** - अशा प्रकारे मनातील पापी विचारांनी ऋद्धी प्राप्त केली.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) वसंतपुरे के चत्तारि मित्ता निवसंति ?

(२) सुवण्णयारेण खड्डाए किं पक्खित्तं ?

(३) वणिओ सुवण्णयारो य नयराओ किं किं घेत्तूण आगया ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) चार मित्र कोणकोण होते ? ते भूमिप्रतिष्ठ नगरात का पोहोचले ?

(२) सुवर्णपुतळीला बघून क्षत्रिय तरुणाने काय केले ?

(३) सुवर्णपुतळीला बघून सुवर्णकाराने काय केले ?

(४) सुवर्णाच्या लोभाने चारही मित्रांचा कशा प्रकारे विनाश झाला ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) रूपे ओळखा.**

चलिया, नयरम्मि, जग्गंतो, वुत्तं, दट्ठूण, पक्खित्तो, इमेहिं, भुत्तूण, चिंतियं, छिंदइ, गिण्हह, पुरिसेण, खड्डाए, जामे

**ब) पुढील प्राकृत शब्दांना समानार्थी प्राकृत शब्द द्या.**

वयंस, रत्ति, पुर, पायव, कलाय, पहाय, कणय, माहण, भण

**क) या पाठात आलेल्या क. भू. धा. वि. च्या सर्व रूपांचा संग्रह करा.**

## विशेष अभ्यास

**पुढील प्राकृत उताऱ्याचा मराठीत अनुवाद करा.**

तम्मि पाउसे गावी-चारणत्थं गओ गोवालो गिरिनिगुंजे । दिट्ठं तत्थ जुण्ण-मंदिरे जुगाइ-देवस्स पडिमा । तद्दंसणाओ समुप्पन्नो तस्स समुल्लासो । तओ तेण खणिऊण पासाइं अवणीओ चउद्दिसं पंसु-पूरो । पयडीकया सव्वंगं पडिमा । काऊण पीढं ठविया तत्थ एसा । चिंतियं च तेण, 'धन्नो अहं जस्स मे सयं देवाहिदेवेण दंसिऊण अप्पाणं पसाओ कओ । ता मे जावज्जीवं इमं दट्ठूण पुज्जिऊण य जहासत्ति भुत्तव्वं' त्ति कओ निच्छओ।

❑ ❑ ❑

४


चउत्थो पाढो

# पारिणामिया बुद्धी

प्राकृत साहित्यात ज्यांनी आपल्या बहुमुखी प्रतिभेने अप्रतिहत संचार केला– असे हरिभद्रसूरि इसवी सनाच्या आठव्या–नवव्या शतकात होऊन गेले. कथा, न्याय, तर्क, योग, अनेकांत–अशा अनेक विषयांवर साहित्यरचना करणाऱ्या हरिभद्रांनी उपदेशप्रधान ग्रंथही लिहिले. त्यांच्या 'उपदेशपद' नावाच्या ग्रंथावर मुनिचंद्रसूरींनी टीका लिहिली. अनेक प्राकृत कथा त्या टीकेत पद्यबद्ध स्वरूपात उपलब्ध आहेत. त्यातील एक कथा या पाठाच्या रूपाने दिली आहे.

जैन संकल्पनेप्रमाणे –बुद्धी चार प्रकारची असते–'औत्पत्तिकी बुद्धी' म्हणजे उपजत ज्ञान; 'वैनयिकी बुद्धी' म्हणजे गुरूंच्या विनयपूर्वक सेवेने मिळणारे ज्ञान; 'कर्मजा बुद्धी' म्हणजे पुन्हा पुन्हा तेच काम करण्याने आलेले कौशल्य आणि 'पारिणामिकी बुद्धी' म्हणजे जीवनातील अनुभवांमुळे आलेले शहाणपण !

चतुर स्त्रीने आपल्या तीन विवाहित मुलींना दिलेला सल्ला किती महत्त्वाचा होता–हे स्पष्ट करणारी ही पारिणामिकी बुद्धीची एक मनोरंजक पद्यबद्ध कथा आहे. कोणाचे किती व काय ऐकावयाचे ते त्याचे त्यांनी ठरवायचे व त्याप्रमाणे योग्य आचरण केले तरच सुखाची प्राप्ती होते. अन्यथा दु;ख भोगावे लागते. हे या कवितेतून पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.



इह अत्थि वसंतपुरं नयरं, तत्थासि निद्धसो नाम ।
धिज्जाइओ महेला, लीलानिलओ सुहा तस्स ।।१।।

जाया य तिन्नि धूया, कमेण तारुन्नमुन्नयं पत्ता ।
वीवाहिया कुलेसुं, निवमंदिर–सविहवेसु ।।२।।

जणणीए चिंतियं, मज्झ दुहियरो, सुत्थिया कहं होज्जा ।
जम्हा पइ–परिणामे, अन्नाए ववहरंतीओ ।।३।।

न भवंति गउरवपयं, ता रहियाणं, कओ सुहासंगो ?
ता जाणामि कहंचि वि, भावं जामाउयाणमहं ।।४।।

भणियाओ धूयाओ, तुब्भेहिं पढम-सुरय-संगम्मि ।
लद्धावसराहिं सिरो, हणणिज्जो पण्हिपहरेण ।।५।।

नियय-पइणो तहच्चिय, ताहिं कए, पुच्छिया पभायम्मि ।
किं तेहिं तुम्ह विहियं, भणियं जेट्ठाए तत्थ इमं ।।६।।

मच्चरण-मद्दणपरो भणइ उ, किं नु दुक्खमणुपत्ता ।
एवंविहो पहारो, न तुम्ह चलणाणमुचिओ त्ति ।।७।।

अइगरुओ आसंघो, ममम्मि तुह, को णु अन्नहा एवं ।
उम्मत्तया-विरहिओ, कज्जं लज्जालुओ कुणइ ? ।।८।।

सा भणिया जणणीए, अइपेम-परव्वसो पई तुज्झं ।
जं कुणसि तं पमाणं, सव्वं तुह, तस्स मा भाहि ।।९।।

बीयाए पुण भणियं, पहार-समणंतरं मणागं सो ।
झिंखणकारी जाओ, खणंतराओ उवरओ त्ति ।।१०।।

सा तीए वि य भणिया, तुमए विहिए अरुच्चमाणम्मि ।
होही झिंखणकारी, नो अन्नं, निग्गहं काही ।।११।।

तइयाए पुण भणियं, तुह निद्देसे मए कए संते ।
दूरा दरिसिय-रोसो, बंधिय सो गेहथंभेण ।।१२।।

कसघाय-सए दासी, मम भासियवं, च दुक्कुला तं सि ।
तो मे तए न कज्जं, एवंविह -कज्जसज्जाए ।।१३।।

माऊए तस्समीवं गंतुं, भणियं अहं एस कुलधम्मो ।
जइ पुण कहवि न कज्जइ, तो ससुरकुलं न नंदेइ ।।१४।।

इय तोसिय तच्चित्तं, भणिया धूया जहेव देवस्स ।
तह वट्टिज्जासि, न अन्नहा, इमो तुह पियकरो त्ति ।।१५।।

जामाउय-चित्त-वियाणणत्थमेयासि, सिक्खणा एसा ।
परिणामिय-बुद्धि-फलं, माहणभज्जाए विन्नेयं ।।१६।।

## शब्दार्थ व टीपा

**तत्थासि** (संधि) -( तत्थ+आसि ) तेथे होता.
**निद्धसो नाम** – निद्धस नावाचा.
**धिज्जाइओ** (पुं.) – ब्राह्मण.
**महेला** (स्त्री.) – महिला, पत्नी.
**लीलानिलओ** (वि.) – क्रीडेचे जणू घर असलेला, विलासात रममाण.
**सुहा** (स्त्री.) – शुभा, ब्राह्मणीचे नाव.
**जाया य तिन्नि धूया** – (त्यांना) तीन मुली झाल्या.
**तारुन्नमुन्नयं** (संधि) – (तारुन्नं + उन्नयं) उन्नत तारुण्य.
**निव–मंदिर–सविहवेसु** – राजासारख्या संपन्न घरांमध्ये.
**दुहियरो** (अ. व.) – दुहिता, मुली.
**सुत्थिय** (वि.) – सुस्थित, सुखी.
**पइपरिणामे अन्नाए** – पतींचे परिणाम (भाव) अज्ञात असताना.
**ववहरंतीओ** (क्रि.) – ('ववहर', व. का. धा. वि., स्त्रीलिंगी, प्रथमा अनेकवचन,) व्यवहार करत असताना.
**गउरवपयं** (समास) – (गउरवस्स पयं । षष्ठी तत्पुरुष) गौरवाचे पद, गौरवास्पद.
**सुहासंगो** (पुं.) – सुखाचा संग, सौख्य.
**जामाउयाणमहं** (संधि) – (जामाउयाणं+अहं) जावयांचा मी (स्वभाव जाणेन).
**धूया** (स्त्री.) – दुहिता, कन्या.
**लद्धावसराहिं** (समास) – लद्धो अवसरो जाहिं ता । (बहुव्रीहि) ज्यांना अवसर (संधी) प्राप्त झाला आहे अशा त्या.
**पण्हिपहरेण** – पायाच्या (पावलाच्या) प्रहाराने.
**पण्हि** (स्त्री.) – पृष्णि, टाच, पावलाचा मागचा भाग.
**नियय–पइणो तहच्चिय ताहिं कए** – आपापल्या पतींच्याबाबत त्यांनी तसेच केल्यानंतर.
**पभाय** (पुं.) – प्रभात, पहाट.
**किं तेहिं तुम्ह विहियं** – त्यांच्याबाबत तुम्ही काय केले?

**गाथा ७ भावार्थ –**
माझे चरणमर्दन करून पती म्हणाला, 'तुला दुखले का? अशा प्रकारचा प्रहार तुझ्या (कोमल) पायाला सोसणार नाही.'

**अइगरुओ आसंघो** – अतिशय आसक्ती, खूपच प्रेम.
**उम्मत्तयाविरहिओ कज्जं लज्जालुओ कुणइ ?** – लज्जाशील आणि वेडा नसलेला कोणता माणूस असे कार्य करेल ?
**मा भाहि** – भिऊ नकोस.
**पहार–समणंतरं** – प्रहार केल्यानंतर.
**मणागं सो झिंखणकारी जाओ** – काही काळ त्याने आरडाओरडा केला.
**उवरओ** (वि.) – थांबला, शांत झाला.

**गाथा (११) भावार्थ –**
ती (आई) तिला म्हणाली, 'तू त्याला न रुचणारे काम केलेस तरी, तो फक्त आरडाओरडा करील. दुसरी काही शिक्षा करणार नाही.'

**झिंखणकारी** (समास)– झिंखणं करेइ त्ति । (उपपद तत्पुरुष) आरडाओरडा करणारा.
**दूरा दरिसियरोसो** (वि.) – खूपच क्रोध प्रगट करणारा.
**बंधिय** (क्रि.) – ('बंध', अनियमित पू. का. धा. अ.,) बांधून.
**कस–घाय–सए दासी** – चाबकाचे शंभर फटके दिले.
**मम भासियवं** – मला म्हणाला.
**दुक्कुला** – दुष्ट कुळातली, वाईट संस्काराची.
**एवंविह–कज्ज–सज्जाए** – अशा प्रकारचे (लाथ मारण्याचे) काम करण्यास तयार झालेल्या.

**गाथा (१४) भावार्थ –**
आई त्याच्या (तिसऱ्या जावयाच्या) जवळ जाऊन म्हणाली, हा आमचा कुलधर्म आहे. हा (कुलाचार) पाळला नाही तर सासरी नांदता येत नाही.'

**भणियम्ह** (संधि) – भणियं + अम्ह ।
**इय तोसिय तच्चित्तं** – अशा प्रकारे त्याचे (जावयाचे) चित्त संतुष्ट करून.
**वट्टिज्जासि** – वागावेस.

**गाथा (१६) भावार्थ –**
जावयांचे चित्त (अभिप्राय) जाणून घेण्यासाठी ब्राह्मण-पत्नीने जी शिकवण दिली ते तिच्या पारिणामिकी बुद्धीचे फळ जाणावे.

**माहणभज्जा** (समास) – (माहणस्स भज्जा षष्ठी तत्पुरुष) ब्राह्मणाची पत्नी.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) तिण्हं कण्णाणं जणणीए किं चिंतियं ? (गा. ३)

(२) माऊए धूयाणं का सिक्खा दिण्णा ? (गा. ५)

(३) तइएण जामाउणा भज्जा कहं दंडिया ? (गा. १२, १३)

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) मुली सासरी सुखी होण्यासाठी चतुर स्त्रीने मुलींना कोणता सल्ला दिला ?

(२) पहिल्या जावयाची कोणती प्रतिक्रिया झाली ? आईने पहिल्या मुलीस कोणता सल्ला दिला ?

(३) दुसऱ्या जावयाची कोणती प्रतिक्रिया झाली ? आईने दुसऱ्या मुलीस कोणता सल्ला दिला ?

(४) चतुर स्त्रीने तिसऱ्या जावयाची समजूत कशा प्रकारे काढली? तिने तिसऱ्या मुलीस कोणता सल्ला दिला ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) कंसातील शब्दांपैकी योग्य रूप घालून वाक्य पूर्ण करा.**

(१) मम दुहियाओ गउरवपयं न (भवइ/भवंति) ।

(२) वसंतपुरे नयरे (निद्धसेण/निद्धसो) नाम बंभणो आसि ।

(३) सा जणणीए (भणिओ/भणिया) ।

(४) तुमं जं (कुणसि/कुणइ) तं  पमाणं ।

(५) माऊए तस्समीवं (गंतुं/गयं) कहियं ।

**ब) पुढील प्राकृत शब्दांना समानार्थी प्राकृत शब्द लिहा.**

जणणी, दुहिया, भण, घाय, कोह

### विशेष अभ्यास

**पुढील शब्दांना प्राकृत तद्भव शब्द देऊन त्यातील स्वर-व्यंजनांचे बदल, शिक्षकांच्या मदतीने नोंदवा-**

पति, गौरव, मर्दन, निर्देश, शत, अन्यथा, स्तम्भ

❑ ❑ ❑

पंचमो पाढो

# ५ अहिंसा–सरूवं

अहिंसेचे स्वरूप सांगणारा प्रस्तुत पद्यपाठ 'समणसुत्तं' या ग्रंथातून घेतला आहे. या ग्रंथाची रचना आणि संकलन आचार्य विनोबा भावे यांच्या प्रेरणेमुळे झाले. या ग्रंथामध्ये चार खंड असून जैनधर्मातील धर्म, अप्रमाद, अपरिग्रह, मोक्षमार्ग, ध्यान इ. विषयांचे विवेचन त्यात आले आहे. यातील 'ज्योतिर्मुख' या प्रथम खंडातून या पाठातील गाथा घेतल्या आहेत. यामध्ये अहिंसेचे वर्णन केले आहे. हिंसेमुळे जगामध्ये जी अशांती पसरली आहे ती नष्ट करण्यासाठी माणसाने अहिंसेचे पालन कसे करावे, त्यामुळे कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय एकात्मता स्थापित कशी होईल– हे या पद्यांद्वारे स्पष्ट केले आहे. कारण हिंसमुळे सर्वांचीच शांतता नष्ट होते. म्हणून हिंसेपासून सर्वांनी दूर राहावे. असे या कवितेतून स्पष्ट केले आहे.

एयं खु नाणिणो सारं, जं न हिंसइ कंचण ।  
अहिंसासमयं चेव, एतावंते वियाणिया ।।१।।

सव्वे जीवा वि इच्छंति, जीविउं न मरिज्जिउं ।  
तम्हा पाणवहं घोरं, निग्गंथा वज्जयंति णं ।।२।।

जीवंति लोए पाणा, तसा अदुवा थावरा ।  
ते जाणमजाणं वा, ण हणे णो वि घायए ।।३।।

जह ते न पिअं दुक्खं, जाणिअ एमेव सव्वजीवाणं ।  
सव्वायरमुवउत्तो, अत्तोवम्मेण कुणसु दयं ।।४।।

जीववहो अप्पवहो, जीवदया अप्पणो दया होइ ।  
ता सव्वजीवहिंसा, परिचत्ता अत्तकामेहिं ।।५।।

तुमं सि नाम स चेव, जं हंतव्वं ति मन्नसि ।  
तुमं सि नाम स चेव, जं अज्जावेयव्वं ति मन्नसि ।।६।।

रागादीणमणुप्पाओ, अहिंसकत्तं त्ति देसियं समए ।  
तेसिं चे उप्पत्ती, हिंसेत्ति जिणेहि णिद्दिट्ठा ।।७।।

अज्झवसिएण बंधो, सत्ते मारेज्ज माऽथ मारेज्ज ।  
एसो बंधसमासो, जीवाणं णिच्छयणयस्स ।।८।।

हिंसादो अविरमणं, वहपरिणामो य होइ हिंसा हु ।  
तम्हा पमत्तजोगो, पाणव्ववरोवओ णिच्चं ।।९।।

णाणी कम्मस्स खयत्थमुट्ठिदो णोट्ठिदो य हिंसाए ।  
अददि असढं अहिंसत्थं, अप्पमत्तो अवधगो सो ।।१०।।

अत्ता चेव अहिंसा, अत्ता हिंसति णिच्छओ समए ।
जो होदि अप्पमत्तो, अहिंसगो हिंसगो इदरो ।।११।।

तुंगं न मंदराओ, आगासाओ विसालयं नत्थि ।
जह तह जयंमि जाणसु, धम्ममहिंसासमं नत्थि ।।१२।।

अभयं पत्थिवा ! तुब्भं, अभयदाया भवाहि य ।
अणिच्चे जीवलोगम्मि, किं हिंसाए पसज्जसि ।।१३।।

## शब्दार्थ व टीपा

**णाणिणो** - ज्ञानी लोकांचे.
**पाणवह** - प्राणवध, हिंसा.
**णिग्गंथा** - निर्ग्रन्थ, जैन मुनी.
**तस** - त्रस जीव (द्वीन्द्रियांपासून पंचेन्द्रियांपर्यंतचे जीव).
**अदुवा** - अथवा, किंवा.
**थावर** - स्थावर जीव (एकेन्द्रिय जीव).
**अत्तोवम्मेण** - (आत्मौपम्याने,) स्वत:ची उपमा देऊन.
**अप्पवहो** - आत्मवध, स्वत:चा वध.
**परिचत्ता** - परित्यक्त, त्यागलेले.
**अत्तकामेहिं** - स्वत:चे हित पाहणाऱ्या व्यक्तींनी.
**अज्जावेयव्वं** - आज्ञेत ठेवण्यास योग्य मानावे.
**पाणव्वरोवओ** - जीवहत्या करणारा.
**समए** - शास्त्रामध्ये, धर्मग्रंथांमध्ये.
**णिद्दिट्ठा** - निर्दिष्ट, सांगितलेल्या.
**अज्झवसिएण** - विचाराने, निश्चयाने.
**उट्ठिदो** - उत्थित, उद्युक्त झालेला.
**तुंग** - उंच.
**मंदराओ** - मेरु-पर्वतापेक्षा.
**पत्थिवा** - पार्थिवा ! हे राजा (संबोधन).
**अणिच्चे** - अनित्य (जीवलोकात).

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) सव्वे जीवा किं इच्छंति ?
(२) लोए कियंता पाणा ?
(३) सव्वजीवाण किं अप्पियं ?
(४) समयाणुसारेण का अहिंसा ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) ज्ञानी माणसाचे सार कोणते आहे ?
(२) आत्महितैषी पुरुषाने कसे वागावे ?
(३) जिनेश्वरांती हिंसा कशाला म्हटले आहे ?
(४) कर्मबंधाचे स्वरूप सांगा.
(५) 'अप्रमत्त' कोणास म्हणावे ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) रूपे द्या.**

(१) आगास - पंचमी एकवचन
जीवलोग - सप्तमी एकवचन
हिंसा - तृतीया एकवचन

पत्थिव - संबोधन एकवचन
निग्गंथ - प्रथमा अनेकवचन
दया - द्वितीया एकवचन

(२) हिंस - वर्तमानकाळ तृतीय पुरुष एकवचन
इच्छ - वर्तमानकाळ तृतीय पुरुष अनेकवचन
जीव - हेत्वर्थक धातुसाधित अव्यय
भव - आज्ञार्थ द्वितीय पुरुष अनेकवचन
हण - विध्यर्थ तृतीय पुरुष एकवचन

**ब) संधी सोडवा.**

जाणमजाणं, सव्वायरमुवउत्तो, रागादीणमणुप्पाओ, खयत्थमुट्ठिदो, धम्ममहिंसासमं

**विशेष अभ्यास**

'अहिंसा' या विषयावर प्राकृत भाषेत दहा वाक्ये लिहा.

❑ ❑ ❑

६

छट्ठो पाढो

# रावणस्स वयगहणं

आठव्या-नवव्या शतकात होऊन गेलेल्या 'स्वयंभूदेव' नावाच्या कवींनी रचलेल्या 'पउमचरिउ' (पद्मचरित-रामकथा) या महाकाव्यातून प्रस्तुत उतारा घेतला आहे. या भाषेस 'महाराष्ट्री अपभ्रंश' असे म्हणतात. या भाषेतूनच पुढे 'मराठी' भाषेची निर्मिती झाली.

अपभ्रंश भाषेतील महान कवी 'स्वयंभूदेव' हे कला आणि भावाविष्कारांच्या दृष्टीने एक अद्वितीय कवी होते. कर्नाटकाच्या एका साहित्यकाराच्या घराण्यात त्यांचा जन्म झाला. जैन कवींनी प्रचलित केलेली रामायणाची परंपरा स्वयंभूदेवांनी अपभ्रंश भाषेत पुढे चालविली.

प्रस्तुत उताऱ्यात 'रावणाच्या व्रतग्रहणा'ची अनोखी कथा स्वयंभूदेवांनी पद्यबद्ध केली आहे. वाल्मीकि-रामायणापेक्षा ही कथा वेगळी आहे. रावणाचे व्यक्तिचित्र जैन रामायणांमध्ये भिन्न प्रकारचे रंगविले आहे. तो 'दहा तोंडाचा राक्षस' नसून अत्यंत विद्यासंपन्न, बलवान्, न्यायनीतीने राज्य करणारा एक 'विद्याधरराज' होता. सीतेच्या सौंदर्यावर भाळून त्याने सीतेचे अपहरण केले खरे, परंतु तिच्यावर कसलीही बळजबरी केली नाही. 'या त्याच्या वर्तनामागे काही निश्चित कारण असावे' - असा तर्कशुद्ध विचार करून, 'रावणाच्या व्रत-ग्रहणाचा प्रसंग', प्रस्तुत पद्यपाठात रोचक पद्धतीने रंगविला आहे.

शेवटी मुनींच्या आग्रहावरून तो नियम घेतो की, 'जी सुंदरी माझी अभिलाषा धरीत नाही, तिच्यावर मी बळजबरी करणार नाही.' अर्थात् या व्रताचे दूरगामी परिणाम फार चांगले होतात. तो दीक्षेचा प्रसंग या कवितेत दिलेला आहे.

---

रणे माणु मलेवि पुरंदरहो, परियंचेवि सिहरइँ मंदरहो ।
आवइ वि पडीवउ जाम पहु (रावणु), ताणंतरे दिट्ठु अणंतरहु ।।१।।

मारिच्चि पपुच्छिउ रावणेण, उहु कलयलु सुम्मइ काइँ माम ।
तं णिसुणेवि पभणइ समरधीरु, एहु जइ णामेण अणंतवीरु ।
उप्पण्णउ एयहो एत्थु णाणु, उहु दीसइ देवागमु सजाणु ।।२।।

तं वयणु सुणेप्पिणु णिसियरिंदु, गउ तेत्तहे जेत्तहे मुणिवरिंदु ।
परियंचेवि णवेवि थुवेवि णिविट्ठु, सयलु वि जणु वयइँ लयंतु दिट्ठु ।।३।।

महवयइँ को वि को वि अणुवयइँ, को वि सिक्खावयइँ गुणव्वयइँ ।
को वि दिढु सम्मत्तु लएवि थिउ, पर रावणु एक्कु ण उवसमिउ ।।४।।

धम्मरहु महारिसि भणइ तेत्थु, ''मणुसत्तु लहेवि बइसरेवि एत्थु ।
अहो दहमुह मोहंधारे छूढ, रयणायरे रयणी ण लेहि मूढ ।।५।।

अमियालए अमिउ ण लेहि केम, अच्छहि णिहुअउ कट्ठमउ जेम'' ।
तं वयणु सुणेप्पिणु दससिरेण, वुच्चइ थोत्तुग्गीरियगिरेण ।।६।।

''सक्कमि धूमद्धए झंप देवि, सक्कमि फणफणिमणिरयणु लेवि ।
सक्कमि गिरिमंदरु णिद्दलेवि, सक्कमि दस-दिसिवह दरमलेवि ।।७।।

''सक्कमि धूमद्धए झंप देवि, सक्कमि फणफणिमणिरयणु लेवि ।
सक्कमि गिरिमंदरु णिद्दलेवि, सक्कमि दस-दिसिवह दरमलेवि ।।७।।

सक्कमि मारुउ पोट्टलि छुहेवि, सक्कमि जममहिसे समारुहेवि ।
सक्कमि रयणायरजलु पिएवि, सक्कमि आसीविसु अहि णिएवि ।।८।।

सक्कमि सक्कहो रणे उत्थरेवि, सक्कमि ससिसूरहँ पह हरेवि ।
सक्कमि महि-गयणु एक्कु करेवि, दुद्धरु णउ सक्कमि वउ धरेवि'' ।।९।।

परिचिंतेवि सुइरु णराहिवेण, 'लइ लएमि एक्कु वउ' वुत्तु तेण ।
''जं मइं ण समिच्छइ चारुगत्तु, तं मंड लएमि ण परकलत्तु''
गउ एम भणेप्पिणु णिययणयरु, थिउ अचलु रज्जु भुज्जंतु खयरु ।।१०।।

## शब्दार्थ व टीपा

### अपभ्रंश भाषेची काही व्याकरणविषयक वैशिष्ट्ये

१) अपभ्रंशात पुंलिंगी व नपुंसकलिंगी नामांची प्रथमेची एकवचने करताना 'उ' प्रत्यय लागतो. जसे - माणु - मान; दिट्ठु - पाहिले; कलयलु - कलकलाट, गडबडगोंधळ; एहु - येथे; उहु - तेथे; देवागमु - देवांचे आगमन; सजाणु - यानसहित; वयणु - वचन; निसियरिंदु - निशाचरेन्द्र, रावण; मुणिवरिंदु - मुनिवरेन्द्र, मुनिश्रेष्ठ; निविट्ठु - बसला; जणु - जन, लोक; दिढु - दृढ स्थिर; सम्मत्तु - सम्यक्त्व; ण उवसमिउ - (त्याचा) उपशम झाला नाही; तेत्थु - तेथे; एत्थु - येथे ; कट्ठमउ - काष्ठमय, लाकडी पुतळ्यासारखा; आसीविसु - आशीविष सर्प; एक्कु - एक, एकरूप; दुद्धरु - दुर्धर, कठीण; सुइरु - सुचिर, दीर्घकाळ; वउ - व्रत; वुत्तु - म्हटले; चारुगत्तु - चारुगात्री, सुंदर स्त्री; परकलत्तु - परकलत्र, परस्त्री; गउ - गेला; अचलु - अचल; रज्जु - राज्य; भुज्जंतु - भोग घेत; खयरु - खेचर, विद्याधर, रावण.

२) अपभ्रंशात 'एवि' आणि 'एप्पिणु' हे दोन प्रत्यय पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यये तयार करण्यासाठी सामान्यत: वापरली जातात. एखादी विशिष्ट क्रिया 'करून' किंवा 'करण्यास/करण्यासाठी' असे त्याचे दोनही अर्थ संदर्भानुसार होऊ शकतात. जसे - मलेवि - मर्दन करून; परियंचेवि - प्रदक्षिणा करून; णिसुणेवि - ऐकून; सुणेप्पिणु - ऐकून; णवेवि - नमन करून; थुणेवि - स्तुती करून; लएवि - घेऊन; बइसरेवि - बसून; लेवि - घेऊन / घेण्यास; लहेवि - लाभून, प्राप्त करून; णिद्दलेवि - निर्दालन करून / करण्यास; दरमलेवि - पूर्ण मर्दन करून / करण्यास; छुहेवि - सोडून /सोडण्यास; समारुहेवि - आरूढ होऊन / होण्यास; पिएवि - पिऊन / पिण्यास; णिएवि - पाहून / पाहण्यास; उत्थरेवि - उलथून टाकून / टाकण्यास; करेवि-करून /करण्यास; धरेवि - धारण करून/करण्यास; भणेप्पिणु - म्हणून (सात, आठ आणि नऊ या गाथांमध्ये 'सक्कमि' हा शब्द 'मी समर्थ आहे' अशा अर्थाने आला आहे.)

३) अपभ्रंशात षष्ठी एकवचनासाठी 'हो' हा प्रत्यय येतो. तसेच बहुवचनासाठी 'हँ' हा प्रत्यय येतो. जसे - पुरंदरहो - इंद्राचा; मंदरहो - मंदार पर्वताची; एयहो - ह्यांना; ससिसूरहँ - चंद्रसूर्यांचा.

## स्वाध्याय

**प्र. १ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) रावणाने अनंतरथ (अनंतवीर्य) मुनींना केव्हा पाहिले ?
(२) मारीची हा रावणाचा कोण होता ? त्याने रावणाच्या प्रश्नाला कोणते उत्तर दिले ?
(३) रावण अनंतवीर्य मुनींजवळ पोहोचला तेव्हा त्याने कोणते दृश्य पाहिले ?
(४) रावणाचा व्रतग्रहण न करण्याचा मानस पाहून धर्मरथ महर्षी त्याला काय म्हणाले ?
(५) रावणाने स्वत:च्या पराक्रमाचे वर्णन कशा प्रकारे केले ?
(६) रावणाने अखेर कोणते व्रत घेतले ?

**प्र. २ : व्याकरण**

**अ)** या पाठात आलेले, रावणाला समानार्थी असे, तीन प्राकृत शब्द लिहा.

**ब) पुढील शब्दांना पाठातील अपभ्रंश प्रतिशब्द लिहा.**

शिखर, समर, महर्षि, अमृत, धूमध्वज, रत्न, मारुत, यममहिष,
रत्नाकर, आशीविष, शशिसूर्य, महिगगन, परकलत्र

### विशेष अभ्यास

शिक्षकांच्या मदतीने जैन श्रावकाचारातील 'अणुव्रते, गुणव्रते आणि शिक्षाव्रते' यांची माहिती लिहून काढा.

❑ ❑ ❑

# थूलवायण-विभागो

# १ तेयलिपुत्त-पोट्टिला-कहा

प्राकृत साहित्य हे, समृद्ध कथाभांडारासाठी प्रसिद्ध आहे. त्यातील 'ज्ञाताधर्मकथा' प्रमुख अर्धमागधी अंगग्रंथात प्रथमत: तेतलिपुत्र-पोट्टिलेची ही कथा आढळते. 'उपदेशमाला' या उपदेशप्रधान ग्रंथात ती जैन महाराष्ट्री प्राकृतात लिहिलेली दिसते. 'पाइअ-विन्नाण-कहा' या ग्रंथात श्रीविजयकस्तूरसूरीश्वरजी यांनी आणखी सोप्या प्राकृतात तेतलिपुत्र-पोट्टिलेची कथा प्रस्तुत केली आहे.

कनककेतु राजाची पद्मावती नावाची पट्टराणी होती. तेतलिपुत्र हा त्याचा मंत्री व पोट्टिला ही त्याची पत्नी होती. कोणी भविष्य सांगितल्याने कनककेतु राजा 'आपला प्रतिस्पर्धी जन्माला येईल,' या भीतीने आपल्याच नवजात बालकांचे नाक, कान, बोटे इत्यादी अवयव निर्घृणपणे तोडून टाकत असे. एकदा तेतलिपुत्र मंत्र्याच्या मदतीने पद्मावतीला, कनकध्वज नावाच्या राजपुत्राला दुष्ट राजापासून वाचविण्यात कसे यश आले. ते या पाठात पुढीलप्रमाणे आले आहे.



तेयलिपुरंमि कणयकेऊ नाम नरवई होत्था । तस्स पउमावई नाम पट्टदेवी आसि । तस्स तेयलिपुत्तनामो मंती, तस्स पोट्टिला नाम पिया अहेसि । सा अईव वल्लहा अत्थि । अह रज्जसुहं भुंजमाणस्स कणयकेउस्स पुत्तो जाओ, तया राया चिंतेइ- इमो पुत्तो वड्ढंतो समाणो मईयं रज्जं गिण्हिस्सइ त्ति भएण सो तस्स हत्थच्छेयं कासी । कमेण बीओ पुत्तो उप्पण्णो, तस्स पायच्छेयं विहेइ, एयाए रीईए कस्सई अंगुलिच्छेयं, कस्सइ नक्कच्छेयं, कस्सइ कण्णच्छेयं नयणच्छेयं च कासी । एवं सव्वे वि पुत्ता तेण खंडियंगा रज्जाहिगाररहिया कया ।

एवं बहुकालंमि गए पुणो वि पउमावई देवी सुहसुमिणसूइअं गब्भं धरित्था । तइया मंतिभज्जाए पोट्टिलाए वि गब्भो धरिओ । तइया मंतिणा आगारिऊणं पउमावईदेवीए साहियं – 'मए सुहसुमिणसूइओ गब्भो धरिओ अत्थि, अओ जम्मसमए सो भवया पच्छन्नभावेण पालणीओ, जहा सो रज्जाहिगारी होज्जा । भवओ वि सो सहेज्जगरो होहिइ' त्ति सुणिऊण तीए वयणं मंतिणा पडिवन्नं । समए देवीए पुत्तो जाओ । पच्छन्नवित्तीए मंतिणा सो नियभज्जापोट्टिलाए समप्पिओ । तयवसरे पोट्टिलापसूया पुत्ती पउमावईए देवीए समप्पिआ । पच्छा दासीए निवस्स पुत्तीजम्मसरूवं वियाणावियं । अह मंतिगेहंमि वुड्ढिं पावंतस्स रायकुमारस्स कणयज्झउ त्ति नामं दिण्णं , कमेण सो जोव्वणं पत्तो ।

तम्मि समए कणयकेउनरिंदो परलोगं गओ । सव्वे वि सामंतपमुहा चिंताउला जाया । एयं रज्जं कस्स समप्पिस्सामु त्ति? तयवसरे मंतिणा तेयलिपुत्तेण सव्वंपि पउमावईदेवीसरूवं निरूविअं । तइया कणयज्झयं रायनंदणं णच्चा सव्वे वि पहिट्ठा संजाया । सव्वेहिं पि महयाडंबरेण सो कणयज्झयकुमारो रज्जम्मि ठविओ । कणयज्झयनरिंदेण मंतिं महुवगारिणं वियाणिऊणं अईव तस्स सम्माणो दिण्णो । महया आणंदेण रज्जं पालेमाणस्स तस्स कियंतो कालो गओ । एगया मंतिणो गेहंमि पोट्टिला पिया पुव्वं पाणेहिंतो वि अहिगा वि केणई कम्मदोसेणं अणिट्ठा जाया । भिन्नसेज्जा कया । पोट्टिलाए मणंसि एयं महादुक्खं उप्पन्नं । वुत्तं च–

आणाभंगो नरिंदाणं, गुरूणं माणमद्दणं ।
भिन्नसेज्जा या नारीणं, असत्थवहमुच्चइ ।।

पियावमाणदुहियाए तीए विसेसेण दाणाइधम्मकिच्चं पारद्धं । एगया पोट्टिलाघरंमि एगा सुव्वया साहुणी आहारट्ठं समागया । संमुहं गंतूणं सुद्धाहारेणं पडिलाहिऊणं पंजलिं काऊणं पोट्टिलाए पुट्ठं – ''भो भगवइ ! तारिसं किं पि विहेहि, जेण मम पिओ वसीहोज्जा, परुवयारो च्चिय परमं पुण्णं, जओ वुत्तं –

दो पुरिसे धरइ धरा, अहवा दोहिंपि धारिया धरणी ।
उवयारे जस्स मई, उवयारो जं न वीसरइ ।।''

इअ पोट्टिलावयणं सुच्चा सुव्वया साहुणी साहेइ – तुमए किं वुत्तं?, एयारिसी पउत्ती उत्तममहिलाणं न जुत्ता, जओ मंततंताईहिं भत्तुणो वसीकरणं महादोसाय होज्जा । अहवा अम्हाणं पि गहियसव्वविरईणं महव्वइणीणं एयं कम्मणाइपयोगकरणं न समुइयं । तुमं जं भोगट्ठं वसीकरणं करावेसि, ते भोगा संसारिजीवाण दुक्खहेयवो, किंपागफलसरिसा विसया पारंभरमणिज्जा परिणामे अइदारुणा निरयाइदुग्गइदुहदायगा, दीहकालं सेविया वि विसया न तित्तिजणगा, अओ एयं विसयाभिलासं चइत्ता जिणवरवुत्तं सुद्धधम्मं समायराहि, जेण सव्वट्ठसिद्धी होज्जा ।''

एवं सुव्वयासाहुणीमुहाओ उवएसं सोच्चा तव्वयणं पडिवण्णं । भत्तुस्स अणुण्णं घेत्तूणं चारित्तं गहियं । पिएण विमुत्तकोहेण वुत्तं – 'धन्ना तुमं, जेण चारित्तं गहियं । अओ देवीभूयाए तुमए मज्झ पडिबोहणट्ठं अवस्सं समागंतव्वं ।' सा वि तं पडिवज्जित्ता भूमीए विहरित्था । चिरकालं निरइयारं चरणं पालिऊणं सा देवत्तणेण उप्पन्ना । ओहिनाणेण पुव्वभवभत्तारं अवलोइऊणं पडिबोहिउं सो देवो समागओ । बहूहिं पि उवएसेहिं सो तेयलिपुत्तो पडिबोहं न पत्तो, तओ देवेण चिंतियं – 'रज्जमोहेण एसो पडिबोहं न पावेइ, अओ देवेण रण्णो चित्तविवज्जासो कओ ।

मंतिम्मि सहाए समागए परंमुहीहोइऊणं ठियो राया दंसणं न देइ । तेयलिपुत्तेणं चिंतियं – 'राया मज्झ उवरिं अईव रुट्ठो। दुट्ठेण केण वि किमवि मईयं छिद्दं कहियं विलोइज्जइ । अओ न याणेमि किं एसो काही ? केण वा मरणेण मं हणिस्सइ ?, अप्पाघायं काऊणं मरणं चिय वरं' ति चिंतिऊणं तेण कंठंमि पासो दिण्णो । देवप्पहावेण सो तुट्टिओ, पुणो विसं भक्खियं, तंपि सुहा विव जायं, पुणो खग्गेण मत्थयं छिंदिउं पारद्धं, तइया देवेण खग्गधारा निबद्धा, पुणो अग्गिमज्झंमि पविट्ठो, अग्गी वि जलरूवेण परिणओ । एवं सव्वे वि मरणप्पयासा देवेण निप्फलीकया ।

पच्छा पयडीहोऊणं पोट्टिलादेवी भासित्था एयं सव्वं मए कयं, किमट्ठं अप्पघायं कुणेसि ?, चरित्तं गिण्हेहि ।' तं सोच्चा तेयलिपुत्तपहाणेण चरित्तं गहियं । राया वि समागंतूणं चरणेसु पडिऊणं नियं अवराहं खमावेइ । एवं मंतिमुणी बहुकालं भूमीए विहरित्ता चउद्दसपुव्वधरो होऊणं कमेण घाइकम्मक्खएणं केवलनाणं आसज्ज मुत्तिपयं पावित्था ।

## शब्दार्थ व टीपा

**मईयं** (वि.) – मदीय, माझे.

**गिण्हिस्सइ** (क्रि.) – ('गिण्ह', भविष्यकाळ, तृतीय पुरुष एकवचन,) घेईल.

**आसि–अहेसि–कासी** – ही तीनही 'होती' अथवा 'झाली' या अर्थाची अनियमित भूतकाळी रूपे आहेत.

**सुहसुमिणसूइअं** (वि.)– शुभस्वप्नसूचक (गर्भ).

**आगारिऊणं** (क्रि.) – ('आगार', पूर्वकालवाचक अव्यय,) बोलावून.

**साहियं** (क्रि.) – ('साह', क. भू. धा. वि., नपुंसकलिंगी प्रथमा एकवचन,) सांगितले.

**सहेज्जगर** (वि.)– सहाय्यकर.

**पच्छन्नवित्तीए** – गुपचूप, गुप्तपणे.

**महयाडंबरेण** (संधि) – (महया+आडंबरेण) मोठ्या थाटामाटाने.

**महुवगारिणं** (संधि) – (महा+उवगारिणं) मोठ्या उपकारी असलेल्या.

**भिन्नसेज्जा कया** – वेगळे केले.

**असत्थवह** – शस्त्राविना केलेला वध.

**वसीकरणं** – वशीकरण, (मंत्रतंत्रविभूती इत्यादींनी व्यक्तीला) वश करून घेणे.

**विसया न तित्तिजणगा** – विषयभोग कितीही घेतले तरी तृप्तिजनक ठरत नाहीत.

**अणुण्णं घेत्तूणं** – अनुज्ञा घेऊन, परवानगी घेऊन.

**ओहिनाण** – अवधिज्ञान, (जैन तत्त्वज्ञानात सांगितलेल्या पाच ज्ञानांपैकी तिसऱ्या प्रकारचे ज्ञान की जे प्राप्त झाले असता, साधकाला दुसऱ्या ठिकाणी घडणाऱ्या घटनांचे ज्ञान होते. देवयोनीत आणि नरकयोनीत गेलेल्या सर्व जीवांना हे ज्ञान जन्मत: प्राप्त असते.)

**चित्तविवज्जासो** – (चित्तविपर्यास,) चित्तभ्रम.

**तुट्टिओ** (वि.) – तुटला.

**भासित्था** (क्रि.) – ('भास', भूतकाळ, तृतीय पुरुष एकवचन, बोलली,) म्हणाली.

**अप्पघाय** – आत्मघात, आत्महत्या.

**मंतिमुणी** – मंत्री मुनी.

**चउद्दसपुव्वधरो** – चतुर्दशपूर्वधर, (जैन परंपरेप्रमाणे सर्व प्राचीन ज्ञानाचा साठा असलेली जी 'चौदा पूर्व' या नावाने प्रसिद्ध असलेली ग्रंथसंपदा, तिचा धारक.)

**घाइकम्मखय** – घातिकर्मक्षय, (आठ कर्मांपैकी ज्ञानावरणीय–दर्शनावरणीय, मोहनीय आणि अंतराय, ही चार कर्मे आत्म्याच्या स्वाभाविक गुणांचा विशेष घात करणारी असतात. उरलेली चार कर्मे अघाती अर्थात् कमी घातक असतात. आठही कर्मांच्या पूर्ण क्षयाने मोक्षप्राप्ती होते.)

**आसज्ज** – आसाद्य, प्राप्त करून.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) तेयलिपुत्तो कस्स मंती आसि ?
(२) केण कारणेण कणयकेऊ पुत्ता खंडियंगा करेइ ?
(३) कणयज्झओ कहिं वुड्ढिं पाविओ ?
(४) दिक्खासमए तेयलिपुत्तेण पोट्टिलाए किं कहियं ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) कोणाच्या मदतीने पद्मावतीने कनकध्वजाचे रक्षण केले ? व का ?
(२) कोणत्या अनुभवामुळे पोट्टिलेने प्रव्रज्या ग्रहण केली ?
(३) तेतलिपुत्राला प्रतिबोधित करण्यासाठी पोट्टिलेने काय केले ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) रूपे ओळखा.**

वड्ढंतो, होहिइ, मंतिगेहम्मि, पोट्टिलाए, समागंतव्वं, हणिस्सइ, खमावेइ

**ब) पुढील शब्दांना पाठातील प्राकृत शब्द द्या.**

खड्ग, मुक्तिपद, रुष्ट, अवधिज्ञान, तृप्ति, उपकार, आडम्बर, प्रच्छन्न, वल्लभा, मन्त्री

❑ ❑ ❑

# २ पुत्ताणं परिक्खा

इसवी-सनाचे बारावे शतक हा प्राकृत कथासंग्रहात्मक ग्रंथांचा सुवर्णकाळ मानला जातो. 'आख्यानमणिकोश' हा ग्रंथ देवेन्द्रगणि उर्फ नेमिचन्द्रसूरि यांनी रचला. आम्रदेवसूरींनी या ग्रंथावर टीका लिहिली. मूळ ग्रंथात कथांचे सूचन करणाऱ्या संक्षिप्त गाथा आहेत. त्यांचा विस्तार करून आम्रदेवसूरींनी त्यांचे कथेत रूपांतर केले. या ग्रंथात जैन महाराष्ट्री प्राकृतमध्ये लिहिलेल्या ११७ कथा येतात, त्यातील ही विसावी कथा आहे. यातील सर्व कथा 'धर्मकथा' असून चतुर्विध बुद्धी, दानाचे स्वरूप, शीलाचे माहात्म्य, पूजा-स्वाध्याय व नियमाचे फळ - यासारखे विषय त्यामध्ये येतात. उपदेश व बोधप्रधान कथा असूनही, त्यामध्ये दृष्टांत, अलंकार, वर्णने, प्रश्नोत्तर यांचा वापर केल्यामुळे कथा आकर्षक बनल्या आहेत. आख्यानमणिकोशामध्ये बाराव्या शतकातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन उत्तम प्रकारे प्रतिबिंबित झाले आहे.

'पुत्रांची परीक्षा' ही प्रस्तुत कथा मूलत: एक रूपककथा आहे. 'उत्तराध्ययनसूत्र' नावाच्या अर्धमागधी आगमग्रंथात, सातव्या अध्ययनात, तीन वणिकपुत्रांची कथा संक्षेपाने दिली आहे. त्या कथेचा विस्तार आम्रदेवसूरींनी प्रस्तुत कथेत केला आहे. 'नयसार' नावाचे नगरश्रेष्ठी आपल्या तीन मुलांची परीक्षा घेऊन, त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांच्यावर योग्य ती जबाबदारी सोपवितात- अशी ही कथा आहे. आजची युवा पिढी कष्टा न करता संपत्ती मिळविण्याचा विचार करतात. तर काही व्यसनी, अज्ञानी लोक स्वत:चे आणि इतरांचे जीवन दुख:मय करतात. तेव्हा मनुष्य जन्मात येवून थोडे तरी चांगले कर्म करावे. असे या कवितेतून स्पष्ट केलेले आहे. कथेच्या शेवटी धार्मिक अर्थही स्पष्ट केला आहे.

आजची युवा पिढी कष्ट न करता संपत्ती मिळविण्याचा विचार करतात. तर काही व्यसनी, अज्ञानी लोक स्वत:चे आणि इतरांचे जीवन दु:खमय करतात. तेव्हा मनुष्य जन्मात येऊन थोडे तरी चांगले कर्म करावे असे या कवितेतून स्पष्ट केले आहे.

---

नयरम्मि वसंतपुरे नायरजणाण गोरवट्ठाणं ।
निवसइ सुइववहरणो नयसारो नाम पुरसेट्ठी ।।१।।

अह अन्नया य को किर कुडुंबपयसमुचिओ महं होही ।
इय चिंताए तिण्हं पुत्ताणं परिक्खणनिमित्तं ।।२।।

नियसयणबंधुपमुहं नायरयजणं निमंतिय गेहे ।
भोयाविऊण विहिणा ताण समक्खं भणइ सेट्ठी ।।३।।

एएसि मह सुयाण तिण्हं पि को कुडुंबपयजोग्गो ।
तं चेव विसेसेणं जाणसि जोग्गो त्ति तेणुत्तं ।।४।।

इय एवं ता तुम्हाणं समक्खमेए अहं परिक्खेमि ।
इय भणिउं वाहरिया तिन्नि वि ते पउरपच्चक्खं ।।५।।

पत्तेयं पत्तेयं लक्खं दाऊण दविणजायस्स ।
ववहारत्थं देसेसु पेसिया ताण समिक्खमिमे ।।६।।

तो तेसिं पुत्ताणं चिंतियमेगेणं अम्हमेस पिया ।
पाएण दीहदरिसी धम्मपिओ सुइसमायारो ।।७।।

पाणच्चए वि अम्हाणमुवरि न कया वि चिंतइ विरूवं ।
कं पि कारणं ता नूणं एत्थ भवियव्वं ।।८।।

बीएण चिंतियमिमं मम पिउणो विज्जए पभूयधणं ।
ता किं किलेसजाले पाडेमि मुहाए अप्पाणं ।।१०।।

जइ सव्वं पि य विलसामि ता गओ कह मुहं पदंसिस्सं ।
तम्हा मूलं रक्खिय सेसं भक्खेमि किं बहुणा ।।११।।

तइएणमजोग्गं विगप्पियं नियमणम्मि मह जणओ ।
वुड्ढत्तणदोसेहि संपइ कोडीकओ जम्हा ।।१२।।

चिट्ठालज्जानासो भयबाहुल्लं विरूवभासित्तं ।
पाएण मणुस्साणं दोसा जप्पंति वुड्ढत्ते ।।१३।।

अन्नह कहमम्हे पट्ठवेइ देसंतरम्मि सइ विहवे ।
इय परिभाविय सव्वं वरिसंते भक्खियं दव्वं ।।१४।।

संपत्ता सव्वे वि हु ते नियमा वरिसंते ।
पुणरवि तहेव विहिऊण सेट्ठिणा भोयणाईयं ।।१५।।

सयणाईण समक्खं पुट्ठा ते ताण ववहारं ।
तेहि वि कहियं तहा जहा चिंतियं मणे ।।१६।।

सयणाईण समक्खं पढमो संठाविओ कुडुंबपए ।
बीओ भंडारपए तइओ किसिमाइकज्जेसु ।।१७।।

मज्झत्थेणं जणएण नियसुया जह इमे जणसमक्खं ।
सकयाणुरूवपयवीए ठाविया बुद्धिमंतेण ।।१८।।

तह चेव धम्मविसए जीवे ठावेइ कम्मपरिणामो ।
सकयाणुरूवसरिसे पयम्मि भणियं च जेणमिमं ।।१९।।

जहा तिन्नि वणियसुया मूलं घेत्तूण निग्गया ।
एगोत्थ लहइ लाभं एगो मूलेण आगओ ।।२०।।

एगो मूलं पि हारित्ता आगओ तत्थ वाणिओ ।
ववहारे उवमा एसा एवं धम्मे वियाणह ।।२१।।

माणुसत्तं भवे मूलं लाहो देवगई भवे ।
मूलच्छेएण जीवाणं नरयतिरिक्खत्तणं धुवं ।।२२।।

## शब्दार्थ व टीपा

**नायरजणाण** - नागरजनांचे.
**सुइ-ववहरणो** - चांगल्या मार्गाने व्यवहार करून धनार्जन करणारा.
**कुडुंब-पय-समुचिओ** - कुटुंबात विशिष्ट जबाबदारी घेण्यास योग्य.
**होही** (क्रि.) - ('हो', भविष्यकाळ, तृतीय पुरुष एकवचन,) होईल.

**निमंतिअ** (क्रि.) – 'निमंत', अनियमित पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय, निमंत्रित करून.
**भोयाविऊण** – भोजन करवून.
**तेणुत्तं** (संधि) – (तेण+उत्तं) त्याने म्हटले.
**समक्खमेए** (संधि) – समक्खं + एए । समक्ष यांचे.
**वाहरिया** – ('वाहर' क्रि., क. भू. धा. वि., पुंलिंगी प्रथमा अनेकवचन,) बोलाविले.
**पउरपच्चक्खं** – नागरिकांच्या समक्ष.
**दविणजाय** – द्रव्यजात, सर्व संपत्ती.
**ववहारत्थं** (क्रि. वि.) – व्यवहारार्थ, व्यापारासाठी.
**अम्हमेस** (संधि) – (अम्हं + एस) आमचे हे (पिता).
**पिआ** (पुं.) – पिता.
**पाणच्चअ** – प्राणात्यय, मृत्यू.
**विरूव** (वि.) – प्रतिकूल.
**परिभाविय** – (पूर्वकालवाचक अव्यय,) विचार करून.
**विढविऊण** (क्रि.) – 'विढव', (पूर्वकालवाचक अव्यय,) प्राप्त करून.
**कोडी** – एक कोटीमूल्य धन.
**चिंतियमिमं** (संधि) – (चिंतिय + इमं) असा विचार केला.
**विज्जए** – आहे.
**मुहाए** (अ.) – मुधा, वृथा, फुकट.
**अप्पाणं** – स्वत:ला.
**पदंसिस्सं** (क्रि.) – ('प+दंस', भविष्यकाळ, प्रथम पुरुष एकवचन,) दाखवीन.
**मह जणओ वुड्ढत्तणदोसेहि संपइ कोडीकओ** – माझ्या पित्याला वृद्धत्वामुळे पित्याला बुद्धिभ्रंश झाला आहे.
**सह विहवे** – ('सति सप्तमी'ची रचना,) एवढे वैभव असताना सुद्धा.
**सकयाणुरूव-पयवीए ठाविया** – प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे योग्य पदावर स्थापन केले.
**मूलं** (नपुं) – मूळ भांडवल.
**हारित्ता** (क्रि.) – ('हार', पूर्वकालवाचक अव्यय,) हरवून, गमवून.
**वियाणह** (क्रि.) – ('वि+याण', आज्ञार्थ, द्वितीय पुरुष अनेकवचन,) जाणा.
**नरय-तिरिक्खत्तणं** – नरकत्व व तिर्यंचत्व, नरक योनी आणि पशु-पक्ष्यांची योनी.

## स्वाध्याय

**प्र. १ : पाइयभासाए उत्तराणि लिहह ।**

(१) नयसारसेट्ठिणा किंनिमित्तं नायरजणा गेहे निमंतिया ?
(२) नयसारसेट्ठिणा कियंतं दविणजायं पत्तेयपुत्तस्स दिण्णं ?
(३) वुड्ढत्तणे के के दोसा पाउब्भवंति ?
(४) नयसारसेट्ठिणा तिण्णि पुत्ता केसु केसु कज्जेसु संठाविया ?

**प्र. २ : थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) नयसाराच्या प्रथम पुत्राने धन कसे मिळविले ?
(२) नयसाराच्या दुसऱ्या पुत्रान मूळ भांडवल कसे राखले ?
(३) नयसाराच्या तिसऱ्या पुत्राने कोणत्या विचाराने सर्व द्रव्याचा व्यय केला ?
(४) तीन वणिक्पुत्रांची तुलना धर्माच्या बाबतीत कशा प्रकारे स्पष्ट करता येते ?

**प्र. ३ : व्याकरण**

**अ) रूपे द्या.**

(१) **नयर –** सप्तमी एकवचन
**चिंता –** तृतीया एकवचन
**ति –** षष्ठी अनेकवचन
**दोस –** तृतीया अनेकवचन

(२) **दा –** पू. का. धा. अ.
**पाड –** वर्तमानकाळ प्रथम पुरुष एकवचन
**पूर –** क. भू. धा. वि. पुंलिंगी प्रथमा अनेकवचन
**भक्ख –** क. भू. धा. वि. नपुंसकलिंगी प्रथमा एकवचन.

**ब) पुढील मराठी क्रियापदांना समानार्थी प्राकृत क्रियापदे द्या.**

रहाणे, निमंत्रण करणे, परीक्षा करणे, भक्षण करणे, पाठविणे, विचार करणे, स्थापन करणे, जाणे, येणे, विशेष जाणणे.

## विशेष अभ्यास

**पुढील शब्दसमूहामधून पाच अर्थपूर्ण वाक्ये तयार करा.**

पढमो, सेट्ठी, ते, पिउणो, वणियसुया, मम, ताण, घेत्तूण, वरिसंते, पभूय, मूलं, विज्जए, कुडुंबपए, तिण्णि, धणं, भणइ, सव्वे, गिहं, समक्खं, संपत्ता, निग्गया, संठाविओ

❑ ❑ ❑

# परिसिट्ठाइं

## परिशिष्ट १

### व्याकरण-विवेचन

अर्धमागधीतील व्याकरणाचे इ. ८ वी आणि ९ वीच्या पाठ्यपुस्तकांतून संपूर्ण विवेचन केलेले आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करावयाचा आहे. १० वीच्या अभ्यासक्रमात व्याकरणाच्या पुढील विषयांचा विशेष अभ्यास अपेक्षित आहे :

१. काळ - वर्तमान, भूत, भविष्य
२. कर्तरि व कर्मणि प्रयोग
३. संख्यावाचके - १ ते १००
४. प्रयोजक रूपे व त्यांचा उपयोग
५. तर-तम भावदर्शक विशेषणे

संयुक्त अभ्यासक्रमानुसार वरील विषयांपैकी १ ते ३ विषय आणि संधिनियम यांचा अभ्यास अपेक्षित आहे. वरील विषयांचे विवेचन पुढे करण्यात आले आहे.

### संधिनियम

१. अर्धमागधीतील सर्व संधी वैकल्पिक आहेत. २. अर्धमागधीत व्यंजनांत शब्द व विसर्ग हे दोन्ही नसल्यामुळे फक्त स्वरसंधी होतात. ३. मूळ संस्कृत शब्दातील व्यंजनाचा अर्धमागधीत लोप झाल्यास उर्वरित स्वराचा संधी होत नाही. उदा. कवि = कइ, वियोग = विओग, सुतो = सुओ

अ) अ + अ = आ - सच्च + असच्च = सच्चासच्च
अ + अ = अ - (जर दुसऱ्या अ पुढे संयुक्त व्यंजन आले) न + अत्थि = नत्थि
अ + इ = ए - राय + इसि = राएसि (रायमधील य हा 'य' श्रुतीने आलेला आहे)
अ + इ = इ - (जर इ पुढे संयुक्त व्यंजन आले) देव + इंद = देविंद
अ + ई = ई - तियस + ईस =तियसीस
अ + उ = ओ - तस्स + उवरि - तस्सोवरि
अ + उ = उ - (जर उ पुढे संयुक्त व्यंजन आले) पुरिस + उत्तम = पुरिसुत्तम
अ + ऊ = ऊ - एग + ऊण = एगूण
अ + ए = ए - इह + एव = इहेव
अ + ओ = ओ - जल + ओह =जलोह

ब) आ + अ = आ - महा + अवयार = महावयार
आ + अ = अ - (जर अ पुढे संयुक्त व्यंजन आले) महा + अण्णव = महण्णव
आ + इ = ए - महा + इसि = महेसि
आ + इ = इ - (जर अ पुढे संयुक्त व्यंजन आले) महा + इंद =महिंद
आ + ई = ए - महा + ईस = महेस
आ + उ = उ - (जर उ पुढे संयुक्त व्यंजन आले) महा + उग्गम = महुग्गम
आ + ऊ = ऊ - महा + ऊसव = महूसव

आ + ए = ए - तहा + एव = तहेव

आ + ओ = ओ - महा + ओसहि = महोसहि

क) इ/ई + इ/ई = ई - मुणि + ईसर = मुणीसर

पुहवी + ईसर = पुहवीसर

इ/ई + इ/ई = इ - (जर इ/ई पुढे संयुक्त व्यंजन आले) मुणि + इंद = मुणिंद

ड) उ/ऊ + उ/ऊ = ऊ - साउ + उयय = साऊयय (स्वादूदक)

वहू + उवयार = वहूवयार (वधूपचार)

इ) ए + ए = ए - से + एवं = सेवं

वरील नियमांना अपवाद असणारी अनेक उदाहरणे अर्धमागधीत सापडतात. उदा. नर + ईसर = नरेसर, देव + ईस = देवेस. काही वेळा दोन शब्दात म्, य्, र् यासारखी संध्यक्षरे वापरली जातात. उदा. अंग + अंग = अंगमंग, एग + एग = एगमेग, दु + अंगुल = दुयंगुल, धि + अत्थु = धिरत्थु इ.

## काळ

अर्धमागधीत सोयीसाठी धातूंचे तीन गट किंवा गण केलेले आहेत.

१) अकारांत धातू - पास - गण (दृश् - पश्य् पासून)

२) एकारांत धातू - करे - गण (कृ)

३) अन्य स्वरांत धातूंचा संकीर्ण गण - उदा. ठा (स्था), नी, हू (भू) इत्यादि.

व्यंजनांत धातू अर्धमागधीत नाहीत. **धातू सामान्यतः परस्मैपदी असतात. ते तीन पुरुष व दोन वचनात चालवले जातात.** क्रियापदांचे वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ असे तीन काळ असतात. यापैकी वर्तमानकाळी रूपांचा सर्वात अधिक उपयोग केला जातो. वर्तमानकाळी रूपे भूत व भविष्यकाळ दर्शविण्यासाठी वापरली जातात.

## वर्तमानकाळ

| धातू | पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| पास (अकारांत) | प्रथम | पासामि | पासामो |
| | द्वितीय | पाससि | पासह |
| | तृतीय | पासइ | पासंति |
| कर (अकारांत) | प्रथम | करेमि | करेमो |
| | द्वितीय | करेसि | करेह |
| | तृतीय | करेइ | करेंति |
| ठा (अकारांत) | प्रथम | ठामि | ठामो |
| | द्वितीय | ठासि | ठाह |
| | तृतीय | ठाइ | ठांति/ठायंति |

## भूतकाळ

अर्धमागधीत सर्व पुरुषांमध्ये (प्रथम, द्वितीय व तृतीय) एकवचनात 'इत्था' किंवा 'इत्थ' व अनेकवचनात 'इंसु' किंवा 'एंसु' हे प्रत्यय लावून भूतकाळी रूपे मिळतात.

| धातू | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पास | पासित्थ/पासित्था | पासिंसु |
| करे | करेत्थ/करेत्था/करित्था | करिंसु/करेंसु |
| ठा | ठाइत्थ/ठाइत्था | ठाइंसु |

## भविष्यकाळ

| धातू | पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| पास | प्रथम | पासिस्सामि/पासिस्सं | पासिस्सामो |
| | द्वितीय | पासिस्ससि | पासिस्सह |
| | तृतीय | पासिस्सइ | पासिस्संति |
| कर | प्रथम | करिस्सामि/करिस्सं | करिस्सामो |
| | द्वितीय | करिस्ससि | करिस्सह |
| | तृतीय | करिस्सइ | करिस्संति |
| ठा | प्रथम | ठाइस्सामि/ठाइस्सं | ठाइस्सामो |
| | द्वितीय | ठाइस्ससि | ठाइस्सह |
| | तृतीय | ठाइस्सइ | ठाइस्संति |

दुसऱ्या एका पद्धतीने भविष्यकाळी रूपे तयार केली जातात.

| धातू | पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|---|
| पास | प्रथम | पासिहिमि/पासिहामि | पासिहिमो/पासिहामो |
| | द्वितीय | पासिहिसि | पासिहिह |
| | तृतीय | पासिहिइ | पासिहिंति |

याप्रमाणे करे व ठा धातूंची रूपे करावीत.

करिहिमि - करिहिमो, ठाहिमि - ठाहिमो इ.

करे धातूला 'का' असा आदेश होऊन काहिमि-काहिमो अशी रूपेही होतात.

## कर्तरि – कर्मणिप्रयोग

संस्कृतप्रमाणेच अर्धमागधीमध्ये तीन प्रकारे वाक्यरचना करता येते. कर्तरि प्रयोग, कर्मणि प्रयोग व भावे प्रयोग अशा तऱ्हेने ही रचना केली जाते. यापैकी **क्रियापद सकर्मक असेल तर कर्तरि व कर्मणि प्रयोग करता येतो** व **क्रियापद अकर्मक असेल तर कर्तरि व भावे प्रयोग करता येतो.** कर्मणि व भावे या दोन्ही प्रयोगात धातूला 'इज्ज' हा प्रत्यय लावून रुप तयार केले जाते. ही रूपे सर्व काळ व अर्थ यामध्ये चालविली जातात.

उदा.

| धातू | वर्तमान | भूत | आज्ञार्थ | विध्यर्थ |
|---|---|---|---|---|
| पास + इज्ज (अंग) | | | | |
| पास –> पासिज्ज –> | पासिज्जइ | पासिज्जित्था | पासिज्जउ | पासिज्जेज्जा |
| करे –> किज्ज –> | किज्जइ | किज्जित्था | किज्जउ | किज्जेज्जा |
| ठा –> ठाइज्ज –> | ठाइज्जइ | ठाइज्जित्था | ठाइज्जउ | ठाइज्जेज्जा |

कर्मणि/भावे वाक्यरचना

| प्रयोग | कर्त्याची विभक्ती | कर्माची विभक्ती | क्रियापद |
|---|---|---|---|
| कर्तरि (सकर्मक) | प्रथमा | द्वितीया | कर्त्याप्रमाणे |
| (उदा.) | समणो | जिणं | वंदइ |
| कर्मणि | तृतीया | प्रथमा | कर्माप्रमाणे ('इज्ज' लावून) |
| (उदा.) | समणेण | जिणो | वंदिज्जइ |
| कर्तरि (अकर्मक) | प्रथमा | ----- | कर्त्याप्रमाणे |
| (उदा.) | फलं | ----- | पडइ |
| भावे | तृतीया | ----- | ('इज्ज' लावून, नेहमी तृ.पु.ए.व.) |
| (उदा.) | फलेण | ----- | पडिज्जइ |

| | | | |
|---|---|---|---|
| कर्तरि (कर्म अध्याहृत) | प्रथमा | ----- | कर्त्याप्रमाणे |
| (उदा.) | आयरिओ | ----- | भणइ |
| भावे | तृतीया | ----- | ('इज्ज' लावून, नेहमी तृ.पु.ए.व.) |
| (उदा.) | आयरिएण | ----- | भणिज्जइ |

सूचना – प्रयोग बदलताना मूळ क्रियापदाचा काळ किंवा अर्थ कायम ठेवावा लागतो. **अर्धमागधीत भावे प्रयोगाची योजना फारच क्वचित केली जाते.**

काही अनियमित रूपे :

कर – कीरइ, किज्जइ ; खाद – खज्जइ ; खिव – खिप्पइ ; जाण – नज्जइ ; तर – तीरइ ; ने – निज्जइ ; पा – पिज्जइ ; मुंच – मुच्चइ ; लह – लब्भइ ; हण – हम्मइ, इत्यादि.

## प्रयोजक क्रियापदे

१) धातूला अभिप्रेत असणारी क्रिया करण्यास प्रवृत्त करणे या अर्थी प्रयोजक क्रियापदाचा उपयोग करतात. उदा. शिकतो (सिक्खइ) - शिकण्याची क्रिया स्वतः करतो. शिकवितो (सिक्खावेइ) म्हणजे शिकण्याची क्रिया करण्यास प्रवृत्त करतो.

२) प्रयोजक वाक्यातील कर्ता हा मूळ क्रियेच्या कर्त्यापेक्षा निराळा असून तो मूळ वाक्यातील कर्त्याला ती क्रिया करण्यास प्रवृत्त करतो. मुलगा शिकतो (बालो सिक्खइ।) आचार्य मुलाला शिकवतात. (आयरिओ बालं सिक्खावेइ।)

३) मूळ क्रियापद सकर्मक असेल तर प्रयोजक वाक्यात मूळ कर्त्याची तृतीया वापरतात. मूळ क्रियापद अकर्मक असेल किंवा गत्यर्थक धातू असेल तर मूळ कर्त्याची प्रयोजक वाक्यात द्वितीया वापरतात. या नियमाला काही अपवाद व प्रत्यपवाद आहेत.

४) प्रयोजक क्रियापदे ही सर्व काळ व अर्थ तसेच कर्मणि प्रयोगात वापरली जाऊ शकतात.

५) अर्धमागधीत प्रयोजक क्रियापदे पुढीलप्रमाणे बनतात -

**अ) अकारान्त धातूंना 'आवे' प्रत्यय लावतात.**

**तुस** - तुस्सइ (मूळ क्रि.) - तोसावेइ (प्रयो. क्रि.)  **हस** - हसइ - हसावेइ

**ब) आकारान्त धातूंना 'वे' प्रत्यय लावतात.**

ठा (स्था) - ठाइ - ठावेइ  जा (या) - जाइ - जावेइ

**क) काही धातूंना 'ए' प्रत्यय लावून उपान्त्य स्वर ऱ्हस्व असल्यास दीर्घ करतात.**

कर (कृ) - करेइ -कारेइ  पड (पत्) - पडइ - पाडेइ

**ड) एकारान्त व ओकारान्त धातूंना 'यावे' प्रत्यय लावतात.**

ने - (नी) - नेइ - नेयावेइ  हो - (भू) - होइ - होयावेइ

**प्रयोजक वाक्यरचना :**

**१) मूळ वाक्य –** निवो हसइ। (अकर्मक)
**प्रयोजक वाक्य –** सेवगो निवं हसावेइ। (कर्तरि)
**प्रयोजक कर्मणि –** सेवगेण निवो हसाविज्जइ। (कर्मणि)

**२) मूळ वाक्य –** गोवालो धेणुं आणेइ। (कर्तरि)
**प्रयोजक वाक्य –** सामी गोवालेण धेणुं आणावेइ। (कर्तरि)
**प्रयोजक कर्मणि –** सामिणा गोवालेण धेणू आणाविज्जइ। (कर्मणि)

काही अनियमित प्रयोजक क्रि. - ठा-ठावे, दक्ख (दृश्) - दरिसे, पव्वय-पव्वावे, विण्णव (वि+ज्ञा) विण्णवे

## तरतम भावदर्शक विशेषणे

१) दोन व्यक्ती किंवा वस्तू यांमध्ये एकाचा प्रकर्ष दाखवायचा असेल तर विशेषणाला तर, यर, तराय, यराय, तराग, यराग हे प्रत्यय लावले जातात. ज्याच्यापेक्षा प्रकर्ष दाखवावयाचा असेल त्याची पंचमी वापरली जाते. यासाठी संस्कृतमध्ये **तर** व **ईयस्** असे दोन प्रत्यय आहेत. उदा. 'गोविंदाओ हरी कुसलयरो' (गोविंदापेक्षा हरी हुशार आहे.)

२) दोहोंपेक्षा अधिक व्यक्ती किंवा वस्तूंमध्ये एकाचा प्रकर्ष किंवा आधिक्य दाखवावयाचे असल्यास विशेषणाला तम किंवा यम असा प्रत्यय लावला जातो. ज्यांच्यामध्ये आधिक्य दाखवावयाचे असेल, तद्वाचक शब्दाची षष्ठी किंवा

सप्तमी वापरतात. यासाठी संस्कृतमध्ये तम किंवा इष्ठ हे प्रत्यय आहेत. **उदा.** सव्वेसिं पव्वयाणं/सव्वेसु पव्वएसु हिमालओ तुंगयमो। (सर्व पर्वतांमध्ये हिमालय उंच आहे).

३) संस्कृतमधील ईयस्-इष्ठ प्रत्ययांत विशेषणात वर्णविकार होऊन काही शब्द अर्धमागधीत प्रचलित झाले आहेत.

**उदा. –** श्रेयस् – सेयं, कनीयस् – कणीयस श्रेष्ठ – सेट्ठ, ज्येष्ठ – जेट्ठ

४) काही वेळा तुलना नसतानाही केवळ आधिक्य दाखविण्यासाठी या विशेषणांचा उपयोग केला जातो.

**उदा. –** गंगाए जलं निम्मलयरं वट्टइ। भरहो रामस्स कणीयसो भाया।
रामो भरहस्स जेट्ठो भाया।

## संख्यावाचके

१) एक हे एग किंवा एक्क या स्वरूपात अर्धमागधीत येते. ते फक्त एकवचनात चालते. क्वचित अनेकवचनातही त्याचा प्रयोग होतो, तेव्हा त्याचा अर्थ 'काही' असा असतो.

| | पुं. | स्त्री. | नपुं. |
|---|---|---|---|
| प्रथमा | एगे | एगा | एगं |
| द्वितीया | एगं | एगं | एगं |
| तृतीया | एगेण | एगाए | एगेण |
| *चतुर्थी | --- | --- | |
| पंचमी | एगाओ | एगाओ | एगाओ |
| षष्ठी | एगस्स | एगाए | एगस्स |
| सप्तमी | एगम्मि, एगंसि | एगाए | एगम्मि, एगंसि |

*प्राकृतमध्ये चतुर्थी ऐवजी षष्ठीचा वापर केला जातो.

२) दो, ति आणि चउ ही संख्यावाचके फक्त अनेकवचनात चालविली जातात. तिन्ही लिंगांत त्यांची रूपे समान असतात.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथमा | दो, दुवे, दोण्णि | तओ, तिण्णि | चत्तारो, चउरो, चत्तारि |
| द्वितीया | दो, दुवे, दोण्णि | तओ, तिण्णि | चत्तारो, चउरो, चत्तारि |
| तृतीया | दोहिं | तीहिं | चउहिं |
| पंचमी | दोहिंतो | तीहिंतो | चउहिंतो |
| षष्ठी | दोण्हं | तिण्हं | चउण्हं |
| सप्तमी | दोसु | तीसु | चउसु |

३) पंच पासून अट्ठारस ही संख्यावाचके फक्त बहुवचनात असून त्यांची रूपे सारखीच असतात.

| प्र. | द्वि. | तृ. | पं. | ष. | स. |
|---|---|---|---|---|---|
| पंच | पंच | पंचहिं | पंचेहिंतो | पंचण्हं | पंचसु |

ही संख्यावाचके पुढीलप्रमाणे –

पंच (५), छ (६), सत्त (७), अट्ठ (८), नव (९), दस (१०), एयारस-एयारह-एक्कारस (११),

दुवालस-बारस-बारह (१२), तेरस (१३), चउद्दस-चोद्दस (१४), पन्नरस (१५), सोलस (१६), सत्तरस (१७), अट्ठारस-अट्ठारह (१८)

**४)** एगूणवीस ते अट्ठचत्तालीस ही संख्यावाचके फक्त एकवचनात चालतात. पुंलिंगात व नपुंसकलिंगात ती अकारान्त नामाप्रमाणे चालतात ; तर स्त्रीलिंगात आकारान्त स्त्रीलिंगी शब्दाप्रमाणे चालतात.
ही संख्यावाचके पुढीलप्रमाणे -

एगूणवीस, अउणवीस (१९), वीस (२०), एक्कवीस (२१), बावीस (२२), तेवीस (२३), चउवीस (२४), पणवीस (२५), छव्वीस (२६), सत्तावीस (२७), अट्ठावीस (२८), अउणतीस (२९), तीस (३०), एक्कतीस (३१), बत्तीस (३२), तेत्तीस (३३), चोत्तीस (३४), पणतीस (३५), छत्तीस (३६), सत्ततीस (३७), अट्ठतीस (३८), एगूणचत्तालीस (३९), चत्तालीस (४०), एक्कचत्तालीस-इगयाल (४१), बायालीस (४२), तेयालीस (४३), चउयालीस-चोयालीस (४४), पणयालीस-पणयाल (४५), छायालीस (४६), सत्तचत्तालीस-सत्तयालीस-सायालीस (४७), अट्ठचत्तालीस-अढयालीस-अढयाल (४८)

**५)** एगूणपन्नास पासून अट्ठावन्नपर्यंतची संख्यावाचके अनेकवचनात पंच या संख्यावाचकाप्रमाणे चालतात ; मात्र काही वेळा ती आकारान्त स्त्रीलिंगी शब्दाप्रमाणेही चालतात. ही संख्यावाचके पुढीलप्रमाणे -

एगूणपन्नास-अउणापन्न (४९), पन्नास (५०), एक्कावन्न (५१), बावन्न (५२), तेवन्न (५३), चउवन्न (५४), पणवन्न (५५), छप्पन्न (५६), सत्तावन्न (५७), अट्ठावन्न (५८)

**६)** एगूणसट्ठि-अउणट्ठि (५९), सट्ठि (६०), एगसट्ठि (६१), बासट्ठि (६२), तेसट्ठि-तेवट्ठि (६३), चोसट्ठि-चउवट्ठि (६४), पणसट्ठि-पन्नट्ठि (६५), छावट्ठि (६६), सत्तसट्ठि (६७), अट्ठसट्ठि (६८), एगूणसत्तरि-अउणत्तरि (६९), सत्तरि (७०), एगसत्तरि (७१), बावत्तरि (७२), तेवत्तरि (७३), चोवत्तरि (७४), पंचहत्तरि-पन्नत्तरि (७५), छावत्तरि (७६), सत्तहत्तरि (७७), अट्ठहत्तरि (७८), एगूणासीइ (७९), असीइ (८०), एगासीइ-एक्कासीइ (८१), बासीइ (८२), तेसीइ-तेयासी (८३), चउरासीइ-चोरासी (८४), पंचासीइ (८५), छलसीइ (८६), सत्तासीइ (८७), अट्ठासीइ (८८), एगूणनउइ (८९), नउइ (९०), एक्कणउइ (९१), बाणउइ (९२), तेणउइ (९३), चउणउइ (९४), पंचणउइ (९५), छण्णउइ (९६), सत्तणउइ (९७), अट्ठाणउइ (९८), नवनउइ (९९)

**७)** सय (१००), सहस्स-साहस्सी (१०००), सयसहस्स, सय-साहस्सी, लक्ख (१००,०००), कोडी (१००,००,०००). मोठ्या संख्या पलिओवम व सागरोवम या शब्दांनी दर्शविल्या जातात.

**८)** क्रमवाचके - पढम-पढमिल्ल (१ला), बिइय-बीय-दोच्च (२रा), तइय-तच्च (३रा), चउत्थ (४था), पंचम (५वा), छट्ठ (६वा) बाकीची क्रमवाचके मूळ संख्यावाचकाला 'म' प्रत्यय लावून तयार केली जातात. **उदा.** सत्तम, दसम, चउद्दसम इ.

ही क्रमवाचके पुंलिंगात अकारान्त पुंलिंगी शब्दाप्रमाणे व नपुंसकलिंगात अकारान्त नपुं. शब्दाप्रमाणे चालतात. स्त्रीलिंगात पढम-पढमा, दो-दोच्चा, तइय-तच्चा अशी आकारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे ; तर राहिलेली क्रमवाचके ईकारान्त स्त्रीलिंगी नामाप्रमाणे चालतात. **उदा.** चउत्थी, पंचमी, छट्ठी, सत्तमी इ.

**९)** आवृत्तिवाचके - सइं (एकदा), दुक्खुत्तो-दोच्चं (दोनदा), तिक्खुत्तो-तच्चं (तीनदा). राहिलेली आवृत्तिवाचके मूळ संख्यावाचकाला खुत्तो (संस्कृत-कृत्वा) प्रत्यय लावून बनतात. पंचखुत्तो (पाच वेळा).

❑ ❑ ❑

# परिशिष्ट २

## रिकाम्या जागा भरून कथा / परिच्छेद पूर्ण करा – या प्रश्नाच्या सरावासाठी

## आणि

## अनुवादाच्या सरावासाठी पाठ्येतर गद्य-पद्य उतारे

### (१)

कम्मि वि नयरे एगो कुंभारो आसी। तस्स भज्जा भद्दा। तीए नरिंद-महिसीए सह मेत्ती-भावो आसी। बे वि परोप्पराण सुह-दुक्खाणं वत्तं सया एक्कमेक्काणं पुच्छंति। राय-महिसीए सहित्तणेण कुंभयारी भद्दा लोगाणं आयरं सम्माणं च पावेइ। कुंभगार-भज्जाए एगा गद्दही अईव वल्लहा आसी। गद्दहीए पुत्तो जायइ। सो अईव सेय-रूवो। तीए तस्सुवरिं बहु-नेहो अत्थि। तओ तस्स नामं मयणु त्ति दिण्णं।

### (२)

कत्थ वि गामे एगो पुरोहिओ आसी। तस्स एगो पुत्तो, पंच य कन्नगाओ संति। तस्स चउरो कन्नगाओ विवाहियाओ। कयाई पंचमी-कन्नगाए विवाह-महूसवो पारद्धो। चउरो जामाउणो कन्नगाओ य आगया। पुण्णे विवाहे जामायरेहिं विणा सव्वे संबंधिणो निय-निय घरेसु गया। जामायरा भोयण-लुद्धा गेहे गंतुं न इच्छंति। खज्ज-रस-लुद्धा ते परुप्परं चिंतंति, 'ससुर-गिह-निवासो सोहणो सव्व-लोए' एवं चिंतिऊण एगाए भित्तीए एसा सुत्ती लिहिया।

### (३)

अत्थि कासी-विसए कासउरं नाम नयरं। तत्थ भद्द-चंदाभिहाणा दोन्नि सेट्ठिणो परिवसंति। लच्छी-धणवई-नामियाओ ताण भज्जाओ। ताओ निरवच्चाओ, मणे खिज्जंति पुत्त-भंडाणं कए। अन्नया लच्छीए निसाए एगं सुमिणयं दिट्ठं। सुमिणे कालंगार-नियओ ताए उयरे पविट्ठो। सा सखेया जाया। पभाए पइं कहेइ। भद्दसेट्ठी सुमिण-पाढगं पुच्छेइ। सो भणइ-'जइ सत्थं पमाणं, ता सव्वहा निल्लक्खणो परपुण्णोवजीवी सयल-जण-नयण-वेसो पुत्तो भविस्सइ। अणायारो एरिसेसु कायव्वो, नामं पि 'अभद्दो' कायव्वं।'

### (४)

इह जंबुद्दीवे भरहखेत्तस्स मज्झम्मि दुग्गमपुराभिहाणं पुरं अत्थि। तहिं च दोणनरिंदो रज्जं पालेइ। तस्स नरिंदस्स दुमा नामेण पट्टराणी अत्थि। तीए दुल्लभनामकुमारो रम्मरूवजियमारो सुकुमारो सुओ अत्थि। सो कुमारो नियजोव्वणमएण परे बहुकुमारे कंदुगं पिव गयणतले उच्छलिंतो सया रमेइ। अन्नया तस्स पुरस्स उज्जाणे सुलोयणनामा केवली समोसरिओ। तत्थुज्जाणे भद्दमुही नाम जक्खिणी वसइ। सा सुलोयणकेवलीं पणमिअ एवं पुच्छेइ-'भयवं ! पुव्वभवे हं माणवई नाम माणवी सुवेलवेलंधरदेवस्स परिभोग्गा पाणपिया आसि। आउक्खए इइ वणे भद्दमुही नाम जक्खिणी जाया।'

## (५)

ओज्झाउरीइ दसरहराया रघुवंसनंदणो आसि।
अच्चब्भुयनियचरणावज्जिय-सुरखयरपहू।।१।।
तस्संतेउरसारा तिण्णि अभविंसु पियमा रम्मा।
कोसल्ला य सुमित्ता तहावरा केकई नाम।।२।।
जाया तिण्णि पहाणा तासिं पुत्ता कमेण ते एए।
सिरिमं रामो तह लक्खणो य भरहो य नयनिउणा।।३।।

## (६)

मा कस्स वि कुणसु निंदं, होज्जसु गुण-गेण्हणुज्जओ नियय।
मा अप्पयं पसंससु, जइ वि जसं इच्छसे धवलं ।।१।।
लवण-समो नत्थि रसो, विन्नाण-समो य बंधवो नत्थि।
धम्म-समो नत्थि निही, कोह-समो वेरिओ नत्थि।।२।।

## (७)

जं कल्लं कायव्वं नरेण अज्जेव तं वरं काउं।
मच्चू अकलुण-हियओ न हु दीसइ आवयंतो वि।।१।।
धीरेण वि मरियव्वं काउरिसेण वि अवस्स-मरियव्वं।
दुण्हं पि मरियव्वे वरं खु धीरत्तणे मरिउं।।२।।

❑ ❑ ❑


# परिशिष्ट ३


## दहावी अर्धमागधी–प्रदीप (संपूर्ण)


### नमुना कृतिपत्रिका


### घटक निहाय गुणविभागणी

| क्रमांक | घटक | गुण |
|---|---|---|
| १ | गद्य | ४० |
| २ | पद्य | २० |
| ३ | स्थूलवाच | ०५ |
| ४ | लेखन | २० |
| ५ | व्याकरण | १५ |






































- पाठ्यपुस्तक मंडळाची वैशिष्ट्यपूर्ण पाठ्येत्तर प्रकाशने.
- नामवंत लेखक, कवी, विचारवंत यांच्या साहित्याचा समावेश.
- शालेय स्तरावर पूरक वाचनासाठी उपयुक्त.

पुस्तक मागणीसाठी www.ebalbharati.in, www.balbharati.in संकेत स्थळावर भेट द्या.

**साहित्य पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमध्ये विक्रीसाठी उपलब्ध आहे.**

ebalbharati

विभागीय भांडारे संपर्क क्रमांक : पुणे - ☎ २५६५९४६५, कोल्हापूर- ☎ २४६८५७६, मुंबई (गोरेगाव) - ☎ २८७७१८४२, पनवेल - ☎ २७४६२६४६५, नाशिक - ☎ २३९१५११, औरंगाबाद - ☎ २३३२१७१, नागपूर - ☎ २५४७७१६/२५२३०७८, लातूर - ☎ २२०९३०, अमरावती - ☎ २५३०९६५

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४.

अर्धमागधी–प्रदीप इयत्ता दहावी

₹ ६५.००





